

« 'तोडा, फोडा अन् राज्य करा' हीच भाजपाची नीती « नाशिक आज

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



« शहरात सीएनजीचा तुटवडा; वाहनचालक हैराण « शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०२ ■ नाशिक, गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


# सातपीर दर्ग्यावर कारवाई : जमावाच्या दगडफेकीत १५ पोलीस जखमी

**नाशिक : प्रतिनिधी**

उच्च न्यायालयाने काठे गल्ली परिसरातील सातपीर दर्गा हटवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, मनपाच्या अतिक्रमण विभागाने पंधरा दिवसांच्या आत सदर काम काढून घ्यावे, असे निर्देश दिले होते. पंधरा दिवसांनंतर पालिकेने मंगळवारी (दि. १५) मध्यरात्री दर्ग्याचा भाग हटवला. मात्र, अचानक जमावाने दगडफेक केल्याने तणावाची परिस्थिती निर्माण होऊन यात १५ पोलीस जखमी झाले.

दगडफेकीच्या प्रकारानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणून पहाटे साडेपाच वाजता सातपीर दर्ग्याच्या तोडकामाला प्रारंभ केला. दोन जेसीबींच्या सहाय्याने दर्ग्याच्या भिंती आणि अन्य बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले. अतिक्रमणाचा मलबा आणि साहित्य महापालिकेच्या वाहनांतून बाहेर काढण्यात आले. काठे गल्ली परिसरातील मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. काठे गल्ली ते भाभानगरच्या दिशेने जाणारी वाहतूक इतर मार्गाने वळवण्यात आली आहे.

पहाटे साडेपाच वाजता या दर्ग्याच्या तोडकामाला प्रारंभ झाला, सकाळी ९.३० वाजता कारवाई पूर्ण झाली. तोडकामाला प्रारंभ करण्यापूर्वी काही धार्मिक विधी पार पडले. यावेळी सातपीर दर्ग्याबाहेर मौलवी, प्रतिष्ठित नागरिक आणि



**नाशिक : काठे गल्ली परिसरातील सातपीर दर्ग्याचे अतिक्रमण दोन जेसीबींच्या सहाय्याने हटविण्यात येऊन दर्ग्याच्या भिंती आणि अन्य बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.**

## पंधरा जणांना अटक

याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत पंधरा जणांना अटक केली आहे. जमावाच्या दगडफेकीत १५ पोलिसांना किरकोळ दुखापत झाली आहे. जमावातील संशयित हल्लेखोरांच्या ५७ बाइक्स पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. या सगळ्यासंदर्भात नाशिकचे पोलीस उपायुक्त किरण कुमार चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. त्यांनी सांगितले की, दर्ग्याचे ट्रस्टी आणि प्रतिष्ठित नागरिकांनी बांधकाम हटवण्याची तयारी दर्शविली होती. त्यानुसार मंगळवारी रात्री ११ वाजता हे सगळे जमले होते. त्याचवेळी उस्मानिया चौकाच्या बाजूने जमाव आला आणि गोंधळ सुरू झाला. दर्ग्याचे ट्रस्टी आणि प्रतिष्ठित नागरिकांनी जमावाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही जमावातील लोकांना /-...४

| अशी झाली कारवाई | |
|---|---|
| जेसीबी | ४ |
| ट्रक | ६ |
| डंपर | २ |
| कर्मचारी | ५५ |

## महत्त्वाचे

### सोन्याचा दर ९८ हजार पार

**मुंबई :** सोन्याने प्रतितोळा ९८ हजारांवर झेप घेतली आहे. हा आतापर्यंतचा सर्वांत मोठा उच्चांक आहे. एक लाखापासून सोने अवघे दोन हजार रुपये दूर आहे. सोन्याच्या दरात बुधवारी (दि. १६) १६५० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सोन्याचे दर लवकरच एक लाखांच्या वरती जाणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. जागतिक स्तरावर घडलेल्या काही आर्थिक अस्थिरतेमुळे सोन्याकडे सुरक्षित गुंतवणुकीच्या पर्याय म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे त्याच्या किमतीत वाढ होत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

### कुणाल कामराला अटकेपासून संरक्षण

**मुंबई :** शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंनात्मक गाण्यातून टीका केल्यानंतर कुणाल कामराच्या अटकेची मागणी होत असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने त्याला दिलासा दिला आहे. पोलिसांनी बजावलेल्या नोटीसच्या संदर्भात ३५(३) अंतर्गत कुणाल कामराला पहिली नोटीस पाठवण्यात आली होती. ज्याचा अर्थ होतो की, त्याच्या अटकेची गरज नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे कामराला अटकेपासून संरक्षण मिळाले असून, आता तो जिथे आहे, तेथील पोलीस स्टेशनमध्ये जबाब नोंदवू शकणार आहे.

### अफगाणिस्तानात ५.६ तीव्रतेचा भूकंप

**नवी दिल्ली :** दक्षिण आशिया आणि आशिया-पॅसिफिक भाग पुन्हा एकदा भूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरले आहेत. बुधवारी (दि.१६) पहाटे अफगाणिस्तानातील हिंदूकुश पर्वतरांगांमध्ये रिश्टर स्केलवर ५.९ तीव्रतेचा भूकंप झाला, तर दक्षिण फिलिपीन्समध्येही ५.६ तीव्रतेचा भूकंप नोंदवण्यात आला. विशेष म्हणजे, या भूकंपाच्या लहरींचा प्रभाव भारतातही जाणवला असून, दिल्ली आणि उत्तर भारतातील काही भागांमध्ये सौम्य धक्के जाणवले. भारतीय वेळेनुसार पहाटे ४.४३ वाजता, अफगाणिस्तानच्या बागलानपासून १६४ किमी पूर्वेला, ७५ किमी जमिनीखालील खोलीत भूकंपाचा केंद्रबिंदू होता.

### सोबत लढणार, सत्तेत राहणार नाही : द्रमुक

**चेन्नई :** अण्णा द्रमुक आणि भारतीय जनता पक्षाची युती झाल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहांनी गेल्याच आठवड्यात केली. पण या युतीला अवघ्या आठवड्याभरात तडे जाऊ लागले आहेत. अण्णा द्रमुकचे अध्यक्ष ई. के. पलानीस्वामी यांनी सांगितले की, अण्णा द्रमुक आणि भाजपची साथ केवळ निवडणुकीपुरती आहे. आम्ही युती सरकार स्थापन करणार नाही. त्यांचे विधान केंद्रीय मंत्री अमित शहांच्या विधानाच्या अगदी उलट आहे. अमित शहांनी गेल्याच आठवड्यात अण्णा द्रमुक आणि भाजपच्या युतीची घोषणा केली. दोन्ही पक्ष सोबत आणि एनडीए म्हणून निवडणूक लढवतील. अण्णाद्रमुक, भाजप आणि अन्य मित्रपक्ष आगामी तमिळनाडू विधानसभा निवडणूक एनडीए म्हणून सोबत लढतील, असं शहा म्हणाले होते. भाजपसोबतच्या युतीमुळे अण्णाद्रमुकचे काही नेते नाराज आहेत. कारण गेल्या तीन मोठ्या निवडणुकांमध्ये त्यांची कामगिरी चांगली झालेली नाही. तीन निवडणुकांमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.




# द्रमुकशी युती हेच यांचे हिंदुत्व

## उद्धव ठाकरे : मशिदीत जाणारे नायडू कसे चालतात?

**नाशिक : प्रतिनिधी**

आमचे हिंदुत्व काय आहे, हे आम्हाला भाजपने शिकवू नये. कारण त्यांचे हिंदुत्व बुरसटलेले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा देणाऱ्या भाजपने बिहार निवडणुकीसाठी तेथील मुस्लिमांना खुश करण्यासाठी तब्बल ३२ लाख सौगाद हे मोदी कीटचे वाटप केले. हे यांचे हिंदुत्व म्हणायचे का? ज्या वक्फ दुरुस्ती विधेयकास अण्णा द्रमुकने विरोध केला, सत्ता जिहादसाठी त्याच द्रमुकशी भाजपने युती केली. मशिदीत जाणाऱ्या चंद्रबाबू नायडू यांना सोबत लागतात. वक्फ बोर्ड आणि हिंदुत्वाचा संबंध काय? वक्फच्या जमिनी भाजपला मित्राच्या खिशात घालायच्या असल्याची टीका शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.

शहरातील मनोहर गार्डन येथे ठाकरे गटाने एकदिवसीय निर्धार शिबिरचे आयोजन केले होते. यावेळी ठाकरे यांनी भाजपवर चौफेर हल्ला चढवला. यावेळी खा. अरविंद सावंत, खा. राजाभाऊ वाजे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खा. विनायक राऊत, चंद्रकांत खैरे, उपनेते सुनील बागूल, सुधाकर बडगुजर, माजी आ. वसंत गिते, बबन घोलप, दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख विलास शिंदे, जिल्हा कोअर कमिटीच्या सदस्य भारती ताजनपुरे, केशव पोरजे, युवासेना जिल्हाप्रमुख राहुल ताजनपुरे आदी उपस्थित होते.

ठाकरे पुढे म्हणाले, अमित शहा रायगड येथे आले असता त्यांनी म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्रातच राहता कामा नये, मी त्यांना सांगतो, छत्रपती महाराष्ट्रातच नव्हे, देशात, या जगात त्यांचा पराक्रम पोहचला आहे. ते तुम्हाला कसे समजणार, जेव्हा छत्रपतींनी सुरत लुटली त्याचा उल्लेख लंडन गॅझेटमध्ये आला आहे. पण तुम्हाला छत्रपती कसे समजणार. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणारा कोणीही असेल तर त्याला शिक्षा झाली पाहिजे. तरच ती शिवशाही ठरेल. आम्ही जय श्रीराम म्हणूच मात्र तुम्हालाही जय शिवराय, जय भीम बोलावे लागेल. निर्धार मेळावा होणार असल्याचे समजताच दर्गा पाडून गोंधळ घालण्याचा उद्देश असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची हिंमत दाखवा, तुमच्यापेक्षा जास्त जागा निवडून येतील, असा दावा त्यांनी केला.

आम्ही कुठे हिंदुत्व सोडलं ते दाखवा. तसेच आम्ही पाकमध्ये जाऊन केक खाऊन आलो नाही, असा टोलाही ठाकरे यांनी भाजपला लगावला.

खा. संजय राऊत म्हणाले, सेनेचा मेळावा होणार असल्याने परिस्थिती बिघडवण्यासाठी शहरात दर्गा काढण्याचे काम केले. शिबिराची कुठेही चर्चा होऊ नये म्हणून हे करण्यात आले. शिवसैनिक आहे तेथेच आहे. आम्ही यापेक्षा वाईट काळ पाहिला आहे. छत्रपती संभाजी महाराजांसारखा संघर्ष सुरू आहे. नाशिकच्या पराभवाचे विश्लेषण तुलसी गेबाड यांनी करत ईव्हीएम मशीन हॅक केले जाऊ शकतात हा दावा केला आहे./-...४

### दत्तक नाशिक पालकमंत्र्याविनाच!

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी नाशिक दत्तक घेतले होते. मात्र, नाशिकमध्ये यांनी काय दिवे लावले. अद्यापही दत्तक नाशिक पालकमंत्र्याविना बेवारस पडलंय. एवढंच शहरावर प्रेम होते तर ही अवस्था का आली. स्मार्ट सिटी म्हणून नाशिकमध्ये एक हजार कोटींची उधळपट्टी केली. एवढा पैसा कोणाच्या घशात गेला, असाही प्रश्न उद्धव ठाकरे यांनी केला.

### राज्यपाल भवनच्या जागी शिवरायांचे स्मारक करा

अरबी समुद्रात छत्रपतींचे स्मारक केव्हा होणार हे काहीच माहीत नाही. जलपूजन झाले तेव्हा वाटले की, दोन वर्षांत होईल, मात्र याविषयी सरकार गंभीर नाही. सरकारने राज्यपाल भवन येथे छत्रपतींचे भव्य स्मारक उभारावे. आमचा यास पाठिंबा आहे. महाराजांचा पराक्रम सर्व जगाला समजायला हवा. राज्यपालांना इतर मंत्र्यांचा बंगला देता येईल. पण राज्यपाल भवन येथे महाराजांचे मोठे स्मारक उभारावे. ज्याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

## 'बाळासाहेब असते तर लाथच मारली असती'

**मुंबई :** बाळासाहेबांचा आवाज वापरून त्यांच्या विचारांचा द्रोह केला आहे. आज वंदनीय बाळासाहेब असते तर लाथच मारली असती, असे म्हणत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

शिवसेना ठाकरे गटाचा काल नाशिकमध्ये निर्धार मेळावा पार पडला. मेळाव्याच्या सुरुवातीला ठाकरे गटाकडून बाळासाहेब ठाकरे यांचे एआयमार्फत भाषण सादर करण्यात आले. यात भाजपावर टीका करण्यात आली आहे. यावरून बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, आपले विचार हिंदुहृदयसम्राट वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजात ऐकवण्याचा पोरकटपणा फक्त आणि फक्त उबाठासारखा गटच करू शकतो. मला खात्री आहे, आज ज्यांनी बाळासाहेबांना जनाब ठरवले, ज्यांनी टिपू सुलतानाची नावे उद्यानांना दिली, वीर सावरकरांचा सकाळी अपमान करणाऱ्या राहुल गांधींच्या गळ्यात/-...४

# वक्फ कायद्याला स्थगितीस सुप्रीम कोर्टाचा नकार

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध बुधवारी (दि. १६) सर्वोच्च न्यायालयात दोन तास सुनावणी झाली. या कायद्याविरुद्ध १०० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यांवर केंद्राकडून उत्तर मागितले आहे, परंतु कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती दिलेली नाही. तसेच वक्फ कायद्याच्या निषेधार्थ देशभरात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल चिंता व्यक्त केली.

सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पी.व्ही. संजय कुमार, के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. आतापर्यंत झालेल्या सुनावणीत अपीलकर्त्यांनी प्रामुख्याने वक्फ बोर्डाची स्थापना, जुन्या वक्फ मालमत्तेची नोंदणी, बोर्ड सदस्यांमध्ये बिगर मुस्लिमांचा समावेश आणि वादांचे निराकरण यावर युक्तिवाद केला आहे. अपीलकर्तातर्फे कपिल सिब्बल



म्हणाले, वक्फची निर्मिती शेकडो वर्षांपूर्वी झाली. आता ते ३०० वर्षे जुन्या मालमत्तेचे वक्फ डीड मागतील. इथेच समस्या आहे. यावर सर्वोच्च न्यायालय म्हणाले, अनेक जुन्या मशिदी १४ व्या आणि १६ व्या शतकातील आहेत. ज्यांची नोंदणीकृत विक्री कागदपत्रे नाहीत अशा मालमत्तांची नोंदणी कशी केली जाईल? असा प्रश्न उपस्थित केला. सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला विचारले की, ते मुस्लिमांना हिंदू धार्मिक ट्रस्टचा भाग बनण्याची परवानगी देण्यास तयार आहे का? हिंदू धर्मादाय कायद्यानुसार, कोणताही बाहेरील व्यक्ती मंडळाचा भाग असू शकत नाही. ती वक्फ मालमत्ता आहे की नाही हे तुम्ही न्यायालयाला का ठरवू देत नाही?

# डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादला २४५ टक्के कर

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि चीनमधील टॅरिफ वॉर आणखी वाढला आहे. अमेरिकेने आता चीनवर



आणखी १०० कर लादला आहे. यासह, चिनी वस्तूंवरील एकूण शुल्क २४५ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. चीनने ११ एप्रिल रोजी अमेरिकन वस्तूंवर १२५ टक्के कर लादला होता, त्याला प्रत्युत्तर म्हणून ट्रम्प यांनी नवीन कर लादला आहे. यापूर्वी चीनने म्हटले होते की, आता ते अमेरिकेने लादलेल्या कोणत्याही अतिरिक्त शुल्काला प्रतिसाद देणार नाही.

अमेरिकेने नवीन शुल्क जाहीर केल्यानंतर चीनने म्हटले आहे की, आम्हाला अमेरिकेसोबत व्यापार युद्धाची भीती वाटत नाही. अमेरिकेने वाटाघाटी कराव्यात. यापूर्वी, डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की, चीनला चर्चा सुरू करावी लागेल. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान म्हणाले की, अमेरिकेला खरोखरच संवाद आणि तडजोडीद्वारे हा प्रश्न सोडवायचा असेल तर त्यांनी अनावश्यक दबाव, धमकी आणि ब्लॅकमेल करणे थांबवावे आणि समानता, आदर आणि परस्पर हिताच्या आधारावर चीनशी चर्चा करावी. २४५ टक्के अमेरिकन टॅरिफ अंतर्गत वेगवेगळे कर दर काय असतील हे तुम्ही अमेरिकेला विचारावे. हे टॅरिफ वॉर आपण नाही तर अमेरिकेने सुरू केले आहे. आम्ही फक्त अमेरिकेच्या कृतींना प्रत्युत्तर देत आहोत. आमच्या कृती पूर्णपणे तार्किक आणि कायदेशीर आहेत. आम्ही आमच्या देशाचे हक्क आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रामाणिकपणा राखण्याचा प्रयत्न करत आहोत.

# त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हीआयपी दर्शनाच्या पासचा काळाबाजार

## ६०० रुपयांचे पास काढून २००० रुपयांनी विक्री, पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**त्र्यंबकेश्वर :**

त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी जास्त पैसे घेऊन खोटे तिकीट विकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत मंदिर ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित माचवे यांनी त्र्यंबक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

गुजरात राज्यातील सुरत येथील भाविकाच्याबाबत असा प्रकार घडला असून, थेट दर्शनासाठी असलेली २०० रुपयांची तीन व्हीआयपी तिकिटे मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ भेटलेल्या एका व्यक्तीने २ हजार रुपयांना विकली. मात्र, ही तिकिटे मंदिराच्या प्रवेशद्वारी असलेल्या संगणकीय स्कॅनिंग यंत्राने स्वीकारली नाहीत व त्यामुळे फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. ही घटना २२ मार्च २०२५ रोजी घडली होती. सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास त्र्यंबकेश्वर मंदिरात चिराग दालिया (राहणार सुरत, गुजरात) हे सोबत दोन व्यक्तींना घेऊन दर्शनासाठी आले होते. मंदिराच्या उत्तर महाद्वारावर त्यांना एक अनोळखी व्यक्ती भेटली. त्याने शॉर्टकट व्हीआयपी दर्शन करून देतो असे सांगितले व त्याच्याजवळ असलेले त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टचे तीन लोकांचे प्रत्येकी २०० रुपयांप्रमाणे असे ६०० रुपये किंमत असलेले व्हीआयपी तिकीट दालिया व त्यांच्या सोबत आलेल्या दोन व्यक्तींना २ हजार रुपये घेऊन विकत दिले. सदर पास घेऊन ते व्हीआयपी दर्शनासाठी उत्तर महाद्वार येथे आले. तेव्हा ते तिकीट स्कॅनिंग करताना खोटे असल्याचे दाखवत यंत्राने अमान्य केले. साहजिकच सुरक्षारक्षकांनी त्यांना प्रवेश दिला नाही. संगणकीय प्रणालीमध्ये तिकिटावरील तपशील व सदर भाविकाचा आधार कार्डवरील नाव हे वेगवेगळे आहे. त्यामुळे तुमचे तिकीट अमान्य करण्यात आले असे सांगितले.

आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात आल्याने दालिया याने ट्रस्ट कार्यालयात धाव घेतली. देवस्थान चेअरमन यांचे नावे लेखी तक्रार अर्ज दिला. त्यामध्ये तिकीट देणाऱ्या व्यक्तीचे वर्णन करण्यात आले आहे. त्या व्यक्तीचे नाव नारायण असल्याचा उल्लेख अर्जात केला आहे. वास्तविक पाहता



देवस्थान ट्रस्टचे ऑनलाइन तिकीट हे अहस्तांतरणीय आहे. तरी देखील नारायण नावाच्या व्यक्तीने शॉर्टकट दर्शन देण्याचे आमिष दाखवून २०० रुपये दराचे तिकीट दोन हजार रुपयांना विकले. याबाबतचे सीसीटीव्ही फुटेज तपासून पाहिले व राखून ठेवण्यात आले आहे. दिनांक २३ मार्च २०२५ रोजी अमित माचवे यांनी दिलेल्या फिर्याद अर्जावरून दिनांक १५ एप्रिल रोजी फिर्याद दाखल करून घेण्यात आली आहे. याबाबत नारायण या व्यक्तीवर कलम ३१८ (४) प्रमाणे ठकबाजीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# स्वाइन फ्लूसदृश आजाराने एकाचा मृत्यू

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील सिडको भागात स्वाइन फ्लूसदृश आजाराने ५२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. आरोग्य विभाग या घटनेनंतर सतर्क झाला आहे.

बुधवारी (दि. १६) आरोग्य विभागाच्या बैठकीत स्वाइन फ्लूशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. बैठकीस मुख्य वैद्यकीय अधिकारी तानाजी चव्हाण, सहायक वैद्यकीय अधिकारी प्रशांत शेटे, जीवशास्त्रज्ञ डॉ. नितीन रावते उपस्थित होते. दरम्यान मधुमेह, हृदयरोग अशा सहव्याधी असलेल्या रुग्णांमध्ये स्वाइन फ्लूची लागण झाल्यास गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणतीही लक्षणे आढळल्यास तातडीने जवळील रुग्णालयात संपर्क साधून तपासणी करून घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. ताप (१०२-१०३ डिग्री), थंडी वाजणे, कफ मधुमेह, हृदयरोग अशा सहव्याधी असलेल्या रुग्णांमध्ये स्वाइन फ्लूची लागण झाल्यास गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणतीही लक्षणे आढळल्यास तातडीने जवळील रुग्णालयात संपर्क साधून तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. घसादुखी अंगदुखी, डोकेदुखी, खूप जास्त थकवा येणं, डायरिया, उलट्या होणे, स्वाइन फ्लूचा संसर्ग झालेल्या रुग्णांना न्यूमोनिया, बॅक्टेरिअल न्यूमोनिया, ब्रॉन्कायटिस अशा प्रकारची गुंतागुंत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## महत्त्वाचे



### बॉश संघटनेच्या कामगार पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**द्वारका :** आंबेडकर जयंतीचे औचित्य साधत नवनिर्वाचित बॉश एनईटीडब्ल्यू कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. रामसीता लॉन्स येथे बॉश एनईटीडब्ल्यू कामगार संघटनेचे मतदान पार पडले. अध्यक्ष म्हणून आमिर निकम, जनरल सेक्रेटरी किशोर पगार, उपाध्यक्ष सागर कातड, खजिनदार शेखर माळी, तसेच संदीप अंबरे, सुरेश पाटील, राहुल कदम हे सदस्य म्हणून निवडून आले. नवनिर्वाचित कमिटीचे सिद्धार्थनगर मित्रमंडळ तसेच एनईटीडब्ल्यू संघटनेचे सभासद यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास योगेश म्हस्के यांचे मार्गदर्शन लाभले. अर्जुन पगारे यांच्या मुख्य उपस्थितीत आकाश पगारे, अनिकेत अहिरे, नितीन गांगुर्डे, संदीप पवार, सागर पगारे, राजेंद्र लोखंडे, दीपक सदाशिव, दर्शन चौधरी, मुकेश भालेराव, मंगेश थोरात, सिद्धार्थ हजारी, गणेश मटाले, अंकुश देशमुख, नितीन वेताळ, प्रशांत काळे, सूरज दरोळे उपस्थित होते.



### पाथर्डीत एक गाव-एक जयंती साजरी

**इंदिरानगर :** पाथर्डी गावात एक गाव-एक जयंती या संकल्पानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. संविधान रथाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेवक भगवान दोंदे, सुदाम डेमसे, सुदाम कोंबडे, संजय नवले, एकनाथ नवले, त्र्यंबक कोंबडे, निवृत्ती गवळी, सोसायटी चेअरमन तानाजी गवळी, डॉ. पुष्पा पाटील, डॉ. राजेश्वरी संदीप दोंदे, बाळकृष्ण शिरसाठ, बाकेराव डेमसे, तुकाराम चौधरी, रावसाहेब डेमसे, रमेश जगताप, वामन जाचक, शारदा दोंदे, रमेश डेमसे, गौतम दोंदे, उत्तम दोंदे, सुधीर दोंदे, रामदास शिरसाठ, गंगाराम धोंगडे, शशी जाधव, पप्पू दोंदे, दत्तू जाधव, लक्ष्मण बोराडे, विष्णू डेमसे, विष्णुपंत गवळी, श्यामराव लोखंडे, रवी शिंदे, राहुल दोंदे, दत्तू डेमसे, सागर दोंदे, दंगल दोंदे, धनंजय गवळी, जीवन दोंदे, विलास दोंदे, बाळू दोंदे, प्रमोद जाचक, श्रीकांत जाधव, किरण दोंदे, भाऊसाहेब नवले, प्रशांत जाचक, नाना दोंदे, नितीन गांगुर्डे, दीपक धोंगडे, शरद घाटेसाव, सुधाकर जाधव, शिवाजी भुसारे, योगेश जाधव, गोपी पवार, गौरव कोंबडे, कार्तिक दोंदे, आकाश गांगुर्डे, अजय दोंदे, किशन पवार, सिद्धार्थ लोखंडे, हेमंत लोखंडे, सागर मोरे, प्रणित दोंदे, रोशन दोंदे, आदित्य घाटेसाव, कृष्णा पाटील, नाना वजारे, रितेश साबळे, अष्टी बनसोडे, गौरव काळबांडे, शुभम लोखंडे उपस्थित होते. संदीप भगवान दोंदे यांनी स्वागत केले.



### त्रिशरण बुद्धविहारात अभिवादन

**सिडको :** त्रिशरण यंग फ्रेंड कला, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सामाजिक विकास संस्था संचलित त्रिशरण बुद्धविहार प्रांगणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विहाराचे अध्यक्ष विनोद भडांगे, सचिव दीपक पवार, एम. डी. प्रताप, पुष्पाताई कांबळे, संस्थेच्या संचालक डॉ. अनिल आठवले, शुद्धोधन घायतडक, कल्पनाताई नेरकर, भारतीय बौद्ध महासभेचे सिडको विभाग अध्यक्ष संपतराव शिंदे, प्रभाकर तायडे आदी उपस्थित होते. संपत शिंदे, संभाजी सावळे, एम.डी.प्रताप कल्पना नेरकर, डॉ. अनिल आठवले, विनोद भडांगे यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमासाठी पांडुरंग आंबुलकर, एस. वाय. खरे, राजेंद्र मोरे, आनंद हजारे, यशवंत बागूल, हिरामण साळवे, शारदा आंबुलकर, रंजना खरात, सविता अहिरे, मीनाक्षी कळवणकर, मंदा साळवे, हंसराज कांबळे, केदा बच्छाव, खंडूजी अहिरे यांनी परिश्रम घेतले.




### सिडकोत गोल्डन डे देखाव्याने वेधले लक्ष

**सिडको :** सिडको येथे गोल्डन डेच्या देखाव्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम महाकाली चौक येथे अंबड पोलीस यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे, शिवसेना नेते सुनील बागूल, मार्क्सवादी पक्षाचे राजू देसले यांच्या प्रमुख उपस्थितीत बुद्धवंदना घेऊन मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी समितीचे मदन जमदाडे, विशाल डोके, अध्यक्ष विनोद भडांगे, उपाध्यक्ष संजय गांगुर्डे, संदीप अहिरे, स्वागताध्यक्ष संतोष सोनपसारे, समिती सचिव डॉ. अनिल आठवले, समितीचे प्रमुख अजय साळवे, बाबासाहेब शिंदे, कुणाल जगताप, देवचंद केदारे, संदीप वानखेडे, शिवनाथ आहिरे, दीपक पवार, कल्पना नेरकर, शोभाताई केदारे, बाळासाहेब जमदाडे, सुनील जगताप, शुद्धोधन घायतडक, सचिन सोनपसारे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. यावेळी संपत शिंदे, एस.वाय. खरे, संदीप वाघ, मनोज मुंडे, किरण कदम, अनिल कळंके, भीमराव वाघमारे, सुरेखा कांबळे, ॲड. सुजाता चौदंते, मिलिंद कळवणकर, एम. डी. प्रताप, पुष्पा कांबळे, हिरामण साळवे, पांडुरंग आंबुलकर, संभाजी सावळे, केदा बच्छाव, सचिन केदारे, ऋतिक गांगुर्डे आदींसह कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच भीमसैनिक सहभागी झाले होते.

# नायजेरियाबरोबर 'आयमा'चा सामंजस्य करार

## इलेक्ट्रिकल उद्योगाला मिळणार गती

**नाशिक : प्रतिनिधी**

अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (आयमा) कॅमेरूनपाठोपाठ सलग दुसऱ्या दिवशी नायजेरियातील वीजपुरवठा करणाऱ्या सर्वांत मोठ्या अशा कदुना इलेक्ट्रिक कंपनीशी व्यापाराबाबत परस्पर सामंजस्य करार केला. आयमाचे अध्यक्ष ललित बूब यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.




कदुना इलेक्ट्रिकचे चेअरमन व वरिष्ठ शासकीय अधिकारी अमिनो अबूबकर सुलेमान तसेच या कंपनीचे चार जणांच्या शिष्टमंडळाने आकांक्षा पॉवर अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (सातपूर) या कंपनीबरोबर पुढील पाच वर्षांसाठी १० ते १५ दशलक्ष डॉलर एवढा मोठा मेंटेनन्स व सप्लायचा करार केला. या ऐतिहासिक क्षणासाठी आकांक्षा पॉवरचे चेअरमन पद्मश्री डॉ. आर. एन. बस्तिया व एमडी मोहपात्रा तसेच या करारात डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर उभारणारी तिसरी घटक कंपनी विज्ञान लॅब्सचे संचालक श्रीनिवासन हेसुद्धा उपस्थित होते. कदुना कंपनीने आयमाबरोबर औद्योगिक सामंजस्य करारही केला. हा करार आयमाचे अध्यक्ष ललित बूब व कदुना इलेक्ट्रिकचे चेअरमन यांच्यात झाला.

या करारामुळे नाशिकमधील इलेक्ट्रिकल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चर करणाऱ्या कंपन्यांना थेट नायजेरियात लागत असलेल्या सामग्रींची मागणी वेळोवेळी ही कंपनी आयमाला कळविणार आहे. नाशकातील इलेक्ट्रिकल कंपन्यांसाठी ही एकप्रकारे पर्वणीच म्हणावी लागेल. नायजेरियात पाच मेगावॅटचे सोलर प्लांटही उभारण्याचे कॉन्ट्रॅक्ट नाशकातील आकांक्षा पॉवर या कंपनीला दिल्याचे कदुना इलेक्ट्रिककडून सांगण्यात आले. त्याचबरोबर नायजेरियात उपलब्ध असलेल्या अन्य विविध व्यापार संधीची माहितीही त्यांनी दिली.

या कार्यक्रमाचे नियोजन घडवून आणल्याबद्दल आकांक्षा पॉवर आणि कदुना कंपनीने आयमाचे अध्यक्ष ललित बूब व सहसचिव हर्षद बेळे तसेच आयमाचे आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयमाच्या आयात-निर्यात कमिटीचे चेअरमन जगदीश पाटील यांनी केले. यावेळी आयमाच्या सहसचिव योगिता आहेर, कार्यकारिणी सदस्य दिलीप वाघ, रवींद्र झोपे, श्वेता चांडक, जयंत पगार, राहुल गांगुर्डे, अविनाश मराठे, अजय यादव, मनीष रावल, वेदांत राठी, रणजीत सानप आदी उपस्थित होते. आभार हर्षद बेळे यांनी मानले.



सिडको : राजमुद्रा वेल्फेअर फाउंडेशनतर्फे महापालिका शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करताना राजमुद्रा वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बाळकृष्ण शिरसाठ यांच्यासमवेत भाजपा पदाधिकारी. (छाया : दिलीपराज सोनार)

## पाथर्डी गावात वह्या वाटप

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी गाव येथील महापालिका शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना भारतीय जनता पार्टी प्रणीत राजमुद्रा वेल्फेअर फाउंडेशनतर्फे वह्या वाटप करण्यात आले.

पाथर्डी गावातील खंडेराव मंदिर परिसरातील सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राजमुद्रा वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष बाळकृष्ण शिरसाठ, माजी नगरसेवक संजय नवले, पुष्पा आव्हाड, श्याम बडोदे, रश्मी हिरे, विशाल सांगळे, तानाजी गवळी, खंडू धोंगडे, तुकाराम चौधरी, रामदास जाचक, पांडू शिरसाट, सुनील कोथिंबीर, चंद्रभान कोंबडे आदींसह महापालिका शाळेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.



## नांदूरनाक्यावर भीम जयंती जल्लोषात

**नांदूरनाका : वार्ताहर**

नांदूरनाका येथे भीम जयंती नांदूर-मानूर उत्सव समितीतर्फे भीम जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जयंती समितीतर्फे अन्नदान, खीरदान, तसेच लस्सी वाटप करण्यात आले.

प्रत्येक सभासदाला समितीतर्फे टी-शर्टही वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक उद्धव निमसे, प्रशांत दिवे, पूनमताई सोनवणे, भाऊसाहेब निमसे, जितूबाबा जाधव, विनोद कदम, दिलीप निमसे उपस्थित होते. स्वागत समिती अध्यक्ष सचिन कळासरे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन विशाल अडांगळे, विनोद बागूल, दीपक निकम, अनिकेत गांगुर्डे, अंकित बागुल, राहुल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन बौद्धाचार्य रविकांत गांगुर्डे यांनी केले. याप्रसंगी वामनराव अडांगळे, किशोर पगारे, निवृत्ती निकम, अशोक बागूल, कुकलाल बागूल, प्रकाश बागूल, दीपक बागूल, सर्वेश बागूल, ज्ञानेश्वर बागूल, भारत बागूल, भावेश बागूल, विवेश बागूल, चेतन बागूल, सौरभ बागूल, स्वप्निल बागूल, अक्षय बागूल, समाधान बागूल, ओंकार बागूल, सिद्धार्थ बागूल, आत्माराम कळासरे, निशा कळासरे, देवा कळासरे, सोहम कळासरे, ओम कळासरे, हर्षल गांगुर्डे, नीलेश गांगुर्डे,चेतन गांगुर्डे,विजय गांगुर्डे, अजय गांगुर्डे, रामदास गांगुर्डे, लीला गांगुर्डे, छाया गांगुर्डे, स्वप्निल पगारे, नितीन पगारे,शुभम पगारे, रूपेश सोनवणे, महेश सोनवणे, सौरभ निमसे, सुधीर निमसे, किरण निमसे, समाधान माळोदे, जयराम पारधी, शशिकांत दिवे, नाना पवार, आदित्य पवार, सोहम पवार, खंडू भवर, रोहित भवर, मोहित भवर, संतोष जगताप, समाधान जगताप,किरण जगताप, दर्शन जगताप, करण बर्वे, विनीत आठवले,संतोष मते,अंकुश मुकणे, पवन मुकणे, सनी खरात, दिनेश साळवे,अविनाश अडांगळे, अजय अडांगळे, दर्शन निकम, आकाश कांबळे, सोहम कांबळे, उत्तम कापसे उपस्थित होते.

## श्री प्रतिष्ठानतर्फे जयंतीला शालेय साहित्य वाटप

**इंदिरानगर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी प्रणीत श्री प्रतिष्ठान, कै. धर्मराज बडोदे बहुद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग सहकार्यवाह राजेश राव, रघुनाथ कुलकर्णी, भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, भाजपा महिला आघाडीच्या रश्मी हिरे यांच्या हस्ते करण्यात आले. जयंती उत्सवाच्या निमित्ताने वडाळागाव येथील जय हिंद वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

संजय आवारे यांनी बुद्धवंदना घेतली. गणेश ठाकूर, बाळासाहेब केंगे, शिवाजी काकड, प्रवीण जाधव, दिनेश देवरे, सुनील देवरे, अनिल निरभवणे, सुरेश पवार, अमित बुडूख, संजय डावरे, सुदाम पाटील, प्रकाश कोठावदे, जितेंद्र चोरडिया, विजय महाले, दत्तात्रय जाधव, प्रकाश जोशी, दीपक देव, प्रफुल्ल काजळे, बाळकृष्ण शिरसाट, डॉ. पुष्पा पाटील, डॉ. राजेश पाटील, राजेंद्र परदेशी, शरद पाटील, सदाशिव उगले, धनराज चव्हाण, धनाजी घोडके, रामदास व्यवहारे हे उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी श्री प्रतिष्ठानचे जयवंत टक्के, गोपाळ आव्हाड, आशिष दाभोळकर, भारत शिरसाठ, योगेश रेवगडे, प्रशांत पाटील, मनीष पाटील, किरण पाटील, परेश पाटील, गणेश रत्नपारखी, सतीश यादव, गोकुळ फड, राम बडोदे, अजय बडोदे, सुभाष शेवाळे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक श्याम बडोदे यांनी केले होते.

## संयुक्त जयंती उत्साहात साजरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची संयुक्त जयंती दीर्घायुष्य ज्येष्ठ नागरिक संघ व चेतनानगर विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली.



राजीव वाघमारे व त्यांच्या कला पथकाने या थोर विभूतींच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेतनानगर विकास मंडळाचे अध्यक्ष रमेश जगताप होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अमोल जाधव, अरविंद दत्तरदे, आप्पा बाविस्कर, अजय पाटील, आगळे आदी उपस्थित होते.

शरद नवले यांची मानव अधिकार समितीच्या उत्तर महाराष्ट्र अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा माजी नगरसेवक अमोल जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## ब्ल्यू स्टार ग्रुपकडून वह्या व पेन वाटप

**नाशिकरोड : वार्ताहर**

दिंडोरी रोडवरील ब्ल्यू स्टार ग्रुपकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक बांधिलकी जपत मोफत आरोग्य तपासणी, नेत्रतपासणी व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

परिसरातील नागरिक व विविध सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान करून आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. सायंकाळी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्त्या सविता म्हस्के व बाबा म्हस्के यांच्या हस्ते व अरुण म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली वह्या व पेनचे वाटप करण्यात आले.



यावेळी अरुण पवार, सुभाष काकड, नितांत कांबळे, चिंतामण मोहिते, कमलाकर साळवे, बाबूराव दाणी, भास्कर खरे आदी उपस्थित होते.

ब्ल्यू स्टार ग्रुपचे जयंती अध्यक्ष सुशील म्हस्के, आनंद जगताप, मुकुंद मोहिते, अजय मोहिते, हेमंत दाणी, प्रकाश ब्राह्मणे, छाटूराज थोरात, भटू मोहिते, मोहन मुर्तडक, सचिन बनकर, विष्णू पंडित, दीपक अहिरे यांनी नियोजन केले होते.

## श्रमिक सेना व राजेबहाद्दर लेन मंडळातर्फे अभिवादन

**नाशिक : प्रतिनिधी**

श्रमिक सेना व श्री राजेबहाद्दर लेन मित्रमंडळातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

तसेच मान्यवरांच्या हस्ते आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी दांडेकर




दीक्षित संघाचे हिरामण वाघ, राजाभाऊ जाधव, काँग्रेसचे नेते सुरेश मारू, यशवंत क्लासेसचे संचालक भालचंद्र पाटील, श्रमिक सेनेचे नीलेश कुसमोडे, जितेंद्र ठाकूर, नागेश शिंदे, राहुल कुसमोडे, आनंद चौघुले, सचिन औटी, पवन सोनवणे, राजेश तलरेजा, बाळासाहेब बोटकर, वसंतराव वाघ, सागर गरगटे, बालाजी पवार, विशाल भदाणे व व्यापारी उपस्थित होते.



## 'यंग सम्राट' संस्थेतर्फे जयंती उत्साहात साजरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी फाटा येथील यंग सम्राट बहुद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री सामूहिक बुद्धवंदना होऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी आलेल्या मान्यवरांना संविधान प्रतींचे वाटप करण्यात आले.

संदीप दोंदे, विशाल दोंदे, उत्सव समिती अध्यक्ष ॲड. अमित दोंदे, मिलिंद गायकवाड यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छावा मराठा संघटनेचे डॉ. विलास पांगारकर, पोलीस उपआयुक्त मोनिका राऊत, सहाय्यक आयुक्त देशमुख, अंबड पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे, माजी नगरसेवक मनसे जिल्हाध्यक्ष सुदाम कोंबडे, अमोल जाधव आदींसह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी सुनील यशवंते, बाळासाहेब अहिरे, यासीन शेख, संतोष वाघमारे, नितीन इंगळे, मुन्ना दोंदे, रोहित पवार, रोहित पवार, अनिल गायकवाड, एम. टी. जाधव, वाहिद शेख, नितीन कोल्हे, दीपक मोरे, केतन जगताप, श्यामराव लोखंडे आदींनी परिश्रम घेतले.

# कुमावत बेलदार समाजाचे त्रैवार्षिक अधिवेशन उत्साहात

## कार्यकारिणीत नाशिकच्या तिघांचा समावेश

**नाशिकरोड : वार्ताहर**

कुमावत विकास सेवा संस्थेचे राज्यव्यापी अधिवेशन शिर्डी येथे नुकतेच झाले. या अधिवेशनात अनेकांनी समाजाच्या सद्य परिस्थितीबाबत विचारमंथन केले. यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत नाशिकला अध्यक्ष प्रफुल्ल कुमावत, वरिष्ठ उपाध्यक्ष शिवाजीराव कारवाळ, सहसचिव पंडितराव कुमावत अशी तीन महत्त्वाची पदे मिळाल्याने समाजबांधवांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





उपजिल्हाधिकारी नितीन मुंडावरे यांनी मनोगत व्यक्त करताना, समाजात आपण कुठे कमी पडतो? यापुढे समाजोपयोगी कुठली कामे केली पाहिजेत याबाबत सविस्तर माहिती दिली. पंडितराव कुमावत म्हणाले, महत्त्वाची शासकीय माहिती, योजना, उपक्रम, समाजोपयोगी सुविधा, समाजातील तळागाळातील व्यक्तींपर्यंत पोहोचवायला हवी. संस्थेचे झोनल अध्यक्ष भाऊसाहेब परदेशी यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी भारती कुमावत यांचे 'विवाह पलीकडील सत्य' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. साहेबराव कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली.

त्यात नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून नाशिकचे प्रफुल्ल कुमावत, सचिवपदी पुण्याचे रवींद्र बैताडे, वरिष्ठ उपाध्यक्षपदी नाशिकचे शिवाजीराव कारवाळ व वरिष्ठ उपाध्यक्षपदी साताऱ्याचे संजय परदेशी, उपाध्यक्षपदी चाळीसगावचे नानाभाऊ कुमावत, नगर जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीरामपूरचे लक्ष्मणराव कुमावत, सहसचिवपदी नाशिकचे पंडितराव कुमावत आणि युवा अध्यक्ष स्वप्निल नाईक यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

गांवकरी



# जलजीवनची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

## करण गायकर : छावा संघटनेचे अपर आयुक्तांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**



जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण भागात जलजीवन मिशन अंतर्गत विविध पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या. काही मोजक्याच गावांमध्ये कामे दाखवून संपूर्ण जिल्ह्यातील योजनेच्या अंमलबजावणीबाबत सकारात्मक चित्र निर्माण करण्यात आले. परिणामी, शासन स्तरावरून जिल्हा परिषदेला पुरस्कारही प्राप्त झाले. मात्र, प्रत्यक्षात जलजीवनची कामे होऊनही पाणीच मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे चौकशी करण्याची मागणी छावा क्रांतिवीर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्याकडे केली आहे.

त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा, इगतपुरी आदी तालुक्यांतील अनेक गावांमध्ये आजही नागरिकांना एक हंडाभर पाणी मिळवणे कठीण झाले आहे. त्यामुळे संबंधित भागातील ग्रामस्थ अनेक दिवसांपासून आंदोलन करत आहेत. या आंदोलकांनी अखेर मंत्रालयावर हंडा मोर्चा नेण्याचे नियोजन केले होते. परंतु पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव त्यांना इगतपुरी रेल्वे स्टेशनवरच रोखले. या पार्श्वभूमीवर हे स्पष्टपणे दिसून येते की, जलजीवन योजनेतील बहुतांश कामे केवळ कागदोपत्रीच झाली असून प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ही कामे झालीच नसल्याचे स्पष्ट होत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जलजीवन मिशन अंतर्गत ज्या ठिकाणी कामे दाखवली गेली आहेत. त्या सर्व कामांची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी व संबंधित कंत्राटदार यांच्यावर त्वरित कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अन्यथा छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासह नाशिक जिल्हा परिषदेवर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी शिवाजी मोरे शिवा तेलंग नवनाथ शिंदे डॉ. किरण डोखे, वैभव दळवी, भारत पिंगळे, दादासाहेब जोगदंड, दिनेश जाधव, विपुल तेलंग, अभिषेक तिवारी, कल्पेश कोर, नीरज पोटिंदे, पीयुष कोठावदे, रूपेश मोरे, पंकज चौबे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मोबाइल लंपास करणाऱ्या दोघा भामट्यांना नाशिकरोड रेल्वे पोलिसांकडून अटक

**शिलापूर प्रतिनिधी :** नाशिक रोड रेल्वे स्टेशनवर मोबाईल फोन चार्जिंगला लावण्यासाठी दिला असता तो लंपास करणाऱ्या दोघा भामट्यांना रेल्वे पोलिसांनी अटक करून मोबाइल हस्तगत केला. याबाबत अधिक माहिती अशी की रवींद्र छोटा रावत. राहणार बडी कॉलनी खिचरी .माणिकपूर .चित्रकूट उत्तर प्रदेश हे तुलसी एक्सप्रेसने प्रवास करून नाशिक रोड रेल्वे स्टेशनवर उतरून जुने बुकिंग हॉलमध्ये सुनील वीरजी वाघेश्री वय( २४ )राहणार सिन्नर फाटा. देवळाली. नाशिक व ऋषिकेश अशोक म्हस्के. वय( २३) राहणार रमा नगर .क्रांती चौक संभाजीनगर यांच्याकडे मोबाईल फोन चार्जिंगला लावण्यासाठी दिला. असता त्यांनी तो संगणमत करून देण्यास नकार दिला.

काळ्या रंगाचा रियल मी कंपनीचा दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन लंपास करीत त्यावरून रावत यांनी नाशिक रोड रेल्वे पोलिसात तक्रार दाखल करताच कर्तव्यावर असलेल्या गुन्हे शोध पथकाचे प्रमुख संतोष दत्तात्रेय उफाडे पाटील यांनी प्रभारी अधिकारी एस एस बनकर .उपविभागीय अधिकारी सूर्यकांत बांगर. लोहमार्ग अधीक्षक स्वाती भोर यांचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे दोघांना पकडून त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरलेला मोबाईल हस्तगत केला. अधिक तपास पोलीस हवालदार व्ही जी महाजन हे करीत आहे.

## येवला नगरपरिषद येवला, जि.नाशिक.

### जाहीर सूचना (प्रकटन)

येवला शहरातील व शहरालगत राहणाऱ्या नागरिकांना/शेतकऱ्यांना कळविणेत येते की, **मे. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानाअंतर्गत** येवला नगरपरिषदेच्या **गंगासागर तलाव सरोवर पुनरुज्जीवन** करावयाचे आहे. सदरचे गंगासागर साठवण तलावातील गाळ काढावयाचा आहे. तरी सदरचा गाळ/गाळयुक्त माती आपणास आवश्यक असल्यास आपण स्वखर्चाने घेऊन जावे लागेल. त्याकरीता आपणास नगरपरिषदेस सदरची सूचना प्रसिध्द झालेपासून ५ दिवसांचे आत मागणी करणे आवश्यक आहे.

कळावे.

**सही/-**
**(तुषार आहेर)**
**मुख्याधिकारी**
**येवला नगर परिषद**

## टायटल व्हेरीफिकेशनकरीता जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तालुका जिल्हा नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे सातपुर** शिवारातील **सर्व्हे नं.४८७/ब/१** पैकी **प्लॉट नं.२८** यांसी क्षेत्र ३१३.५० चौ.मी.यावर मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे बांधण्यात आलेल्या **हरफुल अपार्टमेंट विंग बी** या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील **फ्लॅट नं.१०** यांसी **बांधीव क्षेत्र ५२.०० चौ.मी.** ही फ्लॅट मिळकत **मे.यादव बिल्डर्स** भागीदारी संस्था तर्फे भागीदार **श्री.हरीकिशन मिनशीराम यादव** यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जेउपभोगातील असून त्यांनी सदर फ्लॅट मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असल्याचे सांगुन आमचे पक्षकारांशी मिळकतीचा व्यवहार निश्चित केलेला आहे. सबब, अंतीम खरेदीखता पूर्वी मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधता तपासणेकामी प्रस्तुत नोटीस टायटल व्हेरीफिकेशनकामी प्रसिध्द केलेली आहे.

तथापि,सदर फ्लॅट मिळकतीबाबत कुणाचाही कोणत्याही प्रकारे गहाण,दान लिन, लिज, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, विसार पावती, साठेखत, ज.मु.पत्र, खरेदीखत अगर अन्य कुठलाही, कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध अगर बोजा वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले दिवसापासून **०७ दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर साक्षांकीत कागदपत्रांनिशी समक्ष हरकत नोंदवावी. मुदतीत कुणाच्याही हरकती न आल्यास, वरील मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पुर्ण करतील. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस. नाशिक. दि.१६/०४/२०२५.

**ॲड.सारिका रणजित मोरे**
पत्ता :- एन-४२/सी/एफ-२/१२/७, शिवशक्ती चौक, सिडको नाशिक.मो.९२०९२०५२२९

## वसंत व्याख्यानमाला, नाशिक

**पत्ता : स.नं.५१२/३/४७, लोकशाहीर गजाभाऊ बेणी मार्ग, समता नगर, ऋणानुबंध मंगल कार्यालया मागे, मुंबई–आग्रारोड, नाशिक – ४२२ ०११**

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**बैठकीची कार्यक्रम पत्रिका**

वसंत व्याख्यानमाला, नाशिक (नोंदणी क्र. ई.१८२) या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दिनांक २६.०४.२०२५ रोजी सायं.५.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात** आयोजित करण्यात आली आहे.

**: सभेपुढील विषय :**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.
२. सन २०२४–२०२५ च्या आर्थिक हिशेब पत्रकास मंजुरी देणे.
३. सन २०२३–२०२४ व सन २०२४–२०२५ च्या सनदी लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.
४. सन २०२५–२०२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५. सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षाकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती करणे.
६. माहे मे २०२५ मध्ये आयोजित व्याख्यानमालेच्या १०२व्या वर्षाच्या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
७. मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय.

तरी या सभेस संस्थेच्या सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

दिनांक : १६.०४.२०२५

**(हेमंत नथुजी देवरे)**
चिटणीस
वसंत व्याख्यानमाला, नाशिक

**सूचना :**
१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास हीच सभा सायम् ५.३० वाजता घेण्यात येईल.
२. सर्वसाधारण सभेपुढे मांडावयाचे विषयांची लेखी सूचना सभासदांनी किमान दोन दिवस आगावू अध्यक्षांच्या नावे संस्थेच्या कार्यालयात देणे आवश्यक आहे.
३ सन २०२४–२०२५ या आर्थिक वर्षातील तपशीलवार हिशेब सभासदांना बघण्याकरिता दिनांक २३ ते २५ एप्रिल २०२५ रोजी सायम् ५ ते ६ या वेळेत संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध राहतील.

# जिल्हा परिषद नाशिकमध्ये इंटेलिजेन्ट वर्क मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वित

**नाशिक : प्रतिनिधी**



जिल्हा परिषद नाशिकमध्ये इमारत व दळणवळण विभागांतर्गत ग्रामीण भागातील भौतिक विकासकामांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनानुसार इंटेलिजेन्ट वर्क मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वित करण्यात आली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे यांनी या प्रणालीचे अनावरण केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, उपअभियंता शामकुमार सोनवणे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे नाशिक जिल्हा परिषद एक डिजिटल व कार्यक्षम यंत्रणेकडे वाटचाल करत असून, ग्रामीण मिळणार आहे. बांधकामांशी निगडीत सर्व माहितीचे डिजिटल दस्तऐवजीकरण झाल्याने एका सर्व माहिती एकाच प्रणालीवर उपलब्ध होणार आहे.

### प्रणालीचे फायदे

आर्थिक बचत कमी मनुष्यबळात जास्त कामे पार पाडता येतील. तसेच अंदाजपत्रक नियोजन, खर्चावर नियंत्रण आणि बचत शक्य होईल. वेळेची बचत तांत्रिक, प्रशासकीय व लेखा विभागातील प्रक्रिया संगणकीकरणामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचणार आहे, व कामकाज जलद होणार. गुणवत्ता हमी कामांचे संपूर्ण व्यवस्थापन प्रणालीद्वारे होणार असल्याने गुणवत्ता नियंत्रण सुनिश्चित होते आणि निर्धारित मानकांनुसार कामे होणार. केंद्रिय देखरेख डॅशबोर्डच्या माध्यमातून सर्व कामांवर एकत्रित नजरे ठेवता येते. त्यामुळे कामांमध्ये पारदर्शकता वाढेल व विलंब टाळता येईल. अचूकता प्रणाली पूर्णतः इनपुट आधारित असून, ऑटोमेटेड गणनांमुळे मानवी चुकांचा संभव कमी होणार. माहिती ॲक्सेस वेब–आधारित प्रणालीमुळे अधिकार्यांटना आवश्यक माहिती कुठूनही व केव्हाही लॉगिनद्वारे मिळू शकणार.ऑटोमेशन मॅन्युअल प्रक्रियांमुळे होणारा वेळ वाचेल व प्रशासकीय कार्यक्षमता वाढणार.

"मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार तयार करण्यात आलेल्या इंटेलिजेन्ट वर्क मॅनेजमेंट सिस्टिममुळे जिल्हा परिषदेचे प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि गतिमान होणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून विकासकामांच्या प्रक्रियांमध्ये अचूकता, गुणवत्ता व वेळेची बचत साधता येणार आहे. ही प्रणाली नाशिक जिल्हा परिषदेच्या डिजिटल परिवर्तनामधील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे."

**डॉ. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक**

## टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे मखमलाबाद–२** येथील **भुमापन क्रमांक व उपविभाग ५/१/ब/१/क/प्लॉट नं./४२** यांसी **क्षेत्र ३६०–०० चौ.मी.** यांसी आकार रुपये २१६=०० पैसे, ही मिळकत.

सदर प्लॉट मिळकत ही **उषा प्रभाकर वावीकर** यांचे खरेदी मालकीची तसेच कब्जा वहिवाटीची असून सदरील मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असल्याचे मिळकत मालकांनी खात्रीशीरपणे व भरवशाने सांगितलेले आहे. तथापि, सदरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा जसे गहाण, दान, लिन, लिज, विसार पावती, बक्षिसपत्र, साठेखत, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, करार मदार, कोर्ट वाद, जप्ती, जामीनकी बँक/सोसायटी इत्यादी स्वरूपाचा बोजा असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ (सात) दिवसांचे आत** समक्ष भेटून आमचे खालील नमुद पत्त्यावर साक्षांकीत कागदपत्रांनिशी समक्ष येवून आमची खात्री पटवुन द्यावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजण्यात येईल व तसा नाहरकत दाखला मिळकत मालकांना देण्यात येईल. मुदतीनंतर आलेली हरकत किंवा परस्पर कोणत्याही दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत ही सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.१७/०४/२०२५.

**शेख तौफिक सगीर, ॲडव्होकेट**
ॲडव्होकेट बार रुम जुना,जिल्हा न्यायालय आवार,नाशिक.मो.९९६०७७८६९३

# एनएसएनसीसीला विजेतेपद

**नाशिक** : जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित १२ वर्षांखालील वयोगटासाठीच्या अम्ब्रोसिया क्रिकेट स्पर्धा संपन्न झाली. क्रीडक क्रिकेट मैदानावरील झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात एन एस एन सी सीने द्वारका क्रिकेट अकादमी वर ६ गडी राखून विजय मिळवत अम्ब्रोसिया क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. जुनिअर कॉलेज यांच्या सहकार्याने १२ वर्षांखालील वयोगटासाठीची अम्ब्रोसिया क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली.

# गौतम पॉलिटेक्निकच्या १०८ विद्यार्थ्यांची कंपन्यांमध्ये निवड

**वावी : वार्ताहर**

कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युटच्या तृतीय वर्षातील १०८ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली असल्याची माहिती प्रा. भारती यांनी दिली.

संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युटमध्ये सातत्याने कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले जात असून त्या माध्यमातून दरवर्षी महाविद्यालयातील तृतीय वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळत आहे. याहीवर्षी आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये तृतीय वर्षातील १०८ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांनी नोकरीसाठी निवड केली आहे. यामध्ये बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीत ११ विद्यार्थी, टाटा मोटर्स २३, कमिंस इंडिया ०५, भारत गेअर ०८, अभिराज मॅन पॉवर ०१, आय एफ बी ०२, कायनेटिक इंजीनीरिंग १३, इंडोसकुल्प ऑटोकॉम्प्स १२, व आकाश प्रेकिसिओन कॉम्पोनेटस मध्ये ३३ अशा एकूण १०८ विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेच्या निकालापूर्वीच कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड करण्यात आली आहे. महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर व सर्व सुविधायुक्त असल्लेली महाविद्यालयाची भव्य दिव्य इमारत तसेच सुसज्ज वर्कशॉप, प्रयोगशाळा असल्यामुळे प्रवेशासाठी गौतम पॉलिटेकनिक इंस्टीट्युटकडे ओढा असतो. जे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतात त्यांचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी व विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून परिश्रम घेणारे प्राचार्य व सहकारी प्राध्यापक यामुळे गौतम पॉलिटेकनिक इंस्टीट्युटचा नावलौकिक वाढत आहे.

## जाहीर नोटीस

### अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक

**यांचे समोरील कामकाज**

नविन प्रशासकीय इमारत,नाशिकरोड,नाशिक.दुरध्वनी क्र.(०२५३-२४६२४०१)
email-crunashik-divcomm@mah.gov.in

**क्र.आर.टी.एस/पुनरिक्षण/६६२/२०२३**

१) **वैजवंती श्याम कासार**
रा.एनएमसी गार्डन समोर, अध्याय हौसिंग सोसायटी, डॉ.भाभा नगर, द्वारका कार्नर, नाशिक ) **अर्जदार**

**विरुध्द**

१) **चंद्रभान हिरालाल शर्मा**
रा. पुंडलिक रोड, सटाणा रोड, मु.पो. मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक
२) **पवन लक्ष्मीनारायण शर्मा**
रा.१०बी, सन सोसायटी, पुणे रोड, गुरुद्वाराजवळ, शिंगाडा तलाव, नाशिक ) **प्रतिवादी**
३) **निलेश विकास विसपुते**
रा.फ्लॅट नं.२३, हरीकृष्णा पार्क, गणेशवाडी, पंचवटी,नाशिक मॅनेजर, गोदावरी अर्बन को.ऑप.बँक, शाखा गंगापुर रोड, नाशिक.

प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार यांनी **मौजे मुंढेगांव**, तालुका **इगतपुरी**, जिल्हा नाशिक येथील **गट नं.६२७** या वाद मिळकती बाबत अपर जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडील **अपील क्रमांक - आरटीएस/ अपिल/ १७६/२०२१** दि.३१/०८/२०२३ रोजीच्या आदेशा विरुध्द अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे न्यायालयात **क्र.आर.टी.एस/ पुनरिक्षण/६६२/२०२३**, दि.०४/०९/२०२३ रोजी दाखल केले आहे. सदर अपील अर्जामध्ये सामनेवाले क्र.२ व ३ यांना अर्जदार यांनी दिलेल्या पत्त्यावर नोटीस बजावणी होऊ शकली नाही. सबब, **सामनेवाले क्र.२ व ३** यांना या जाहीर नोटीसी अन्वये कळविण्यात येते की,

सदर पुनरिक्षण अर्जाची सुनावणी अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे दालनात **दिनांक ११/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता** विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक येथे ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या दिवशी प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाले क्र.२ व ३ यांनी उपस्थित राहून आपले लेखी अगर तोंडी युक्तीवाद सादर करावेत. यासाठी पुन्हा तारीख दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदर दिनांकास सामनेवाले अनुपस्थित राहिल्यास, त्यांना प्रस्तुत प्रकरणी काही एक म्हणने नाही, असे समजण्यात येईल व प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यासाठी कामकाज पुर्ण करण्यात येईल.

ही जाहीर नोटीस आज दि.१६/०४/२०२५ रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली असे.

मा.अपर आयुक्त सो. यांचे आदेशावरून

सही/- **(योगेश्वर कोतवाल)**
**नायब तहसिलदार (अपील)**
नाशिक विभाग नाशिक

# प्रभाग १७ मध्ये विविध समस्यांबाबत पालिका आयुक्तांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**



प्रभाग क्रमांक १७ येथील नागरिकांनी माजी नगरसेवक शैलेश ढगे यांच्यासोबत जाऊन दि. १६ महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले. जेलरोड परिसरात प्रभाग क्रमांक १७ या ठिकाणी एमएनजीएल आणि अमृतवाहिनी पाणी योजना अंतर्गत जे पाइपलाइन टाकण्यात आली त्यामुळे सर्व प्रभागात गेल्या सात आठ महिन्यांपासून रस्ते खोदलेले दगड माती इत्यादी मोठ्या प्रमाणात रस्त्यात पडून आहे पाऊस पडल्यास प्रभागातील नागरिकांची दयनीय अशी परिस्थिती होणार आहे. त्याचबरोबर प्रभागातील पाण्याचा विस्कळीत झालेला आणि अनियमितपणे पाणीपुरवठा होतोय. त्याचबरोबर गोदावरी नदी असल्यामुळे तेथे पाणी आटले आहे व एसटीपीचे मलनिस्सारण पाणी आणि त्यातल्या त्यात पाण्यात वाढलेल्या पाणवेली यांच्यामुळे डासांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या सर्व बाबींचा व्यवस्थित नियोजन करून सदर कामे त्वरित व्हावी यासाठी आयुक्तांना निवेदन देण्यात आले. मनोज चिमणकर गणेश बोराडे अरविंद भालेराव किसन कावळे मधुकर शेलार भीमराव चव्हाण दिनेश बागुल प्रदीप भावसार अशोक बागुल इत्यादी प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# गुंगीच्या गोळ्या देऊन मुलीवर अत्याचार

**नांदेड :** जिल्ह्यातील तामसा पोलीस ठाणे हद्दीतील एका गावातील ५५ वर्षीय उपसरपंचाच्या कृत्याने तळपायाची आग मस्तकात गेल्याशिवाय राहणार नाही. गावतील एका अल्पवयीन मुलीला गुंगीच्या गोळ्या देऊन तिच्यावर बलात्कार केला. यातून अल्पवयीन मुलगी गर्भवती रहिली तिने एका मुलीला जन्म देखील दिलाय. याप्रकरणी आरोपी उपसरपंच बाबुराव तुपेकर याला अटक करण्यात आलीय.


## SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

At.Post. Shirdi, Tal- Rahata, Dist. A.Nagar - 423 109
Phone No.: 02423 – 258500, 258916/17,
Website - www.sai.org.in, E-Mail: emsshirdi@gmail.com

### TEACHER REQUIREMENT

Application for the following posts on Ad-Hoc Basis for the Academic year 2025-26

| Sr. No | Name of the Post | Fixed Honorarium Per month(Rs) | Number of Post | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Primary Teacher | 21000/- | 01 | HSC D.Ed, English Medium (T.E.T/C.T.E.T Qualified) |
| 2 | Sports Teacher(Primary) | 21000/- | 01 | B.A/B.Sc B.P.Ed |

**Terms & Conditions-**
1. Candidate may refer for detail terms and conditions and application format available on our official website www.sai.org.in. Complete application form should be submitted along with attested copies of certificates to General Administration department (Inward Section) of Shree Saibaba Sansthan Trust Shirdi, Tal-Rahata, Dist-Ahilyanagar, 423109.
2. Last date to submit your application is Dt. - 05/05/2025 upto 05.00 pm.

आरओसी-2025-26/क्र-5/C२३४

**Goraksha Gadilkar, I.A.S**
**Chief Executive Officer,**


## नाशिक महानगरपालिका,नाशिक

**पर्यावरण विभाग**

**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक – ४२२००२**

### जाहिर निवेदन

**प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासुन मुर्ती निर्मिती, आयात, साठा बंदी बाबतच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे.**

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांचेकडील दिनांक 12/05/2020 रोजीच्या सुधारीत नव्या मार्गदर्शक तत्वानुसार नदीचे प्रदुषण व नुकसान टाळण्याकरीता मा. केंद्र सरकारने प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मुर्तीवर संपूर्ण बंदी जाहीर केली आहे. तसेच, मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक 13/03/2025 W.P No C0103000 of 2025 नुसार निर्देशित केले आहे की महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांनी सीपीसीबीने जारी केलेल्या मूर्ती विसर्जनासाठीच्या सुधारित मार्गदर्शक तत्वांमधील कलम २, ज्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनवण्यास तसेच त्यांचे विसर्जन पूर्णपणे प्रतिबंधित आहे, ते यापुढे काटेकोरपणे पालन करणे करीता निर्देशित केले आहे.

**केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मूर्ती विसर्जनासाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे कलम २**

I. नैसर्गिक, जैव–विघटनशील, पर्यावरणपूरक कच्च्या मालापासून बनवलेल्या मूर्ती ज्या कोणत्याही विषारी, अजैविक कच्च्या मालापासून बनवल्या जात नाहीत [जसे की नैसर्गिक माती आणि चिखल तसेच प्लास्टर ऑफ पॅरिस (POP), प्लास्टिक आणि थर्माकोल (पॉलिस्टीरिन) पासून मुक्त] यांना परवानगी देण्यात यावी आणि प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासून बनवलेल्या मूर्तीवर संपूर्ण बंदी आहे.

II. मूर्ती आकर्षक बनवण्यासाठी फक्त वाळलेल्या फुलांचे घटक, मूर्तीचे दागिने बनवण्यासाठी आणि झाडांचे नैसर्गिक वस्तु यांचा वापर साहित्य म्हणून करता येईल.

III. सिंगल युज प्लॅस्टिक SUP प्लास्टिक आणि थर्माकोल साहित्याचा वापर करण्यास सक्त मनाई आहे आणि प्राप्त झालेल्या जलस्रोतांमध्ये प्रदूषण रोखण्यासाठी मूर्ती बनवण्यासाठी किंवा मूर्ती/पंडाल/ताजिया सजवण्यासाठी फक्त पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करणे अनिवार्य आहे .

IV. मूर्ती रंगविण्यासाठी विषारी आणि जैव–विघटनशील रासायनिक रंग/तेलाच्या रंगांचा वापर करण्यास, मूर्तीवर इनॅमल आणि सिंथेटिक रंगावर आधारित रंगांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. त्याऐवजी पर्यावरणपूरक वॉटर बेस, जैव–विघटनशील आणि विषारी नसलेले नैसर्गिक रंग वापरावेत.

V. मूर्तीच्या सुशोभीकरणासाठी, रंग आणि इतर विषारी रसायने असलेल्या डिस्पोजेबल साहित्याऐवजी नैसर्गिक साहित्य आणि धुता येण्याजोगे सजावटीचे कपडे वापरावेत. रंगविण्यासाठी वनस्पतींपासून (फुले, साल, केसर, पाने, मुळे, बिया, संपूर्ण फळे), विविध पक्ष्यांचे पंख, खनिजे किंवा रंगीत खडकांपासून मिळणारे नैसर्गिक रंगच वापरावेत.

VI. मूर्ती बनवण्यात सहभागी असलेले कारागीर किंवा कारागीर किंवा उत्पादक यांनी महानगरपालिके मध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे आणि या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पर्यावरणपूरक मूर्ती बनवण्यात सहाभाग नोंदविणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात मूर्ती उत्पादकांच्या बाबतीत (एका दिवसात १०० पेक्षा जास्त मूर्ती बनवण्यात सहभागी असणारे मूर्तीकारांनी) महानगरपालिके कडून नोंदणी घेणे आवश्यक आहे आणि या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास किंवा नोंदणी करतानाच्या अटींचे कोणतेही उल्लंघन केल्यास, किमान दोन वर्षांसाठी मूर्ती बनवण्यास मनाई असेल. नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील श्री गणेशोत्सवाकरीता अथवा अन्य विविध सण, उत्सव, कार्यक्रम इ. अनुषंगाने मुर्तीकारांकडून मुर्ती निर्मिती, आयात, साठा, विक्री इ. कार्यवाही केली जाते. त्याअनुषंगाने शहरातील सर्व मुर्ती विक्रेते, कारखाने, कारागीर, साठवणुक करणारे व्यापारी, दुकानदार, गाळेधारक इत्यादींना सुचित करणेत येते की, त्यांनी प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) पासुन मुर्ती निर्मिती, आयात, साठा बंदी बाबतच्या मार्गदर्शक सुचनांबाबत काटेकोरपणे पालन करावे.

तसेच, नागरीकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसपासुन (POP) तयार होणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या मुर्तीनदीपात्रात वा नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतात विसर्जित करू नये.

सदर मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन झाल्यास संबंधितां विरूध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

जनसंपर्क/जा.क्र./३२/२०२५
दि.१६/०४/२०२५

सही/-
उपायुक्त (पर्यावरण)
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

मुलगा–मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.

# नाशिकच्या बारा पुरुष व अकरा महिला खेळाडूंची निवड



**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रीमियर लीग - एम पी एल- चा थरार यंदा १० जून पासून सुरू होणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे पुणे येथे पुरुष महाराष्ट्र प्रीमियर लीग च्या लिलावासाठीच्या पुरुष व महिला खेळाडूंच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली आहे.त्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या बारा पुरुष व अकरा महिला खेळाडूंचा समावेश आहे.

नाशिकचा डावखुरा फिरकीपटू व अष्टपैलू खेळाडू ,भरवशाचा नामवंत रणजीपटू महाराष्ट्राचा आघाडीचा गोलंदाज सत्यजित बच्छाव , मागील हंगामात महाराष्ट्र प्रीमियर लीग मध्ये सर्वाधिक बळी घेत, उत्कृष्ठ गोलंदाज सन्मान पर्पल कॅपचा मानकरी ठरला होता. सत्यजितने एकूण २५ बळी घेत वसंत रांजणे पर्पल कॅप चा बहुमान मिळवला. त्याला यंदादेखील त्याच्या रत्नागिरी जेट्स या संघाने संघात कायम ठेवले आहे ( रीटेन केले आहे). तसेच नाशिकचा १९ वर्षांखालील आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू साहिल पारखला देखील ईगल नाशिक टायटन्स संघाने संघात कायम ठेवले आहे. त्यामुळे या दोघांची नावे या लिलाव यादीत नाही. त्याच्या सोबतच या महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलावासाठी, अ श्रेणीत नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचा रणजीपटू मुर्तुझा ट्रंकवाला, ब श्रेणीत कुणाल कोठावदे, प्रतीक तिवारी , रोहन शेडगे व शर्विन किसवे यांची तर विवेक ईशरवाल, रविंद्र मत्ये, मुस्तानसिर कांचवाला, यासर शेख, मोहित नेगी, हर्षल सेनभक्त व ध्रुव एखंडे या १९ वर्षांखालील खेळाडूंची देखील क श्रेणीत समाविष्ट करण्यात आले आहे. अ श्रेणीसाठी रुपये ६०,०००, ब श्रेणीसाठी ४०,००० तर क श्रेणीसाठी २०,००० हि बेस प्राइज असेल. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तर्फे पुणे येथे पुरुष महाराष्ट्र प्रीमियर लीग च्या लिलावासाठीच्या एकूण ३४६ खेळाडूंच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली. त्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या बारा खेळाडूंचा समावेश आहे.

याबरोबरच महिला महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलाव यादीत नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या ईश्वरी सावकार, तेजस्विनी बाटवाल, रसिका शिंदे, प्रियंका घोडके व माया सोनवणे यांची अ श्रेणीत, ऐश्वर्या वाघ, शाल्मली क्षत्रिय, कार्तिकी गायकवाड, मधुरा दायमा यांची ब श्रेणीत तर लक्ष्मी यादव व श्रुती गीते यांची क श्रेणीत निवड झाली आहे. महिला खेळाडूंसाठी देखील अ श्रेणीसाठी रुपये ६०,०००, ब श्रेणीसाठी ४०,००० तर क श्रेणीसाठी २०,००० हिच बेस प्राइज असेल. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तर्फे पुणे येथे महिला महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या लिलावासाठीच्या एकूण २०४ खेळाडूंच्या नावाची यादी जाहीर करण्यात आली. त्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या अकरा महिला खेळाडूंचा समावेश आहे.



# न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयाच्या २१ विद्यार्थ्यांना एनएमएमएस शिष्यवृत्ती

**चांदोरी : वार्ताहर**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२४ .२५ मध्ये राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांच्या साठी आयोजित करण्यात आलेल्या एन एम एम एस या परीक्षेमध्ये विद्यालयाच्या २१ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.

विद्यालयातून परीक्षेसाठी साठ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. आणि यामधून १२ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांची शिष्यवृत्ती म्हणजेच एन एम एम एस शिष्यवृत्ती जाहीर झाली. प्रतिवर्षी नववी ते बारावी या चार वर्षांमध्ये प्रत्येकी १२ हजार रुपये या विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. तर ९ विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. यामध्ये प्रतिवर्षी नववी ते बारावी या काळात प्रत्येक विद्यार्थ्याला ९६०० रुपये मिळणार आहेत.

सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील प्रभारी प्राचार्य अंबादास चौधरी व प्रभारी पर्यवेक्षक कमलाकर गावीत तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले यामध्ये विभाग प्रमुख सौ कविता गावित, बुद्धिमत्ता विशेष शिक्षिका भाग्यश्री गोसावी, गणित विषय शिक्षिका करुणा गायकवाड, विज्ञान विषय शिक्षिका सुजाता बिरारी व दीपक पगार यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथजी शिंदे साहेब, विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष व उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे सदस्य माणिक गायखे, तसेच विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे सर्व सदस्य, पालक शिक्षक संघ माता पालक संघ शाळा व्यवस्थापन समिती स्थानिक स्कूल कमिटी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब कापडणीस, उपमुख्याध्यापिका संगीता भदाणे, पर्यवेक्षक जयवंत जी ठाकरे, अनिल महाजन या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# व्हेटिंलेटरवर असलेल्या महिलेवर लैंगिक अत्याचार

**गुरुग्राम :**

एका नामांकित रुग्णालयात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडलीय. रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या महिलेलावर बलात्कार झाल्याची घटना घडलीय. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. रुग्णालयात व्हेटिंलेटरवर असलेल्या महिलेवर नराधमाने लैंगिक अत्याचार केला. विशेष म्हणजे ही घटना जेव्हा घडली त्यावेळी दोन नर्स देखील अतिदक्षता विभागात होत्या.

पीडितेच्या जबाबावरून पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध लैंगिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला एअर हॉस्टेस म्हणून काम करत असून ती मूळची पश्चिम बंगालची राहणारी आहे. ही महिला एका कंपनीत एअर होस्टेस आहे. पीडिता कंपनीच्या वतीने प्रशिक्षणासाठी गुरुग्रामला आली होती. दरबारीपूरजवळ प्रशिक्षण चालू होते.

# फिडे आर्बिटर पदवीने दिवेकर, गंधगोळे यांचा सन्मान!

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील बुद्धिबळ क्षेत्राला दिशा देणाऱ्या चैतन्य दिवेकर आणि प्रमोद गंधगोळे यांचा नुकताच फिडे आर्बिटर पदवीने सन्मान करण्यात आला.सायप्रस येथील बुद्धीबळ परिषदेमध्ये याची घोषणा करण्यात आली. ही पदवी जागतिक बुद्धीबळ महासंघाद्वारे दिली जाते.



चार दशकांहून अधिक अनुभव असलेले प्रमोद गंधगोळे नाशिकच्या बुद्धिबळ क्षेत्रातील एक प्रतिष्ठित नाव आहे. बुद्धिबळाच्या सखोल जाणिवा आणि नियमांचे अचूक ज्ञानामुळे महाराष्ट्राच्या बुद्धिबळ वर्तुळात त्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. आता फिडे ऑर्बिटर या नव्या जबाबदारीत, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्यांचे निर्णयग्रहण कौशल्य निर्णायक ठरणार आहे. चैतन्य दिवेकर नाशिकच्या बुद्धिबळ क्षेत्रात नव्या नेतृत्वाचा चेहरा म्हणून उदयास आले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनामुळे आणि संघटन कौशल्यामुळे नाशिकमधील बुद्धिबळ स्पर्धांचा दर्जा वाढला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे नाशिक आता व्यावसायिक बुद्धिबळ स्पर्धांसाठी महत्त्वाचे केंद्र बनत आहे. माजी राज्य विजेते आणि बुद्धिबळ प्रशिक्षण अकादमी रेवोलुशनरी चेस क्लबचे सहसंस्थापक, गणेश ताजणे यांनी सांगितले, चैतन्य दिवेकर आणि प्रमोद गंधगोळे सर यांचे हे यश नाशिकच्या बुद्धिबळ क्षेत्रासाठी नव्या पर्वाची सुरुवात ठरणार आहे.

# तक्षशिला विद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान विकास केंद्र संचलित तक्षशिला विद्यालयामध्ये बाबासाहेबांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या २८ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. संजय जाधव, करूणासागर पगारे, मुख्याध्यापक संदीप पांडे, शिक्षिका नंदिनी पगारे, नीलिमा राऊत, लक्ष्मण देवरे आदींची प्रमुख उपस्थिती होत. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. बुद्ध वंदना व भीमस्तुती घेण्यात आली. १८ तास अभ्यास करण्याच्या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली. शिक्षक लक्ष्मण देवरे यांनी बाबासाहेबांच्या कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांना लाडू वाटप झाले.

पान १ वरून

## दर्ग्यावर कारवाई : १५ पोलीस जखमी

समजावले. मात्र, त्यांनी कोणाचेही न ऐकता दगडफेक सुरु केली. त्यामुळे पोलिसांना अश्रुधूर आणि सौम्य लाठीमार करत जमावाला पांगवले. काठे गल्ली सिग्नलजवळीत सर्व्हे क्र. ४८०, ३ अ. ३ ई, ६ या महापालिकेच्या भूखंडावर हा दर्गा गेल्या अनेक वर्षापासून होता. स्थानिकांच्या आक्षेपानंतर २३ फेब्रुवारी रोजी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने दर्ग्याभोवतीचे अतिक्रमण जमीनदोस्त केले होते. तर ट्रस्टने सातपीर दर्ग्याचे उर्वरित बांधकाम वाचविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. न्यायालयाने सदर बांधकाम अनधिकृत असल्याचे निरीक्षण नोंदविल्यानंतर याचिकाकर्त्यांनी याचिका मागे घेतली होती. त्यानंतर महापालिकेने सदर बांधकाम स्वतःहून काढून घेण्याचे ट्रस्टला नोटिसीद्वारे सूचित केले होते. त्याबाबतची नोटीस दर्ग्याच्या भिंतीवर चिकटविण्यात आली. मात्र दर्गा ट्रस्टने कोणतीही कार्यवाही न केल्याने अखेर महापालिकेनेच पुढाकार घेत दर्ग्याची जागा मोकळी केली.

## द्रमुकशी युती; हेच यांचे हिंदुत्व का

ज्यांना मोदी यांनी कुंभमधील गंगाजल दिले. शिवसैनिकांचे मनोधैर्य कधीही खचणार नाही. तसेच तुम्ही कधी हिंदू झालात, आम्हला हिंदू शिकवू नये, अशी टीकाही राऊत यांनी भाजपवर केली

**संघाने दलित व्यक्तीला सरसंघचालक करावे**

कॉग्रेसने मुस्लिम समाजाच्या व्यक्तीला अध्यक्ष का केले नाही. असा आरोप भाजपने केला. मग मला विचारायचे आहे की, राष्ट्रीय स्वयसंघाने आतापर्यंत किती दलित व्यक्तींना सरसंघचालक केले. संघाने दलित सरसंघचालक करुन दाखवा. असे आवाहन ठाकरे यांनी करत शिवजयंतीच्या दिवशी देशात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याची मागणी केली.

## 'बाळासाहेब असते तर लाथच मारली असती'

सायंकाळी गळे घातले, वक्फच्या विरोधात मतदान केले, राममंदिराला सातत्याने विरोध करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसले, ३७० रद्द करणाऱ्याला विरोध करणाऱ्यांना पाठिंबा दिला, वाझेसारख्यांकडून वसुली करवून घेतली, डेडबॉगी बॅगमध्येही घोटाळे केले, कोविड काळात खिचडीत घोटाळे केले, मराठी माणसांच्या घरात घोटाळे करुन गल्ले भरले, त्यांच्या बुडावर बाळासाहेबांनी लाथच घातली असती असे बावनकुळे म्हणाले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील **घर नंबर १०६५/१६, न्यू खदीजा को ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड, वडनेर रोड, देवळाली** हे **श्रीमती बिलकीस अब्देअली तवावाला** यांच्या नावावर असून त्यांनी सदर प्रॉपर्टी रजिस्टर्ड हस्तांतरण दस्त खताद्वारे **श्री. होझेफा सैफुद्दीन अनाजवाला** यांना दिलेली असून **श्री. होझेफा सैफुद्दीन अनाजवाला** यांनी सदर रजिस्टर्ड हस्तांतरण दस्ताद्वारे सदर प्रॉपर्टीवर आपले नाव लावण्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे रितसर अर्ज केलेला आहे त्यास कोणाची हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड देवळाली कॅम्प यांचेकडे लेखी स्वरूपात अथवा ई-छावनी माध्यम द्वारा तक्रार नोंदवावी, सदर मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही तक्रार व हरकती विचारत घेतल्या जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

**अर्जदार/-**
**श्री. होझेफा सैफुद्दीन अनाजवाला**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील **घर नंबर १२६०, हरीज्योत अपार्टमेंट, आडके नगर, देवळाली** हे मयत **जीवतराम निहलानी** यांचे नावावर असून ते मयत झाल्याकारणाने मयताचे कायदेशीर वारस म्हणून (१) **श्री. जयंतकुमार जीवतराम निहलानी** (२) **श्री. हरीष जीवतराम निहलानी** (३) **श्रीमती पुष्पा जीवतराम निहलानी** (४) **श्रीमती मीना वासुदेव कुकरेजा** (५) **श्रीमती योगिता किशन सुगंध** (६) **श्री. विक्रम किशन सुगंध** यांनी सदर प्रॉपटी रजिस्टर्ड डीड ऑफ अपार्टमेंट खताद्वारे **श्री. दिलीपसिंग कालुसिंग हितांगे** यांना दिलेली आहे. **श्री. दिलीपसिंग कालुसिंग हितांगे** यांनी सदर रजिस्टर्ड दस्ताद्वारे सदर प्रॉपटीवर आपले नाव लावणेसाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे रितसर अर्ज केलेला आहे. त्यास कोणाची हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड देवळाली कॅम्प यांचेकडे लेखी स्वरूपात अथवा ई-छावनी माध्यम द्वारा तक्रार नोंदवावी. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही तक्रार व हरकती विचारत घेतल्या जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

**अर्जदार /-**
**श्री दिलीपसिंग कालुसिंग हितांगे**

**ग्रामपंचायत चाटोरी ता. निफाड जि.नाशिक**

## जाहीर निविदा सूचना २०२५-२०२६

ग्रामपंचायत चाटोरी ता.निफाड,जि.नाशिक सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता साहित्य पुरवठा करणेकामी ई- निविदा नोंदणीकृत पुरवठा दाराकडून ऑनलाइन मागविण्यात येत आहे. दिनांक १२/०४/२०२५ ते १७/०४/२०२५ ला सायं ४.०० वाजेपर्यंत निविदा भरण्यात येईल. तसेच १८/०४/२०२५ ला दु ४.०० वा. निविदा उघडण्यात येईल उपरोक्त निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाइन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

**सही /- ग्रामसेवक सही सरपंच व उपसरपंच**
**ग्रामपंचायत चाटोरी, ता. निफाड, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय, शिंदे ता. जि. नाशिक**

## जाहीर ई- निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत शिंदे ता. जि. नाशिक येथे Construction Gaon Vesh@ shinde Tal Dist Nashik विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. १६/०४/२०२५ ते २३/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत शिंदे, ता. जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय आंबेगण, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

## जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६

ग्रामपंचायत कार्यालय आंबेगण ता. दिंडोरी जि. नाशिक येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०२४-२५,१५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक १६/०४/२०२५ पासून ते २३/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय आंबेगण, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय आंबेगण ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत चांदशी ता. नाशिक जि. नाशिक**

## जाहीर निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६(प्रथम प्रसारण)

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत चांदशी ता. नाशिक जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी प्रमाणपत्र, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा दिनांक १७/०४/२०२५ सकाळी १०.०० वा. पासून ते दिनांक २३/०४/०२०२५ सायंकाळी ५.०० वा (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत चांदशी येथे जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक २४/०४/२०२५ सकाळी १०.०० वा. ग्रामपंचायत चांद्शी येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्या नंतर सदरच्या निविदासंबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत चांदशी ता. जि. नाशिक नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

कामाचे नाव-01) SEGREGATION UNIT AT GRAMPANCHAYAT CHANDSHI TAL DIST NASHIK 96900/- 2)SEGREGATION UNIT AT GRAMPANCHAYAT CHANDSHI TAL DIST NASHIK 96900/-

**सही- ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक**
**ग्रामपंचायत चांदशी ता. नाशिक जि. नाशिक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **१) मिळकतीचे वर्णन :** मौजे तुकडी जिल्हा परिषद नाशिक पैकी पोट तुकडी नाशिक तालुका पंचायत समितीपैकी **मखमलाबाद** गावाचे हद्दीतील मिळकत शेतजमीन **गट नंबर ३४३/२** यांसी एकूण **क्षेत्र २ हे. २१.५६ आर** यांसी आकारणी **० रुपये ६२ पैसे** ही **श्रीमती. पार्वताबाई महादू शेवरे** यांचे मालकीची दरोबस्त शेत मिळकत असे. २) वर वर्णन केलेली मिळकत ही **श्रीमती. पार्वताबाई महादु शेवरे उर्फ जिजाबाई महादु शेवरे** यांचे मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे. **श्रीमती. पार्वताबाई उर्फ जिजाबाई** ह्या **दिनांक २३/०६/२०२३** रोजी मयत झालेल्या असून सदर मयतास **शिवाजी महादू शेवरे (मुलगा), त्रंबक महादू शेवरे (मुलगा)**, तसेच **लहानुबाई गेनू वायकांडे** असे कायदेशीर वारस असून सदर मिळकतीस **पार्वताबाई उर्फ जिजाबाई महादू शेवरे** या दोनही नावाची एकच व्यक्ती असून सदर व्यक्तीस वरीलप्रमाणे कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त उपरोक्त मिळकतीस कोणाचीही नावा बाबत काहीही हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **दहा** दिवसांच्या आत आमचे खालील नमूद पत्त्यावर लेखी हरकत पुराव्याच्या कागदपत्रांनिशी नोंदवावी. मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर योग्य त्या कायदेशीर नोंदी केल्या जातील व मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. कळावे, ही नोटीस. **ता.१६/०४/२०२५**

**श्री. आर. वी. जोपळे, अॅड. संस्कार जोपळे**
**बी-३, महादेव कॉम्प्लेक्स, सीबीएस, नाशिक. मो.८०८७१३३३६६**

## जाहीर निवेदन

तमाम सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **कै. रमेश गणपत राजगिरे** राहणार दौलत नगर सिडको ता. जि. नाशिक यांचे **दि. ०८/०२/२०२०** रोजी निधन झाले असून, त्यांना खालीलप्रमाणे आम्ही कायदेशीर वारस आहोत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती चंद्रकला रमेश राजगिरे | ५३ | पत्नी |
| २ | प्रवीण रमेश राजगिरे | ३६ | मुलगा |
| ३ | नितीन रमेश राजगिरे | ३५ | मुलगा |
| ४ | किरण प्रवीण चव्हाण | ३२ | मुलगी |
| ५ | सोन्याबाई गणपत राजगिरे | ८५ | आई |

हे कायदेशीर वारस असून यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाहीत. तरी कोणाचीही काही हरकत असल्यास **मा. तहसिलदार मा.सो. नाशिक** यांचेकडे **सात** दिवसांच्या आत लेखी खुलासा करावा, अन्यथा **मा. मे. तहसिलदार सो. नाशिक** यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. याची नोंद घ्यावी, सदर प्रमाणपत्र शासकीय कामकाजासाठी देण्यात येणार आहे.

**तहसिलदार, नाशिक**

## दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मौजे नाशिक शहर-४** येथील **सर्व्हे नं. ५३३/२ १क पैकी प्लॉट नं. १९ यांसी क्षेत्र ५७४.४१ चौ.मी.** या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **युनियन पार्क को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी** या सोसायटीतील पहिल्या मजल्यावरील **फ्लॅट नं. ०५** यांसी एकूण बांधीव **क्षेत्र ५४.३६ चौ.मी.** सदर फ्लॅट मिळकत **श्री. महेंद्र रणछोडदास राणा** यांच्या मालकीची मिळकत आहे. सदर मिळकतीसंदर्भात पूर्वीचे चेन दस्त यांसी **१. युनायटेड बिल्डर्स** यांनी **भालचंद्र पंडितराव कुलकर्णी** यांचे लाभांत मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांचे कार्यालयात **दिः २५/०५/१९८९** रोजी नोंदविलेला करारनामा दस्त, व **२. पूजा हॉटेल्स प्रा.लि.** यांनी **युनियन पार्क को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी तर्फे चेअरमन** यांचे लाभांत मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक- १ यांचे कार्यालयात दिः ०६/०९/१९९१ रोजी नोंदविलेला **सेल डीड दस्त क्र. ७०८१/९१.** सदर दोन्ही दस्तांची मूळ प्रत व नोंदणी पावती मिळकत मालकांपासून गहाळ झाली/हरवली आहे. उपरोक्त मिळकत मालकांनी सदर दोन्ही दस्तांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीररित्या सांगितले आहे. तत्राप, सदर दोन्ही दस्तांची मूळ दस्त व त्याची नोंदणी पावती कोणासही सापडून/मिळून आल्यास त्यांनी कृपया खालील पत्यावर आणून द्यावी तसेच सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध अगर करारमदार व बोजा असल्यास अगर सदर मिळकत निर्वेध व बोजविरहित असल्याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास त्यांनी **०७ (सात)** दिवसांचे आत आमचे खालील नमूद पत्यावर संपर्क साधावा. याउपरही उपरोक्त मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बोजारहित समजून तसा दाखल देण्यात येईल. कळावे, ही जाहीर नोटीस.

**नाशिक. १६/०४/२०२५.**

**अॅडव्होकेट- इब्राहिम बाकीर धुलियावाला**
**डी- १०, श्रीरामकुंज सोसायटी, टाकळी रोड, नाशिक, मोः ९०२८१७५४५०.**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/९४६/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.०६/०३/२०२५

एस.आर.एन.क्रमांक NSK/46480/1860/24

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक गुरूकृपा बहुउद्देशीय सामाजिक संस्था करंजाळी बाबत।**
**न्यासाचा पत्ता :- को. तुषार लक्ष्मण टोपले,** अट पोस्ट-१८७/१, करंजाळी, टाळ पेठ-डिस्ट्र. नाशिक.
**अर्जदार- तुषार लक्ष्मण टोपले**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | CASH IN HAND | १४०७.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. १४०७/- मात्र
(अक्षरी रुपये एक हजार चारशे सात मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

ब) स्थावर मिळकतः रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०६-०३-२०२५ रोजी दिली.

**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा-साकुरफाटा,ता.इगतपुरी, जि.नाशिक**

## - गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस -

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन - अ) मौजे बेलु, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमिन मिळकत गट नं. २४२ यांसी क्षेत्र हे. २-८६ आर. पो. ख. हे. ०-०१ आर. आकार रु. ८-२५ पैसे. यापैकी आकाश बाळकृष्ण तुपे यांचे खरेदी मालकीचे क्षेत्र हे. ०-९५ आर. आकार रु. २-७४ पैसे. ब) मौजे बेलु, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमिन मिळकत गट नं. २४२ यांसी क्षेत्र हे. २-८६ आर. पो. ख. हे. ०-०१ आर. आकार रु. ८-२५ पैसे. यापैकी बाळकृष्ण अमृता तुपे यांचे खरेदी मालकीचे क्षेत्र हे. ०-४८ आर. पो. ख. हे. ०-००.५० आर. आकार रु. १-३८ पैसे. क) मौजे बेलु, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमिन मिळकत गट नं. २४३ यांसी क्षेत्र हे. ६-३० आर. + पो. ख. हे. ०-१० आर. आकार रु. १२-०३ पैसे. यापैकी बाळकृष्ण अमृता तुपे यांचे खरेदी मालकीचे क्षेत्र हे. ०-२१ आर. पो. ख. हे. ०-०५ आर. आकार रु. ०-४० पैसे. ड) मौजे आगासखिंड, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमीन मिळकत गट नं. २७६ यांसी क्षेत्र हे. ४-३८ आर. पो. ख. हे. ०-७७ आर. आकार रु. ५-१५ पैसे. यापैकी बाळकृष्ण अमृता तुपे व आकाश बाळकृष्ण तुपे हे भारत बाबुराव खर्जुल व सुनिल बाबुराव खर्जुल यांचेपासून खरेदी घेत असलेले खाते नं. ४५५ वरील संपुर्ण क्षेत्र हे. ०-६० आर. आकार रु. ०-०० पैसे. यांसी चतुःसिमा रे. ऑ. रा. प्रमाणे.

२) कर्जदाराचे नांव : श्री. आकाश बाळकृष्ण तुपे, श्री. बाळकृष्ण अमृता तुपे
३) कर्जाचा प्रकार :- जमिन गृहतारण
४) पतसंस्थेचे नांव :- श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा-साकुरफाटा, ता. इगतपुरी, जि. नाशिक
५) नोटीसचा उद्देश :- टायटल व्हेरिफिकेशन
६) वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ४ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत तारण ठेवून कर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक यांचे संमतीने पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकत तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.
१) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक यांचे मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामिनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून कर्ज देणेकामी तारण गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करणेकामी पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस, स्थळ सिन्नर, दिनांक २५/०३/२०२५

आमचे मार्फत प्रसिध्द

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे** (अॅडव्होकेट)
ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस अॅडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट अॅण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७**

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

### Name changed

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

### जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-८७८८०९२४१५**

### विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

### हरवले आहे

प्रतिनिधीचे नाव कार्तिक कांबळे कर्मचारी आयडी - २४११३६००३२०१४२३ एजन्सीचे नाव - ashpa global services pvt. एचडीएफसी बँकेचे ओळखपत्र हरविले आहे तरी सदरील आयकार्ड कुणाला आढळून आल्यास कृपया **अभिजीत खरात ९७३०२१७९०७** या क्रमांकावर संपर्क साधावा

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**


# अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची उरणला भेट

**चांदवड : वार्ताहर** येथील श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित स्व.सौ. कांताबाई भवरलालजी जैन अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची गॅस टर्बाइन वीज प्रकल्प,उरण येथे अभ्यास भेट आयोजित करण्यात आली होती. अभ्यासक्रमाचा भाग असलेल्या या उपक्रमात उरणमधील गॅस टर्बाइन वीज प्रकल्प येथे विद्यार्थ्यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी गॅस टर्बाइन वीज केंद्रातील विविध महत्त्वाचे घटक प्रत्यक्ष पाहिले व त्याविषयी माहिती घेतली. त्यांनी वेस्ट हीट रिकव्हरी बॉयलरची कार्यपद्धती समजून घेतली, जो वीज निर्मिती प्रक्रियेत उष्णतेचा पुनर्वापर करून कार्यक्षमता वाढवतो. तसेच वीज निर्मितीमध्ये गॅस आणि स्टीम टर्बाइनच्या एकत्रित वापरावर आधारित 'कंबाइंड सायकल' ही संकल्पना विद्यार्थ्यांनी समजावून घेतली.याशिवाय वीज प्रकल्पांमध्ये वापरली जाणारी सुसज्ज उपकरणे, नियंत्रण प्रणाली आणि वाद्यमापन तंत्रज्ञान याबाबत त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

## महत्त्वाचे

### दादा भुसेंच्या उपस्थितीत आढावा बैठक लांबणीवर

**नाशिक :** राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे प्राथमिक शिक्षण विभागाचा आढावा काल (दि.१६) घेणार होते. परंतु व्यस्त कार्यक्रमांमुळे जि.प. बैठकीस हजर राहू शकले नाही. सकाळी दहा वाजता जिल्हा परिषद सभागृहात ही बैठक होणार होती. आढावा बैठकीच्या निमित्ताने शिक्षण विभागात विविध कामांची पूर्तता करण्यासाठी लगबग दिसून आली. विभागाचे सुशोभीकरण, माहितीपर पोस्टर्स लावण्यात आल्याचे दिसून आले. शालेय शिक्षण विभागाचा बोर्डासह,विविध शाळांमधील उपक्रमांचे भित्तिपत्रके लावण्यात आले होते. शाळेच्या पहिल्या दिवस विद्यार्थ्यांचे स्वागत तयारी,आदर्श शाळा.मोहिम,सुपर ५० उपक्रम, शिक्षक संस्था अधिकारी यांनी राबविलेले विविध उपक्रम याबाबत बैठकीत चर्चा होणार होती. मात्र, ऐनवेळी ही बैठक रद्द करण्यात आल्याने करण्यात आलेली सर्व तयारी वाया गेली. आता पुढील आठवड्यात ही बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले.

### सिडकोत टोळक्याचा कारवर हल्ला

**सिडको :** सिडको परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास एका युवकाच्या गाडीवर चार जणांच्या टोळक्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात इर्टिगा गाडीच्या दोन्ही बाजूच्या काचा फोडण्यात आल्या. धारदार शस्त्राने गाडीवर हल्ला करून गंभीर दहशत निर्माण करण्यात आली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी निशांत संजय गुंडे (वय २५, रा. समता चौक, राजवाडा, कामटवाडे, नाशिक) हे दि. १५ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास स्वतःच्या एमएच ०५ एक्स एक्स ५०५० क्रमांकाच्या इर्टिगा कारने घरी जात होते. ते सिडकोतील सुलभ शौचालयाजवळ आले असताना राजा वाकळे, अर्जुन वाकळे आणि त्यांच्या दोन साथीदारांनी त्यांची गाडी अडवून त्यांनी गाडीच्या दोन्ही बाजूच्या काचा फोडल्या. इतक्यावरच न थांबता, त्यांनी गाडीच्या आत दगड फेकून जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर धारदार शस्त्राने गाडीच्या बोनटवर वार करण्यात आला आणि गंभीर स्वरूपाची शिवीगाळ करत दमदाटी करण्यात आली. घटनेनंतर निशांत गुंडे यांनी अंबड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी पुढील तपास अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड पोलीस करीत आहे.




### जनता विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**कोल्हाटे :** येथील मविप्र संचलीत जनता विद्यालय व अभिनव बालविकास मंदिर शाळेमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रंजना घंगाळे या होत्या. आपल्या भाषणात त्यांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय जीवनावर प्रकाश टाकला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी केलेले योगदानाविषयी यथोचित माहिती सांगून सर्वांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी आस्था पाचोरकर व उज्ज्वला बदादे यांनी केले तर संयोजन विद्या कदम यांनी पार पाडले. विद्यालयाच्या शिक्षिका आदिती पांडव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांपैकी प्रणव मालसाने, आदित्य मालसाने, सेजल मोरे, आस्था पाचोरकर, तेजल बदादे यांनी मनोगतात त्यांना समजलेले बाबासाहेबांचे चरित्र मांडले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. याप्रसंगी वरिष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे, नरेंद्र साळुंके तसेच सर्व सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सेजल मोरे हिने आभार मानले.

### महामानव डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**सिडको :** म.वि.प्र. समाज संचलित अभिनव बालविकास मंदिर, उत्तमनगर येथील शाळेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. विश्वभूषण, थोर अर्थतज्ञ, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्ववंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी शाळेतील उपशिक्षिका गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. त्यानंतर मुख्याध्यापिका ज्योती पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा आपल्या जीवनात अवलंब करावा, असे उपस्थितांना आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या अर्चना आहेर यांनी सगळ्यांचे आभार मानत, कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमासाठी. शाळेच्या मुख्याध्यापिका पवार यांच्यासह बच्छाव, पूर्व प्राथमिक शाळेच्या शिक्षिका मुळे मुरकुटे, त्याचबरोबर प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# सिडकोत अवैध सावकारीचा पर्दाफाश

## अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**गेल्या आठवड्यात नाशिक शहरातील विविध खासगी सावकारीचा धंदा करणाऱ्यांच्या विरोधात पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली. या कारवाईत अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोणताही खासगी सावकार मिळून आला नसला तरी आठ दिवस उलटत नाही तोच पुन्हा सिडको परिसरात सुरू असलेल्या अवैध सावकारी व्यवसायाचा आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खुटवडनगर येथील विवेक मुन्नाजी राणे या सावकाराविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या प्रकरणाची सुरुवात झाली जेव्हा पीडित व्यक्तीने पोलिस आयुक्त कार्यालयात तक्रार दाखल केली. या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विवेक उर्फ मुन्नाजी राणे या खासगी सावकाराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अंबड पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, राणे याने तक्रारदाराला दीड लाख रुपये व्याजाने दिले होते. त्यावर आधीच १ लाख ८० हजार



रुपये परत घेण्यात आले. मात्र, त्यानंतरही १ लाख ६० हजार रुपयांची पुन्हा मागणी करण्यात आली. ही रक्कम मिळाली नाही म्हणून त्याने पीडिताची कार बळजबरीने ओढून नेली. यामध्ये धमकी व आर्थिक छळ यांचा समावेश होता.

या घटनेनंतर सिडको परिसरातील नागरिकांमध्ये एक प्रकारची भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, मुन्नाजी राणे याच्या कर्जवसुलीच्या पद्धती अत्यंत आक्रमक असून, आधी कमी व्याजदर सांगून नंतर दबाव व धमकीच्या माध्यमातून जास्तीची रक्कम वसूल केली जाते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी सांगितले की, अवैध सावकारीविरोधात आमचा तपास सुरू आहे. या प्रकरणात केवळ एका व्यक्तीचीच नव्हे तर अनेकांची

### सावकारांविरोधात विशेष मोहीम

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध सावकारांविरोधात विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, नागरिकांनी कोणत्याही दबावाला न घाबरता तक्रारदारांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार करण्याचे आवाहन केले जात आहे. या प्रकरणामुळे पुन्हा एकदा अवैध सावकारीचे गंभीर स्वरूप समोर आले असून, प्रशासनानेही याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

फसवणूक झाल्याची शक्यता आहे. त्यामुळे जे कोणी मुन्ना राणे किंवा इतर कोणत्याही अवैध सावकारांकडून फसवले गेले असतील त्यांनी तातडीने अंबड पोलीस ठाण्यात तक्रार करावी. सिडको परिसरात अशा प्रकारचे अनेक बेकायदेशीर सावकारी प्रकरणे उघडकीस येत असून, मागील काही महिन्यांत १५ ते १६ अवैध सावकारांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये व्याजदराचे कोणतेही अधिकृत प्रमाण नसून, कर्जदारांकडून जबरदस्तीने जास्त रक्कम वसूल केली जात आहे.

## वृक्षतोड रोखण्यासाठी पर्यावरण विभागाकडून कार्यवाहीच्या सूचना

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आयटीआय पूल ते वावरेनगर येथे वीस कोटी रुपये खर्च करून नवीन काँक्रिट रस्त्याच्या कामासाठी प्रस्तावित असलेल्या सुमारे ४८ झाडांच्या तोडीविरोधात पर्यावरणप्रेमींनी आवाज उठवल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने याची गंभीर दखल घेत वृक्षतोड रोखण्यासाठी पर्यावरण विभागाकडून कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

निसर्गसेवक युवा मंचाचे संस्थापक अध्यक्ष अमित कुलकर्णी यांनी २७ फेब्रुवारी २०२५ रोजी पर्यावरण मंत्री कार्यालयास ई-मेलद्वारे तक्रार केली होती. यामध्ये त्यांनी नमूद केले की, रस्ता विकासकामाच्या नावाखाली पर्यावरणपूरक व जुन्या झाडांची कत्तल करण्यात येत आहे, जी पर्यावरणासाठी धोकादायक आहे. या तक्रारीवर तात्काळ प्रतिसाद देत पर्यावरण विभागाने डॉ. रोहिणी पाटील (कक्ष अधिकारी) यांच्या सहीने, उपआयुक्त तथा वृक्ष अधिकारी, नाशिक महानगरपालिका यांना पत्र

> आयटीआय ते वावरेनगर येथील रस्ता रुंदीकरणामध्ये ४८ झाडांचा बळी जाणार आहे. या वृक्षतोडीला विरोध म्हणून निसर्गसेवक युवा मंचतर्फे हरकत होती. त्याविषयी १८/०२/२०२५ ला पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे तक्रार केली होती. तक्रारीची दखल घेऊन उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी यांना योग्य ती कारवाई करून प्रशासनास व तक्रारदार यांना कळवण्याचे आदेश देण्यात आले आहे. आता नाशिक महानगरपालिका काय कारवाई करते ते बघणार आहोत.
> **– अमित कुलकर्णी,** अध्यक्ष, निसर्गसेवक युवा मंच

पाठवले आहे. सदर पत्रात झाडांची प्रस्तावित तोड थांबवून योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच अर्जदाराला झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यास सांगण्यात आले असून, शासनालाही यासंदर्भात अवगत करण्याचे निर्देश आहेत.

## जि.प. अनुकंपा पोर्टलवर आठ दिवसांत ४९ जणांनी केली नोंदणी

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेने अनुकंपा पोर्टलचे नुकतेच अनावरण केले आहे. अवघ्या आठ दिवसांत ४९ जणांनी या पोर्टलवर नोंदणी केली असून, मागील वर्षात ज्यांनी अनुकंपासाठी अर्ज केला होता त्यांचीही नोंदणी करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेच्या अनुकंपा पोर्टलमुळे कागदोपत्री लागणारा वेळ कमी होणार आहे. पोर्टलवर नोंदणी केल्याने पारदर्शकता प्रत्येक टप्प्यावर अर्जाचा मागोवा घेणे शक्य होणार आहे. कागदविरहित यंत्रणा पर्यावरणस्नेही दृष्टिकोनातून सुलभ प्रक्रिया आहे. अर्जदारांना कार्यालयीन दगदग न करता घरूनच सर्व प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्दैवी मृत्यूंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरीची संधी मिळावी यासाठीच्या प्रक्रियेत अनावश्यक




विलंब होत होता. या अडचणीवर मात करीत जिल्हा परिषदेने अनुकंपा प्रक्रियेचे संगणकीकरण करून पारदर्शक, कार्यक्षम आणि कागदविरहित प्रणाली विकसित केली आहे. यामुळे दिवंगत अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना अनुकंपा भरती प्रक्रियेमध्ये अधिक सोयीस्कर आणि जलद सेवा मिळणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी स्पष्ट केले आहे.

अर्ज करतांना आधार क्रमांक आवश्यक शैक्षणिक व अन्य कागदपत्रे पीडिएफ स्वरूपात अपलोड करता येतात. संबंधित शाखा अधिकाऱ्यांकडे प्राथमिक तपासणीसाठी हे अर्ज वर्ग केले जातात. त्यानंतर चौकशी अहवाल तयार करून विभागप्रमुखांकडे सादर केला जातो.

## प्रसाद हिरे यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपला मोठे बळ : ना. बावनकुळे

### मुंबईत शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्याच्या विकासात मोलाचे योगदान देणारे तत्कालीन महसूलमंत्री कर्मवीर भाऊसाहेब हिरे, माजी मंत्री स्वर्गीय डॉ. बळीराम हिरे यांचा वारसा लाभलेल्या प्रसाद हिरे आणि त्यांच्या हजारो समर्थक कार्यकर्त्यांच्या पक्षप्रवेशामुळे नाशिक जिल्ह्यातच नव्हे, तर उत्तर महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला मोठे बळ मिळणार असून, या भागाच्या विकासाला देखील अधिक गती मिळणार आहे, असे उद्गार भाजप नेते, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

मुंबईतील नरिमन पॉइंट येथील भाजप प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, उच्चतंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, आ. सीमाताई हिरे यांच्या उपस्थितीत प्रसादबापू हिरे यांच्या पत्नी गीतांजलीताई हिरे,



### भाजपच्या माध्यमातून जनसेवेसाठी कटिबद्ध : हिरे

मालेगावसह संपूर्ण जिल्ह्याचा विकास व्हावा आणि सर्वसामान्यांची कामं व्हावीत याच प्रामाणिक भावनेने देशातील सर्वांत मोठ्या असलेल्या भारतीय जनता पक्षात आज पुन्हा सहभागी होत असताना मनस्वी आनंद होत आहे. आपण भाजपमध्ये कोणत्याही पदासाठी सहभागी झालेलो नाही. लोकांची कामे करून त्या माध्यमातून जनसेवेसाठी मी भाजपमध्ये प्रवेश करीत आहे. किंबहुना ही आपली घर वापसीच आहे, अशी भावना प्रसादबापू हिरे यांनी यावेळी व्यक्त केली.

युवानेते प्रणवदादा हिरे, युवानेत्या प्रांजलीताई हिरे आणि त्यांच्या हजारो समर्थक कार्यकर्त्यांचा भाजप पक्षप्रवेश सोहळा काल पार पडला. प्रदेश मीडिया सेलचे प्रमुख नवनाथ बंग यांनी सूत्रसंचलन केले.

### पक्षप्रवेशाचे स्वागत

भाजपचे नेते महेश हिरे, आमदार सीमाताई हिरे, माजी जिल्हाध्यक्ष दीपक पवार, दादा जाधव, नीलेश कचवे, लकी गिल, कमलेश निकम, हरिप्रसाद गुप्ता, भरत पोफळे, नितीन पोफळे, अरुण माळली, श्याम गांगुर्डे आदींनी प्रसाद बापू हिरे यांच्या पक्षप्रवेशाचे स्वागत केले.

**मालेगावमधून ५०० वाहने**

प्रवेश सोहळ्यासाठी मालेगावातून ५०० पेक्षा अधिक वाहनांनी हजारो कार्यकर्ते मुंबईत दाखल झाल्याने नरिमन पॉइंट परिसरातील रस्ते गर्दीने फुलून गेले होते. यावेळी शेकडो कार्यकर्ते भाजपात दाखल झाले.

## राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षपदी दत्तात्रय पाटील

### मुंबईत जयंत पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

**पंचवटी : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी खेडगावचे दत्तात्रय रामचंद्र पाटील यांची प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नियुक्ती केली असून, त्यांना मुंबई येथे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. दरम्यान. दत्तात्रय पाटील यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची भेट घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस फुटीनंतर शरदचंद्र पवार यांच्यासमवेत खेडगावचे दत्तात्रय पाटील यांनी एकनिष्ठ राहत शरदचंद्र पवार यांची साथ दिली. त्यानंतर लोकसभा व विधानसभा निवडणुकीतदेखील पक्षासाठी योगदान दिले. याच कामाची दखल घेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांची ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड केली. दत्तात्रय पाटील यांची नियुक्ती होताच त्यांनी प्रदेश उपाध्यक्ष गोकुळ पिंगळे, शहराध्यक्ष गजानन शेलार, माजी आमदार सुनील भुसारा, माणिकराव शिंदे, लक्ष्मण मंडाले, डॉ. सयाजी गायकवाड, उदय सांगळे यांच्यासह शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. यावेळी शरदचंद्र पवार यांनी दत्तात्रय पाटील यांचे अभिनंदन करत सत्कार केला. यावेळी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस दिनेश धात्रक, प्रदेश सचिव उमेश खताळे, मालेगाव तालुकाध्यक्ष अध्यक्ष संदीप पवार, नांदगाव तालुकाध्यक्ष महेंद्र बोरसे, दिंडोरी तालुकाध्यक्ष राजाभाऊ ढगे, नाशिक विधानसभा अध्यक्ष



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची भेट घेताना दत्तात्रय पाटील, प्रदेश उपाध्यक्ष गोकुळ पिंगळे, शहराध्यक्ष गजानन शेलार, डॉ. सयाजी गायकवाड आदी.

### सुरत-चेन्नई रस्त्यासाठी गडकरींची भेट घेणार

दिंडोरी तालुक्यातील सुरत– चेन्नई हा मार्ग जाणार असल्याने याबाबत देखील शरदचंद्र पवार यांच्याशी दत्तात्रय पाटील, गोकुळ पिंगळे यांनी चर्चा केली. यावेळी येत्या १० दिवसांत शेतकऱ्यांना दिल्लीत घेऊन त्या शेतकऱ्यांशी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय कॅबिनेटच्या इतर मंत्र्यांची भेट घेऊ. त्या शेतकऱ्यांचा प्रश्न निकाली काढून त्यांना न्याय देऊ, असे पवार यांनी सांगितले.

अशोक पाळदे, चिंतामण गावित, रणजीत गावित, सोमनाथ आडके, संदीप जग, अजय बोधले, अतुल पाटील उपस्थित होते.

## भरधाव कारच्या धडकेने पादचारी महिला गंभीर जखमी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा महामार्गालगत सोमानी हॉस्पिटलसमोरील सर्व्हिस रोडवर एक गंभीर अपघात घडला. भरधाव आलेल्या वॅगनर कारने रस्ता ओलांडणाऱ्या महिलेस जोरदार धडक दिली. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली असून, अंबड पोलीस ठाण्यात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. संगीता रमण शर्मा (वय ३५, रा. आंबेबहुला, पोस्ट विल्होळी, ता. व जि. नाशिक) या महिला रस्ता ओलांडत असताना, मुंबईहून पाथर्डी फाट्याकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या वॅगनर कार (क्र. एमएच ०३ बीजे ३५८९) ने त्यांना समोरून धडक दिली. या धडकेत संगीता यांच्या डोक्याला तसेच उजव्या हाताच्या दंडाला व मनगटाला गंभीर इजा झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीला धाव घेतली आणि जखमी संगीता यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले.

डॉक्टरांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे आणि सपोनि शेख यांनी घटनास्थळी भेट दिली. संगीता यांचे पती रमण प्रमोद शर्मा (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून कारचालक घनशाम एकनाथ राठोड याच्याविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शासनाच्या महाज्ञानदीप ऑनलाइन पोर्टलचे लोकार्पण

### मुक्त विद्यापीठाच्या नेतृत्वात पाच विद्यापीठे कार्यरत

**नाशिक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस - गतिमान प्रशासन अभियानांतर्गत राज्य शासनाच्या महाज्ञानदीप ऑनलाइन शैक्षणिक पोर्टलचे लोकार्पण राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते काल ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नेतृत्वाखालील राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व एस. एन. डी. टी. विद्यापीठ मुंबई ही पाच विद्यापीठे या उपक्रमाची स्थापक विद्यापीठे म्हणून काम करत आहेत. यावेळी बोलतांना चंद्रकांतदादा पाटील यांनी या पोर्टलद्वारे सर्वांना माफक शुल्कात हे शिक्षण उपलब्ध करून द्यावे तसेच विद्यार्थ्यांना यासंदर्भात पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देखील पोर्टलवर उपलब्ध करून द्यावी असे निर्देश दिले. राज्याच्या उच्च व



> मुक्त विद्यापीठाने हे पोर्टल विकसित केले आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून यावर दोन ते चार क्रेडिटचे शिक्षणक्रम उपलब्ध होतील. त्यात आठ ते दहा मिनिटांचे तज्ञ शिक्षकांचे व्हिडिओ, त्यास पूरक संदर्भ वाचनसाहित्य उपलब्ध केले जाईल. विद्यार्थ्यांच्या सवडीनुसार त्यांचे ९० तासांचे अध्ययन झाल्यानंतर ऑनलाइन परीक्षा होतील. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या अपार आयडीवर क्रेडिट जमा केले जाईल. ज्याचा त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीसाठी उपयोग होईल.
> **-कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे**

तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करतांना या पोर्टलद्वारे जागतिक स्तरावरील गुणवत्तेच्या शिक्षणक्रमांची निर्मिती करून देशाला ते उपलब्ध करून देण्याविषयीची सूचना केली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. त्यात त्यांनी महाज्ञानदीप पोर्टलच्या कार्यप्रणाली विषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. या पोर्टलवर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, भारतीय ज्ञान प्रणाली जेनेरिक हा मराठी भाषेतील शिक्षणक्रम देखील अपलोड करण्यात आला. जो आता जगभरातील मराठी भाषिक व अभ्यासक यांना उपलब्ध असेल.

## मुक्त विद्यापीठात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणास मुदतवाढ

**नाशिक :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेस' सहा महिन्यांवरून अकरा महिन्यांची मुदतवाढ मिळाल्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने त्वरित त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी या योजनेंतर्गत यापूर्वी नियुक्त १५ प्रशिक्षणार्थींना पुढील पाच महिने पुनर्नियुक्त करण्याचे निर्देश विद्यापीठ प्रशासनास दिले आहे. प्रशिक्षणार्थी उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा, त्याच्यात कौशल्य वृद्धी व्हावी व त्यांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात असा या योजनेचा उद्देश आहे. मुदतवाढ मिळाल्याने संबंधितांनी अर्ज करावे.

# ब्लिंकर सिग्नलमुळे वाहनधारक सुसाट

## उन्हामुळे सिग्नल ब्लिंकर मोडवर

**नाशिक : प्रतिनिधी**

शहर वाहतूक शाखेने उन्हाच्या तडाख्यामुळे शहरातील ४८ पैकी ३० सिग्नल दुपारी एक ते चार या वेळेत ब्लिंकर्स मोडवर ठेवण्याचा निर्णय पोलिस वाहतूक विभागाने घेतला आहे. वाहनधारकांसह पादचाऱ्यांही सिग्नलवर न थांबता प्रवास करता यावा, उन्हाच्या तडाख्यातून काहीसा दिलासा मिळावा, यासाठी ब्लिंकर मोडवर सिग्नल ठेवण्यात आले आहे. सिग्नल ब्लिंकर मोडवर असल्याने वाहनधारक सुसाट झाले असून, यातून अपघातांची नियंत्रण मिळवण्याची शक्यता आहे.

शहरात सद्यस्थितीत ४८ सिग्नल कार्यरत आहेत. एप्रिलच्या सुरुवातीलाच पारा ४१ अंशांवर पोहोचल्याने नागरिकांना उन्हाच्या झळांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे दुपारच्या सुमारास रस्त्यावर गर्दी नसते. तरीदेखील सिग्नलवर वाहनचालकांना थांबावे लागत असल्याने उन्हाचा तडाखा बसत होता. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी याची दखल घेत शहरातील ३० सिग्नल दुपारी १ ते ४ या वेळेत ब्लिंकर्स मोडवर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

ब्लिंकर्स मोडवर सिग्नल असल्याने वाहन चालकांना सिग्नलवर थांबण्याची आवश्यकता उरलेली नाही. मात्र वाहतूक जास्त असल्यास सावधानता बाळगत त्यांना सिग्नल ओलांडावे लागणार आहे. तसेच शहरातील १८ सिग्नलवर वाहतुकीची वर्दळ जास्त असल्याने दुपारच्या वेळीही नियमीत सिग्नल यंत्रणा सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात वाहतूक शाखेच्या सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बढे यांनी अधिसूचना काढली आहे.



### ब्लिंकर्स मोडवर असलेले सिग्नल

द्रीम कॅसल, पेठ नाका, काट्या मारुती चौक, मालेगाव स्टँड, तारवालानगर, नांदूरनाका, मिर्ची ढाबा, स्वामी नारायण चौक, आरटीओ कॉर्नर, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिजाऊ चौक सिग्नल, खडकाळी सिग्नल, पाइपलाइन रोड सिग्नल, कॉलेज रोड, पारिजातनगर, जलतरण तलाव, कॅनडा कॉर्नर सिग्नल, एचडीएफसी सिग्नल, नागजी चौक, बारदान फाटा, हॉटेल पंचवटी इलाइट सिग्नल, अशोका मार्ग, त्रिमूर्ती चौक, साईनाथनगर, कलानगर, महिंद्रा सर्कल, समृद्धी टी पॉइंट, विहितगाव, जेलरोड पाण्याची टाकी.

## महत्वाचे



### के. आर. डोखळे विद्यालयात डॉ. बाबासाहेबांची जयंती उत्साहात

**पिंपळगाव बसवंत :** जवळके वणी, तालुका दिंडोरी येथील मविप्र संचलित स्व. के. आर. डोखळे माध्यमिक विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता निकम व शिक्षकवृंदांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. यावेळी बोलताना मुख्याध्यापिका सुजाता निकम म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समतेचे पुरस्कर्ते होते. कायद्याचे गाढे अभ्यासक, सामाजिक बांधिलकी जपणारे समाजसुधारक, समाजाला शिक्षणाचे महत्त्व सांगणारे थोर विचारवंत होते. समाजातील जातिभेद नष्ट करण्यासाठी आणि गरिबांना शिक्षणाचा हक्क मिळावा त्यांनी आपले जीवन समर्पित केल्याचे मुख्याध्यापिका सुजाता निकम यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक एस. एम. जाधव, जे. के. मुळाणे, व्ही. एन. कदम, संजय मोते, एस. एच. वाळूंज, एम. एच. बैरागी आदींसह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



### ओझरमध्ये तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**ओझर :** ओझर येथे दुर्गा आय केअर हॉस्पिटल नाशिक व समस्त मुस्लिम समाज, ओझर मुस्लिम समाजपंच कमेटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिरासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. के. जी. एन. कॉलनी, अहमद रजा हॉल, ओझर येथे झालेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिरात १५० हून अधिक नागरिकांनी उपस्थिती लावून नेत्रतपासणी करून घेतली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नेत्रांच्या विविध समस्यांची तपासणी केली. तपासणी पूर्णतः मोफत करण्यात आली. तसेच, अल्प दरात चष्मा ही उपलब्ध करून देण्यात आला. ज्यांना मोतीबिंदूची लक्षणे आढळली, त्यांचे ऑपरेशन दुर्गा आय केअर हॉस्पिटल, नाशिक येथे करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे आयोजक गुड्डू मौलवी आणि जुबेर शेख होते. त्यांनी संपूर्ण नियोजन व्यवस्थित करुन शिबीर व्यवस्थित पार पाडले. ओझर मुस्लिम समाज पंच कमिटीचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. प्रमुख उपस्थितीतामध्ये उस्मान पठाण, अनु अत्तर, असिफ पठाण, आयुब शेख, हैदर भाई, मोबीन पठाण, असलम भाई शेख, नियाज भाई मुल्ला, मुन्ना मंसूरी, इरफान शेख, मोसिन पठाण आणि इम्रान कुरेशी, बाबा भाई पठाण यांचा समावेश होता.

### शिवसेनेतर्फे डॉ. आंबेडकरांना अभिवादन



**येवला :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४३ जयंती येवला शहरात शिवसेनेच्या वतीने साजरी करण्यात येऊन डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. शहरातील हुडको कॉलनी येथील प्रबोधिनी सभागृहात सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी सामाजिक कार्यकर्ते सुप्रसिद्ध पैलवान सुभाष पाटोळे, रिपाइं नेते गुड्डू जावळे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना नेते किशोर सोनवणे, शहरप्रमुख अतुल घटे, उपतालुकाप्रमुख गणेश सोनवणे, अजिंक्यतारा शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रकाश कोल्हे, ज्येष्ठ शिवसैनिक उत्तमराव घुले, सामाजिक कार्यकर्ते योगेश पोळ, किरण सूर्यवंशी, अमोल पारखे, युवा सेनेचे प्रतीक राऊत, नागडेकर सर, अनिल हलवाई, योगेश तक्ते, नंदुभाऊ झांबरे, सुदाम गायकवाड, महिला आघाडीच्या कल्पनाताई भोसले आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार गणेश सोनवणे यांनी मानले.



### पिंपळगाव येथे विश्वबंधुता साहित्य संमेलन

**पिंपळगाव बसवंत :** राष्ट्रीय विश्वबंधुता साहित्य परिषदेचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथमित्र पुरस्कार निफाड तालुका मध्यवर्ती सार्वजनिक वाचनालय भाऊसाहेबनगर येथील ग्रंथपाल भाऊसाहेब मोते यांना प्रदान करण्यात आला. विश्वबंधुता साहित्य परिषद, पुणे व रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन या संस्थांच्या वतीने २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलन एस. एम जोशी सभागृह, पुणे येथे शनिवार १२ एप्रिल २०२५ रोजी आयोजन केले होते. संमेलनाच्या निमित्ताने ग्रंथालय व वाचन चळवळीत विशेष उल्लेखनीय काम केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी संमेलनाध्यक्ष सुभाष वारे, कृष्णकुमार गोयल, डॉ. अश्विनी धोंडगे, प्रकाश रोकडे, प्रभंजन चव्हाण, अरुण आंधळे, विश्वबंधुता साहित्य परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांच्या हस्ते हा ग्रंथमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रंथपाल भाऊसाहेब मोते यांचे के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या विश्वस्त शकुंतलाताई वाघ, अध्यक्ष समीरदादा वाघ, जनसंपर्कप्रमुख व वाचनालयाचे अध्यक्ष, अजिंक्यदादा वाघ, स्कूल कमिटीचे अध्यक्ष तथा वाचनालयाचे चिटणीस शिवाजी नाठे सर, सुप्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य लक्ष्मण महाडिक तसेच नाशिक जिल्ह्यातील ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

### ममदापूर येथे महामानवाला अभिवादन

**येवला :** तालुक्यातील ममदापूर येथे संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र साबळे यांच्या हस्ते करण्यात आले तर सोसायटीचे व्हा. चेअरमन परसराम जाधव, भागीरथ उगले यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यावेळी मच्छिंद्र साबळे व गोरख वैद्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. पांडुरंग पगार, सुदाम शिरसाठ, मच्छिंद्र गुडघे, वाचनालयाचे उपाध्यक्ष पोपट ठाकरे, हिरामण सदगिर, विजय गुडघे, गोरख गुडघे, गोरख वैद्य, भाऊसाहेब सोनवणे, सोनू दळे, राहुल वाघ, वाचनालयाचे अध्यक्ष दत्तू वाघ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



इगतपुरी : पिण्याच्या पाण्यासाठी दऱ्याखोऱ्यांतून पायपीट करताना महिला. उंटदरीच्या झऱ्यातून पिण्याचे पाणी भरताना आदिवासी महिला. (छाया : ओंकार गवांदे)

# इगतपुरी वाड्या-पाड्यांत भीषण पाणीटंचाई

## आदिवासी नागरिकांची पाण्यासाठी खोल उंटदरीत पायपीट : प्रशासनाचे दुर्लक्ष

**इगतपुरी : प्रतिनिधी**

**पावसाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या इगतपुरीत एप्रिल महिन्यातच भीषण पाणीटंचाईला आदिवासी नागरिकांना सामोरे जावे लागत आहेत. पावसाळ्यात सुमारे चार हजार मि.मी. पाऊस पडत असूनही पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे पाणीटंचाईच्या झळा आत्तापासूनच सुरू झाल्या आहेत.**

भावली धरणातून ३२ कोटी रुपये खर्चून शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याची पाइपलाइन घेतली आहे. मात्र, तरीही शहरात गेल्या पाच वर्षांपासून आठवड्यातून फक्त तीन दिवसच पाणीपुरवठा केला जात आहे. नगर परिषदेवर प्रशासक राजवट लागू असून, त्यांचेही या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असून, सर्वच अधिकारी व कर्मचारी नाशिकला वास्तव्य करत असल्याने केवळ नोकरी करायची म्हणून करायची असे चित्र नगर परिषद कार्यालयात दिसत आहे. विशेष म्हणजे कोणत्याही विभागाचे अधिकारी येथे दिसत नाही. तक्रार घेऊन आलेल्या नागरिकांनी विचारले असता नाशिक मीटिंगला गेले असतील असे शिपाई सांगतात. त्यामुळे हे अधिकारी फक्त पगार घेण्यासाठीच येथे येतात का? असा संतापजनक प्रश्न नागरिकांनी केला आहे. तर नगरपरिषद हद्दीतील तळेगाव शिवारातील कातुरवाडी, वाघाचा झाप, मेंगाळ झाप या वस्तीमधील दोनशे ते अडीचशे लोकसंख्या वस्ती असलेल्या आदिवासी नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या वाडीच्या नागरिकांना थेट दोन किमी असलेल्या घाटनदेवी मंदिरासमोरील खोल उंटदरीतील झऱ्यातील पाणी पिण्यासाठी आणावे लागत आहे. या वाडीपासून हा झरा जवळपास दोन किलोमीटर असून, रस्ता नसलेल्या थेट खोल असलेल्या डोंगरदऱ्यातून हे पाणी आणावे लागत आहे.

भारत एकीकडे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या वाडीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. या वाड्यापाड्यावर नगर परिषद हद्दीत असून, अद्यापही या ठिकाणी नळ कनेक्शन पोहचलेले नाही.

> या ठिकाणी हाकेच्या अंतरावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा तळेगावला डॅम आहे. केवळ नियोजन नसल्यामुळे व एकतर्फी मनमानीमुळे शहर परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. स्थानिक आदिवासी बांधवांवर नगर परिषद अन्याय करत आहे. शहरातही कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे.
>
> – **संजय खातळे,** युवा नेते

> आमच्या वाड्या गेल्या ३० वर्षांपासून नगर परिषद हद्दीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप ही आमच्याकडे नळकनेक्शन जोडण्यात आलेले नाहीत. प्रत्येक पंचवार्षिक निवडणुकीवेळी लोकप्रतिनिधी व नगरसेवक मत मागताना तुमच्या समस्या सोडवू, असे आश्वासन देतात. मात्र, आजपर्यंत कोणीही आश्वासनाची पूर्तता केली नाही. – **रमेश शिंदे,** सामाजिक कार्यकर्ते

# त्र्यंबकेश्वर निबंधक कार्यालयाची १९ कोटी ७० लाखांची वसुली

**त्र्यंबकेश्वर : वार्ताहर**

त्र्यंबकेश्वर तालुका आणि शहरात मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी विक्री, गहाणखत यासह अन्य शासकीय कामांसाठी दस्त नोंदणी होत असते. यामधून अब्जावधींची उलाढाल होत असताना शासनाला देखील बक्कळ महसूल प्राप्त होत आहे.

नुकतेच संपलेल्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात शासनाला १९ कोटी ७० लक्ष ८१ हजार ४२५ रुपये महसूल प्राप्त झाला आहे. या वर्षी २ हजार ७०७ दस्त नोंदणी झाली आहे. येथे असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयाला स्वतःची शासकीय इमारत नाही. मंदिराच्या शेजारीच असलेल्या नगर परिषद मालकीच्या धर्मशाळेत कार्यालयाचे कामकाज चालते. येथे आलेल्या नागरिकांना वाहनतळाची सुविधा नाही. कधी वीजपुरवठा अचानक खंडित होतो तर कधी सर्व्हर डाऊन, इंटरनेट बंद अशा समस्यांवर मात करत शासनाने दिलेले उद्दिष्ट गाठले जात आहे.

| वर्ष | नोंदणी दस्त संख्या | महसुलाची वसूल रक्कम |
|---|---|---|
| २०२१-२२ | १७०७ | ११ कोटी १० लाख ३ हजार २८४ रुपये |
| २०२२-२३ | १९०६ | १४ कोटी ३७ लाख ३० हजार ३९० रुपये |
| २०२३-२४ | २४४८ | १९ कोटी २७ लाख ४१ हजार ९५० रुपये |
| २०२४-२५ | २७०७ | १९ कोटी ७० लाख ८१ हजार ४२५ रुपये |

**रेडीरेकनर दर :** तालुक्याच्या ग्रामीण भागासाठी शेतीला कमीत कमी ४ लाख ६० हजार रुपये प्रतिहेक्टरी असलेला दर नव्याने ४ लाख ६४ हजार रुपये प्रतिहेक्टरी असा आहे. यापूर्वी शेतीला जास्तीत जास्त दर २० लाख ९० हजार रुपये प्रतिहेक्टरी होता तो आता २२ लाख ९२ हजार रुपये असा प्रतिहेक्टरी जाहीर झाला आहे. ग्रामीण भागात बिनशेती दर कमीत कमी ४५० रुपये प्रतिचौरस मीटर असा होता, तो आता ४७० रुपये प्रतिचौरस मीटर असा झाला आहे. तर जास्तीत जास्त दर १७५० रुपये प्रतिचौरस मीटर होता, तो आता नव्याने १८४० रुपये करण्यात आला आहे.
**शहरी भागासाठी म्हणजेच त्र्यंबक नगर परिषद हद्दीत :** बिनशेती दर पूर्वी ६ हजार ८०० प्रतिचौरस मीटर होता, तो आता ६ हजार ८६० रुपये असा करण्यात आला आहे. निवासी इमारत दर पूर्वी २४ हजार ३०० रुपये चौरस मीटर असा होता, तो आता २४ हजार ७३० रुपये असा आहे.

# छत्रपती पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रेय देवरे

## व्हा. चेअरमनपदी बबन गांगुर्डे

**देवळा : प्रतिनिधी**

खर्डे येथील छत्रपती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी संस्थेचे ज्येष्ठ संचालक दत्तात्रेय मुरलीधर देवरे यांची तर व्हा. चेअरमनपदी बबन सदाशिव गांगुर्डे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली असून, मंगळवार दि. १५ रोजी नवनियुक्त चेअरमन, व्हा. चेअरमनपदाच्या निवडीसाठी सहकार तथा निवडणूक निर्णय अधिकारी वसंत गवळी यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी चेअरमनपदासाठी दत्तात्रेय देवरे व व्हा. चेअरमनपदासाठी बबन गांगुर्डे यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. निर्धारित वेळेत दोघांचेच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी वसंत गवळी यांनी देवरे व गांगुर्डे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. त्यांची बिनविरोध निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला व नवनियुक्त चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संस्थापक संदीप पवार, दिलीप देवरे, सुनील शिंदे, चंद्रकांत पवार, दीपक कुवर, देवीदास अलई, सरला मोरे आदींसह माजी उपसरपंच सुनील जाधव, देवळा शेतकी संघाचे संचालक हंसराज जाधव, विका सोसायटीचे संचालक कारभारी जाधव, डॉ. बापू सोनवणे, माधव ठोबरे, शशिकांत ठाकरे, प्रविण देवरे, आबा कुंवर, संस्थेचे व्यवस्थापक अजय देवरे, मनोज थोरात उपस्थित होते.



नवनियुक्त चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा सत्कार करताना संस्थेचे संस्थापक संदीप पवार व संचालक मंडळ. ( छाया : विनोद देवरे)

# नायगव्हाण येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक

**येवला : प्रतिनिधी**

येवला तालुक्यातील नायगव्हाण येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त गावातून प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

भीमजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष पानपाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यानिमित्ताने अनेक लोकांनी बुद्धविहारासाठी टेबल खुर्ची, पंखा, साऊंड सिस्टिम आदी वस्तू भेट देण्यात आल्या. अजित पानपाटील, बाळू पानपाटील, नाना आहिरे, जयवंत आहिरे,अशोक पानपाटील,सावळीराम पानपाटील,

आदींनी वस्तुरूपात सदरील धम्मदान केले. यावेळी संतोष अहिरे यांनी अभिवादन सभेचे सूत्रसंचालन केले. तर सावळीराम पानपाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी संदीप पानपटील, निशा पानपाटील,कुसुम अहिरे,स्नेहल पानपाटील, सुनीता पानपाटील, मंगल अहिरे, इंदुबाई पानपाटील, रानी पानपाटील, कांचन पानपाटील, संगिता पानपाटील, आशा अहिरे आदींसह महिला व पुरुष उपस्थित होते.



# एन्झोकेम विद्यालयात महामानवास अभिवादन

**येवला :** येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन्झोकेम विद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. संस्थेचे सरचिटणीस सुशील गुजराथी, प्रशासनाधिकारी दत्ता महाले, उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विशाल कळमकर यांनी मनोगतातून बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. संस्थेचे सरचिटणीस सुशील गुजराथी यांनी मनोगतातून मुक्तीभूमी धर्मांतर घोषणा, संविधान निर्मितीत बाबासाहेबांचे योगदान स्पष्ट केले. पूनम वारुळे, डॉ. सुहासिनी शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# शेतकऱ्यांवर रसायनमिश्रित दूषित पाणी पिण्याची वेळ

## प्रदूषण नियंत्रण मंडळ ठोस भूमिका घेईना; शेतकरी व मुकणे ग्रामस्थांमध्ये संताप

**मुकणे : प्रतिनिधी**

**मुकणे धरणाखालील उंडओहोळ नदीपात्रातून पाणी उचलणाऱ्या शेतकऱ्यांवर आता रसायनमिश्रित पाणी पिण्याची वेळ आली आहे.**

महामार्ग ते उंडओहोळ नदीपात्र अगदी जवळच असल्याने रात्रीच्यावेळी नदीपात्रात टँकरद्वारे किंवा अन्य प्रकारे रसायनमिश्रित पाणी टाकले जात असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. नदीपात्रातील केटीवेअरमुळे हे रसायनमिश्रित पाणी नदीपात्रातच साचून राहणार असल्याने पुन्हा पूर्वीप्रमाणेच नदीपात्रातील मासे मृत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी नदीपात्रातून शेती, जनावरे व पिण्यासाठी पाइपलाइनद्वारे हे पाणी उचलले असल्याने सद्यस्थितीत दूषित पाणीच पिण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

दरम्यान, काल सकाळी नदीपात्रातून विद्युत पंपाद्वारे पाणी शेतकऱ्यांनी उचलले असता लालसर, दूषित व उग्र वास येणारे पाणी आल्याचे पाडळी देशमुख शिवारातील पुंडलिक धोंगडे यांनी पाहिले तसेच काहींना या पाण्यामुळे पोटदुखीचा त्रास होत असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे शेतकरी व नागरिक भयभीत झाले आहे. तसेच मुकणे गावाला पाणीपुरवठा करणारी विहीरही या नदीपात्रालगत असून, त्या विहिरीला पूर्वीच विहीर पुनर्भरणाचे काम केले असल्याने हे पाणी विहिरीत उतरून त्याचा परिणाम गावावर होऊ शकतो. दरम्यान, औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांनी इटीपी प्लांट फक्त नावालाच बसवले असून, अनेक कंपन्यांचे रसायनमिश्रित पाणी विहीर, बोअरवेलमध्ये उतरले असल्याच्या तक्रारीही नागरिकांमधून केल्या जात आहेत. नाशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे यापूर्वीही दूषित पाण्याबाबत अनेकदा तक्रारी गेल्यानंतर हा प्रकार काही काळ बंद झाला होता. मात्र पुन्हा रसायनमिश्रित दूषित पाणी नदीपात्रात आल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळ याची गंभीर दखल घेणार की नाही, याची प्रतीक्षा आहे.

दरम्यान याबाबत दोन दिवसांपासून दोनदा प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबत गायकवाड नामक अधिकाऱ्याला सांगतो. असे थातूर-मातूर उत्तरे देत टोलवाटोलवी केली, मात्र याआधीही असे प्रकार घडून मोठ्या आजारांना मुकणे गावाला सामोरे जावे लागले होते.



मुकणे उंडओहोळ नदीपात्रातुन विद्युत पंपाद्वारे आलेले दूषित पाणी (छाया : प्रभाकर आवारी)

> उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याचा वापर जास्त होत असून, भाडेकरी, वीटभट्टी कामगार यांनाही पिण्यासाठी नदीपात्रातील पाण्याचाच उपयोग होत आहे. मात्र दूषित पाण्यामुळे पोटदुखी, जुलाब यांसारखे आजार उद्भवत असून, प्रदूषण नियंत्रण मंडळाने यावर ठोस भूमिका घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.
>
> – **पुंडलिक धोंगडे,** शेतकरी, पाडळी देशमुख

## महत्त्वाचे

### नाशिकच्या नलिनी कड यांनी सर केला एव्हरेस्ट बेस कॅम्प

**नाशिक :** येथील धाडसी महिला नलिनी मधुकर कड यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केला. तिरंगा झेंडा फडकावून नाशिकचे नाव



उज्ज्वल केले. त्यांच्यासमवेत कोल्हापूरच्या नीलिमा देशपांडे होत्या त्यांना शेवटच्या टप्प्यात मोहीम अर्धवट सोडावी लागली. मात्र, दोघींनी एकमेकींना साथ देत खडतर परिस्थितीवर मात करीत आव्हान पेलले. दि. ६ तारखेला नलिनी कड यांनी नेपाळमधील काठमांडू गाठले. नंतर लुकरा येथून एव्हरेस्ट बेस कॅम्पकडे कूच केले. सोबत एक नेपाळी गाईड होता. दररोज ८ ते १० तास चालत खडतर मार्गाने १० दिवसांत चढाई केली. सर्वत्र बर्फाचे पसरलेले थर, जीव गोठविणारी कडाक्याची थंडी, दाट धुक्यामुळे डोळ्यांसमोरचा रस्ता हरवलेला असताना नलिनी कड व नीलिमा देशपांडे यांनी हार मानली नाही. तहान भुकेवर मात करून ध्येय गाठले. जिद्दीने मजल दर मजल करीत दुपारी त्यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्पवर पाऊल ठेवले. भारताचा राष्ट्रध्वज फडकावून गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत त्यांनी गायले.आत्मविश्वास, जबरदस्त इच्छाशक्ती आणि योगशास्त्रातील यम, नियम, प्राणायाम यांचा या कठीण वाटचालीत त्यांना खूप उपयोग झाला, असे त्यांनी नमूद केले.

### बोराडे हत्याकांडातील मुख्य संशयित ताब्यात

**सिडको :** पांडवलेणी येथील ज्ञानपीठ सोसायटीसमोर झालेल्या खून प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी विजय माळेकर याला अखेर नाशिक गुन्हे शाखा युनिट एकने अटक केली. दिनांक १३ एप्रिल रोजी कबुतरबाजीतून रामदास बोराडे याची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी साहिल सिंग यांच्या तक्रारीवरून आरोपी शौकत शेख, नफीज सय्यद, विजय माळेकर, प्रिंन्स पालवे, रोहित पालवे, राहुल कुंभार आणि इतरांच्या विरोधात विविध गंभीर कलमांखाली गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्ह्यातील प्रमुख आरोपी विजय माळेकर याचा शोध घेण्याचे आदेश वरिष्ठांकडून गुन्हे शाखेला मिळाले होते. तपासादरम्यान पोहवा प्रदीप म्हसदे व पोहवा संदीप भांड यांना गुप्त बातमीदारामार्फत माळेकर उमराळे फाटा, पेठरोड परिसरात असल्याची माहिती मिळाली. यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.दिनांक १५ एप्रिल रोजी सकाळी हॉटेल साईप्रसाद अँड स्वीट्स समोर रोडवर विजय माळेकर हा सापडला. पोलिसांनी त्यास शिताफीने ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यास पुढील कारवाईसाठी इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले.



### ग्रामोदय संस्थेत वक्तृत्व स्पर्धा

**नाशिक :** ग्रामोदय शिक्षण संस्थेचे संस्थापक सरचिटणीस कृष्णराव नेरे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. ग्रामोदय शिक्षण संस्थेच्या जिल्हाभरातील शाळांमधून सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा चार गटांमध्ये घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेची अंतिम फेरी ग्रामोदय विद्यालयात पार पडली. विजेत्या आणि अंतिम फेरीतील सहभागी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. अंतिम फेरीतील गटनिहाय विजेते विद्यार्थी असे आहेत. पूर्व प्राथमिक गटात शिवराज नवनाथ शिंदे, उच्च प्राथमिक गटातून आदर्श कन्या विद्यालय घोटी येथील विद्यार्थिनी स्वरा अविनाश सूर्यवंशी, माध्यमिक गटातून मडकीजांब येथील अनुष्का श्याम शिंदे, उच्च माध्यमिक गटात सिडको येथील धनश्री यशवंतराव ठाकूर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. उन्मेष कुलकर्णी, प्रा. राजेंद्र देशमुख, जे.डी. राजपूत, डी. के. सूर्यवंशी, बाळासाहेब ढोबळे, आर.व्ही. शिरसाठ, उद्योजक साहेबराव साळुंखे, माजी प्राचार्य सुभाष पाटील, कैलास नागरे, अविनाश नेरे, बाळासाहेब काळे, दिलीप पिंगळे, जी.बी. मोरे, डॉ. विनीत चोरडिया, पुंडलिक नेरे, सचिन बेडसे आदी उपस्थित होते. याप्रसंगी साहेबराव साळुंखे, सुभाष पाटील, प्रा. शुभदा पगार नेरे व दिलीप पिंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामोदय शिक्षण संस्थेचे व्यवस्थापक प्रवीणकुमार नेरे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक प्राचार्य दीपक व्याळीज यांनी केले. सूत्रसंचालन साहेबराव अहिरे यांनी केले. जगदीश साठे यांनी आभार मानले.



### सिडको महाविद्यालयात जयंतीनिमित्त अभिवादन

**सिडको :** कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. के. कुशारे यांनी मार्गदर्शन केले. इतिहास विभागाचे प्रा. डॉ. मिलिंद थोरात यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक अभ्यासपूर्ण दृष्टिकोन या विषयावर अभ्यासपूर्ण भाष्य केले. प्रास्ताविक प्रा. एस. टी. घुले यांनी केले. तर आभार उपप्राचार्य डॉ. एस. आर. निकम यांनी मानले.

### सरस्वती रुग्णालयात मोफत आरोग्य तपासणी

**नांदूरनाका :** सरस्वती हॉस्पिटल येथे आरोग्य तपासणी शिबिराचे



आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात रक्त चाचणी, ब्लडप्रेशर, हाडांची तपासणी, कॅल्शियम चाचणी, पथ्य, गरोदरमाता तपासणी, युरिक ॲसिड तपासणी, हाडांचे आरोग्य कसे चांगले ठेवावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. एक्सरे, सोनोग्राफी सवलतीच्या दरात घेण्यात आल्या. याप्रसंगी डॉ. रमाकांत भिवसन,अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. प्रियंका भिवसन, प्रसूतीतज्ज्ञ डॉ बिलाल पठाण, जनरल सर्जन डॉ. मनोज भडमुखे, जनरल सर्जन अरविंद आघाव, योगेश निमसे, सुमन सिस्टर, अंकिता सिस्टर, संदीप जाधव, दीपक पवार, तुषार कडनर उपस्थित होते.

# नाशिकरोडच्या उड्डाणपुलाला अवकळा

## डागडुजीकडे कानाडोळा, रंगरंगोटीची गरज

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

**नाशिक रोडमधील वाहतुकीचा महत्त्वाचा दुवा ठरलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर उड्डाणपुलाच्या सौंदर्यीकरणाकडे गेल्या वीस वर्षांपासून दुर्लक्ष होत असल्याने परिसराला अवकळा प्राप्त आली आहे. पुलाची रंगरंगोटी, संरक्षक कठड्यांची डागडुजी तसेच साफसफाई करून या पुलाला साजेसे रूप द्यावे, अशी मागणी मित्रमेळातर्फे करण्यात आली आहे.**




या उड्डाणपुलाचा वापर सुरू होऊन दोन दशके झाली असतानाही एकदाही रंगकाम करण्यात आलेले नाही. वाहनांच्या धुरामुळे संपूर्ण भाग काळवंडला असून, खांबांवर जाहिरातीचे कागद आणि फलक चिकटविण्यात आले आहेत. काही ठिकाणी जाहिरातींची रंगरंगोटीही करण्यात आली आहे. यामुळे परिसराची सौंदर्यदृष्टी नष्ट झाली आहे. पुलावरील पाणी निचरा यंत्रणा, दुभाजक, रिफ्लेक्टर आणि संरक्षक भिंतींचीही अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंनी भाजी मंडई व दुकाने थाटलेली असल्याने येथे नेहमीच नागरिकांची वर्दळ असते. या परिसरात स्वच्छता, आकर्षक रंगसंगती आणि योग्य देखभाल केल्यास संपूर्ण भागाचा चेहरामोहरा बदलू शकतो, असे मित्रमेळा संघटनेचे मत आहे. मित्रमेळा संस्थापक राजेंद्र ताजणे यांच्यासह रमेश पाळदे, किरण डहाळे, दौलत शिंदे, सागर वाकचौरे, अरुण निरगुडे, भाईदास चव्हाण, विलास थोरात, सचिन सूर्यवंशी, अन्नू पुजारी, नैयुम खान, दत्ता आगळे, नामदेव टिळे, नितीन साळवे, भूषण पगारे या कार्यकर्त्यांनी महानगरपालिकेकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

उड्डाणपुलाच्या खाली दोन्ही बाजूंनी विविध दुकाने आणि बाजारपेठा थाटलेल्या



आहेत. येथे मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. मात्र पुलाची दुरवस्था, अस्वच्छता आणि अस्ताव्यस्त जाहिरातींमुळे संपूर्ण परिसराची प्रतिमा मलिन झाली आहे. जर या पुलावर आकर्षक रंगरंगोटी केली गेली. रिफ्लेक्टर व संरक्षक कठड्यांची देखभाल झाली तर परिसर अधिक स्वच्छ, देखणा आणि सुरक्षित बनेल. यामुळे व्यापाऱ्यांना चालना मिळेल आणि नाशिकरोडच्या सौंदर्यात भर पडेल.

**–राजेंद्र ताजणे,** संस्थापक, मित्रमेळा

# विल्होळी शिवारातील एमएनजीएल पंपावर ग्राहकाला बेदम मारहाण

## मुजोर कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

विल्होळी येथील एमएनजीएल पंपावर रिक्षामध्ये सीएनजी भरण्यासाठी गेलेल्या ग्राहकाला पंपावरील सुपरवायझरसह एका कर्मचाऱ्याने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्ञानेश्वर हनुमंता तांबे (५० रा. देवळाली कॅम्प) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, रविवारी (दि.१३) रात्री साडेअकराच्या सुमारास एका नातेवाइकासोबत विल्होळी येथील एमएनजीएल पंपावर सीएनजी भरण्यासाठी गेले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र, त्यांना हॉस्पिटलमध्ये जायचे असल्याने त्यांनी टोल फ्री इमर्जन्सी क्रमांकावर संपर्क साधला. सीएनजी लवकर मिळेल का, इमर्जन्सी प्रॉब्लेम आहे, असे सांगितल्यानंतर तेथील सुपरवायझरने त्यांना केबिनमध्ये नेले. तसेच इमर्जन्सी नंबरवर फोन करतो काय, असा वाद घालत मारहाण करत पायऱ्यांवरून ढकलून दिले. यात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने ते जखमी झाले. यानंतर त्यांच्या सहकाऱ्याने त्यांना एका रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. या प्रकाराबाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात पंपावरील सुपरवायझर रणजित जाधव तसेच अन्य एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे विल्होळी येथील पंपावरील या कर्मचाऱ्यांबद्दल वारंवार तक्रारी येत आहेत. दोन महिन्यांपूर्वी एका डॉक्टर दाम्पत्याला येथील मुजोर कर्मचाऱ्यांनी दादागिरी करत जबर मारहाण केली होती. दिवसाआड या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या दादागिरीमुळे हाणामारीचे प्रकार घडत असल्याने या पंपावरील कर्मचाऱ्यांवर कुणाचा वचक आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# ग्रंथालयांसमोर 'एआय' तंत्रज्ञानाचे आव्हान

## कुलगुरू सोनवणे : ग्रंथालय भूषण पुरस्काराचे वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

**ग्रंथशास्त्रात पारंपरिक शिक्षण घेत असताना कृत्रिम बुद्धिमत्तेने शिरकाव केला आहे. ग्रंथालयांसमोर आता या 'एआय' तंत्रज्ञानाचे आव्हान उभे राहिले आहे. ग्रंथालयांनी वाचकांना या तंत्रज्ञानानुसार कशी सेवा देता येईल, याचा विचार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी केले.**

सार्वजनिक वाचनालयातर्फे डॉ. राजेंद्र कुंभार व डॉ. मधुकर शेवाळे यांना कै. मु. शं. औरंगाबादकर 'ग्रंथालय भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. सोनवणे बोलत होते. ते म्हणाले की, समाजाला शिक्षित करण्याचे काम ग्रंथालये करीत असतात. पारंपरिक शिक्षण पद्धतीनुसार काम करणाऱ्या ग्रंथपाल, ग्रंथालयांसमोर आता 'एआय' या कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान उभे राहिले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून सामान्य वाचकांना वाचनाची सवय लावण्यासाठी काय करता येईल, याचा आराखडा वाचनालयांनी आखावा व समाजाला सुशिक्षित करण्याचे व्रत अंगीकारावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांनीही मनोगत व्यक्त केले. वाचनालये खऱ्या अर्थाने लोकविद्यापीठ झाले असल्याचे मत डॉ. राजेंद्र कुंभार यांनी व्यक्त केले. नाशिकमध्ये मुक्त विद्यापीठाने सर्वप्रथम लायब्ररी सायन्स अभ्यासक्रम आणल्याचे सांगत शहरात ग्रंथालय प्रसाराचे काम कै. मु. शं. औरंगाबादकर यांनी पाच दशके केल्याचे डॉ. मधुकर शेवाळे म्हणाले. सावाना सचिव सुरेश गायधनी यांनी प्रास्ताविक केले. संजय करंजकर यांनी डॉ. सोनवणे, तर देवदत्त जोशी व मंगेश मालपाठक यांनी पुरस्कारार्थींचा परिचय करून दिला. प्रेरणा बेळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सोमनाथ मुठाळ यांनी आभार मानले.

# समाजकार्य क्षेत्रात करिअरच्या संधी : ॲड. ठाकरे

**नाशिक : प्रतिनिधी**

समाजकार्य क्षेत्र इतर क्षेत्रापेक्षा वेगळे क्षेत्र आहे. आज वैद्यकीय क्षेत्रात समाजकार्याची खूप गरज आहे. विविध प्रकारच्या रुग्णांसोबत काम करून त्यांच्या मानसिक व भावनिक मदत करणे, सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाज कार्यकर्त्यांनी समाजाभिमुख काम करावे, असे आवाहन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.




समाजकार्य महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण गुणगौरवप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी मविप्र संस्थेचे नाशिक शहर संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, समाजकल्याण विभागीय आयकुत माधव वाघ, आदिवासी विभाग अतिरिक्त आयुक्त संदीप गोलाईत, महिला व बालकल्याण विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अनिता लिलके, प्राची झाडे, शुभकीर्ती अहिरे, आम्रपाली गाढद्रा, स्वप्नाली नाईक, रुचिता बिरारी यांसह विविध स्पर्धा, संस्कृती कार्यक्रम प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वाटप करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा पगार यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले. डॉ. सोनल बैरागी यांनी वार्षिक कार्यक्रम अहवाल सादर केला. डॉ. प्रतिमा पवार यांनी विजेत्या स्पर्धक आणि गुणवंतांच्या नावांची घोषणा केली. डॉ. घनशाम जगताप यांनी सूत्रसंचालन केले. आभार डॉ. मनीषा शुक्ल यांनी केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रतिभा पगार नियोजन केले. प्रा. चंद्रप्रभा निकम, डॉ. सुनीता जगताप, कार्यालयीन अधीक्षक ज्ञानेश्वर मवाळ, लेखापाल गिरीश पवार यांनी परिश्रम घेतले.

# ना. ए. सोसायटी म्हणजे गुणवत्तेची खाण : हेमंत राठी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक एज्युकेशन सोसायटी गुणवत्तेची खाण असून, १०३ वर्षांची अखंडित शिक्षणाचा गौरवशाली इतिहास संस्थेने पूर्ण केला असल्याचे मत पेठे हायस्कूलचे माजी विद्यार्थी तथा नामवंत उद्योजक हेमंत राठी यांनी व्यक्त केले.



नाशिक एज्युकेशन सोसायटी आयोजित सेवानिवृत्त पदाधिकारी शिक्षक-शिक्षकेतर यांच्या कृतज्ञता सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रा. दिलीप फडके उपस्थित होते. सेवानिवृत्त पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचा कृतज्ञता सत्कार सोहळा प. सा. नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आला. संस्थेच्या वतीने सेवानिवृत्तांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर कांता राठी, उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, जयदीप वैशंपायन, कार्यवाह राजेंद्र निकम, शिक्षक मंडळ अध्यक्ष नंदा पेटकर, कार्यकारी मंडळाचे सदस्य सरोजिनी तारापूरकर, राजा वर्टी, रंजना परदेशी, मैथिली गोखले, देवदत्त जोशी, मोहन रानडे, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, उमेश कुलकर्णी, पंढरीनाथ बिरारी, प्राजक्ता क्षीरसागर आदी उपस्थित होते.

माजी मुख्याध्यापक कैलास पाटील, सुरेखा सोनवणे यांनी संस्थेविषयी ऋण व्यक्त केले. स्वागत कार्यवाह राजेंद्र निकम यांनी केले. सत्कारार्थी यादीचे वाचन प्रशांत साबळे, अमोल जोशी, अतुल भालेराव, हर्षल कोठावदे, प्रशांत केंदळे, चारुशीला पत्की यांनी केले. अतिथींचा परिचय मधुवंती देशपांडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्राजक्ता क्षीरसागर यांनी केले. उपाध्यक्ष जयदीप वैशंपायन यांनी आभार मानले.



# गंगापूर पोलिसांच्या कामगिरीबद्दल सत्कार

**सिडको : प्रतिनिधी**

गंगापूर पोलीस ठाण्याने ८ सोनसाखळी आणि २ मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांची उकल केली. सुमारे ११ लाख २३ हजार ६६८ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते गंगापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जग्वेंद्रसिंग राजपूत यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी पोलिस उपआयुक्त मोनिका राऊत, प्रशांत बच्छाव, किरणकुमार चव्हाण, चंद्रकांत खांडवी, पद्मजा बढे आदी उपस्थित होते.




# घरगुती गॅस सिलिंडरची दरवाढ मागे घ्या

## माकपाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**नाशिक : प्रतिनिधी**

घरगुती गॅस सिलिंडरची दरवाढ मागे घ्या, जीवनावश्यक वस्तूंच्या दरातील वाढ रद्द करा, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माकपातर्फे निदर्शने करण्यात आली. त्यानंतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, अच्छे दिन आयेंगे अशी भावनिक साद घालून सत्तेवर आलेल्या भाजप प्रणीत सरकारच्या नवउदारवादी आर्थिक धोरणांमुळे जनतेच्या पदरी निराशाच पडली आहे. दिवसेंदिवस जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असून, सर्वसामान्य जनतेला रोजचे जगणेसुद्धा परवडेनासे झाले आहे. पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस सिलिंडरच्या दरातील वाढीमुळे जनता त्रस्त झाली आहे.

एवढ्यावरच न थांबता केंद्र सरकारने घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरची दरवाढ केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता पुन्हा महागाईच्या कचाट्यात सापडली आहे. जागतिक बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झालेली असतानाही सरकार पेट्रोल, डिझेल दरात वाढ करण्याचा निर्णय घेत आहे.

त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरची केलेली दरवाढ व इतर दरवाढ त्वरित मागे घ्यावी, अशी जनतेच्या वतीने भारतीय कम्युनिस्ट पक्षाने या निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली. निवेदनावर माकपाचे राज्य सचिव मंडळ सदस्य डॉ. डी. एल. कराड, राज्य सदस्य माकप सीताराम ठोंबरे, शहर सेक्रेटरी तानाजी जायभावे, राज्य सदस्य माकप ॲड.वसुधा कराड,सदस्य सचिन भोर, सतीश काकडे, तुकाराम सोनजे, हिरामण तेलोरे, सचिन मालेगांयकर, मिलिंद वाघ, भिवाजी भावले, मोहन जाधव, दगडू व्हडगर, विजया टिक्कल यांच्या सह्या आहेत.

**या प्रमुख मागण्या**


१. सरकारने घरगुती गॅस सिलिंडरची केलेली दरवाढ मागे घ्यावी. २. पेट्रोल, डिझेल दरवाढ मागे घ्या.
३ जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी करा. ४. जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी रद्द करा.

# सावानाचे वाङ्मयीन पुरस्कार जाहीर

## सात साहित्यिकांचा होणार सन्मान


डॉ. क्षमा शेलार


विजय श्रोत्रिय



विभावरी देशपांडे


सुनंदा अमरापूरकर

**नाशिक : प्रतिनिधी**

**सावानाच्या वतीने देण्यात येणारे सन २०२४ चे विविध वाङ्मयीन पुरस्कार सात जणांना जाहीर करण्यात आले आहेत. वाङ्मयीन पुरस्काराचे वितरण लवकरच सावानाच्या मु. शं. औरंगाबादकर होणार आहे, अशी माहिती सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांनी दिली.**


सुनीता ओगले


डॉ.रमेश धोंडगे


डॉ.उज्ज्वला दळवी

**यांना जाहीर झाले पुरस्कार**

■ कादंबरी (धनंजय कुलकर्णी) – सवाष्ण डॉ. क्षमा गोवर्धने शेलार ■ ललितेतर ग्रंथ (वि. म. गोगटे) – आरोग्याचे डोही डॉ. उज्ज्वला दळवी ■ सामाजिक /वैचारिक (मु. ब. यंदे) – साहित्य शैली तत्वेआणि चिकित्सा – डॉ.र मेश धोंडगे ■ लघुकथासंग्रह ( पु.ना.पंडित) – सोलमेट सुनीता ओगले ■ कथालेखक उमेदीने लेखन (डॉ. अ. वा. वर्टी) – निरभ्र विभावरी देशपांडे ■ चरित्रात्मक कादंबरी (अशोक टिळक) – खुलभर दुधाची कहाणी सुनंदा अमरापूरकर ■ प्रवास / शैक्षणिक (ग. वी. अकोलकर) – आहे सुगम तरी विजय श्रोत्रिय.

पुरस्कार निवड समितीत प्रा. अनंत येवलेकर, प्रा. शिशिर शिंदेकर, डॉ. चंद्रकांत संकलेचा, सौ. वंदना अत्रे, प्रा. सुनील हिंगणे यांनी काम पाहिले. वाङ्मयीन पुरस्कार सोहळ्यास श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्यक्ष वैद्य विक्रांत जाधव, डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहसचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, अर्थ सचिव गिरीश नातू, ग्रंथसचिव देवदत्त जोशी, सांस्कृतिक सचिव जयप्रकाश जातेगावकर, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, वास्तुसंग्रहालय सचिव ॲड. अभिजित बगदे, सदस्य प्रेरणा बेळे, डॉ. धर्माजी बोडके, प्रशांत जुन्नरे, मंगेश मालपाठक, ॲड. भानुदास शौचे यांनी केले आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



इगतपुरी वाड्या-पाड्यांत भीषण पाणीटंचाई ◂◂ पान ६



शेतकऱ्यांवर रसायनमिश्रित दूषित पाणी पिण्याची वेळ ▸▸ पान ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे

### आज व उद्या तापमान ४२ अंशांच्या पुढे जाण्याचा अंदाज

**नाशिक :** नाशिक शहरासह परिसरात उष्णतेची तीव्रता वाढत असून, पुढील पाच दिवस तापमान झपाट्याने वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे दि.१७ व दि.१८ रोजी उन्हाचा पारा अधिक राहणार आहे. हवामान विभागाच्या मुंबई वेधशाळेने नाशिकसाठी यलो अलर्ट जारी केला असून, हवामान उष्ण व दमट राहील. या कालावधीत वाऱ्याचा वेग सरासरी ताशी १५ ते १८ किमी इतका राहण्याचा अंदाज आहे. बुधवार दि.१६ रोजी नाशिकचे कमाल तापमान ३९.४ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले. तर किमान तापमान २०.८ इतके नोंदवण्यात आले आहे. इगतपुरी येथील भात संशोधन केंद्राच्या हवामान विभागाने दिलेल्या माहितीप्रमाणे, येत्या काही दिवसांत नाशिकमधील तापमान ४१ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे सूर्यप्रकाशात थेट संपर्क टाळावा, पुरेसे पाणी प्यावे, हलक्या व ढगळ कपड्यांचा वापर करावा, तसेच वृद्ध व लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

### ना. भुसेंची मनपातील बैठक अचानक रद्द

**नाशिक :** महापालिका शिक्षण विभागातील कामकाजाचा आढावा बैठक शिक्षणमंत्री दादा भुसे हे महापालिकेत बुधवारी (दि.१६) घेणार होते. मात्र, अचानक ही बैठक रद्द करण्यात आली. बैठक रद्दचे कारण समजले नाही. शिक्षक भरती, तसेच शिक्षक समायोजन याबाबत ना. भुसे हे मनपाला जाब विचारणार होते. बी. टी. पाटील यांच्या चौकशीचा अहवाल राज्य शासनाच्या नगरविकास, तसेच शिक्षण विभागाला मनपा आयुक्तांमार्फत सादर करण्यात आला असून, अद्याप पाटील यांच्यावरील कारवाईबाबत शासनाकडून निर्णय झालेला नाही. मनपा शिक्षण विभागाची डागाळलेली प्रतिमा आणि शिक्षणमंत्र्यांच्या होमग्राउंडवरच अशा प्रकारची नियमबाह्य कामे झाल्याने भुसे यांच्याकडून शिक्षण विभागाच्या कारभाराची माहिती घेतली जाणार होती. दरम्यान, पुढील बैठक कधी होणार याबाबत कोणतीही माहिती मिळू शकली नाही. मनपाच्या अधिकाऱ्यांना सकाळीच याबाबत अवगत करण्यात आले, असे असले तरी भुसे यांच्या बैठकीची वेळ दुपारी १२ वाजता दिली असतांना त्यांच्या दौऱ्यात मात्र सकाळी १०.१५ वाजता मुंबई येथून रवाना होऊन थेट मालेगाव येथे दुपारी २.३० वाजता पोहोचतील असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. दौऱ्याच्या पत्रिकेत मात्र कोठेही मनपाच्या बैठकीचा उल्लेख नव्हता.

# पहाटेपर्यंत सुरू होती धुमश्चक्री

## पोलीस पथकांवर दगडफेक, २१ कर्मचारी जखमी

### पोलिसांच्या वाहनांचे नुकसान



### नियंत्रणासाठी अश्रुधुराचा वापर



काठेगल्ली सिग्नल येथे पाडण्यात आलेल्या धार्मिक स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला लावलेले बॅरिकेड्स आणि रस्त्यावर असलेला शुकशुकाट. (छाया : रविकांत ताम्हणकर)

### पोलिसांकडून धरपकड सुरू



सह्याद्री हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला लावलेले बॅरिकेड्स व पोलिस बंदोबस्त.

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**काठेगल्लीतील सातपीर दर्गा हटविण्याची कारवाई करण्यासाठी मध्यरात्री पोलिस तसेच महापालिकेचे अतिक्रमण निर्मूलन पथक द्वारका भागात पोहोचले. ही बाब एका विशिष्ट समाजाच्या व्यक्तींना कळताच मोठ्या प्रमाणात जमाव चाल करून आला. जमावाने दगडफेक करत कारवाईत अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. परंतु, पोलिसांनी जमावाला पांगविण्यासाठी थेट अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या. यामध्ये पोलिसांच्या तीन गाड्यांचे नुकसान झाले आहे तर २१ कर्मचारी जखमी झाले आहेत. पहाटेपर्यंत ही धुमश्चक्री सुरू होती.**

पोलिसांनी योग्यरीत्या परिस्थिती हाताळत दोन समाजामध्ये तेढ निर्माण होऊन परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली. त्यामुळे दिवसभर शहरात कुठेही अप्रिय घटना घडली नाही. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी पोलिस उपायुक्त, सहायक आयुक्त आणि पोलिस कर्मचाऱ्यांचे याबद्दल कौतुक केले. काठेगल्लीतील दर्ग्याचे बांधकाम हे अतिक्रमित आहे आणि ते पाडण्यासाठी अधिसूचना प्रकाशित करण्यात आली होती. या अधिसूचनेनुसार पोलिसांनी बंदोबस्ताची तयारी सुरू केली होती. या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गावरून वळविण्यात येणार असल्याने त्या ठिकाणी प्रत्यक्ष कामकाजाला मंगळवारी रात्री उशिरा पोलिसांनी सुरुवात केली. हे अतिक्रमण काढावे याबाबतची नोटीस १ एप्रिल २५ रोजी देखील प्रशासनाच्या वतीने या दर्ग्याला देण्यात आली होती. त्यामध्ये पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली होती, परंतु त्याकडे दुर्लक्ष करून हे अतिक्रमण कायम ठेवण्यात आले होते. त्यानंतर प्रशासनाने १५ दिवस पूर्ण झाल्यानंतर पुढील तयारीला सुरुवात केली होती. या सर्व घटनेची माहिती मिळाल्यानंतर एका विशिष्ट समाजाच्या जमावाने सर्वसाधारण मध्यरात्री साडेबारा वाजेच्या दरम्यान या ठिकाणी कामकाज करणाऱ्या पोलीस पथकावरती चाल करून आले आणि पोलिसांना काही समजण्याच्या आतच दगडफेक करण्यास सुरुवात केली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर तातडीने शहर पोलीस नियंत्रण कक्षाकडून जास्त कुमक या ठिकाणी पाठविण्यात आली. त्याचबरोबर भद्रकाली मुंबई नाका, इंदिरानगर या पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी या ठिकाणी हजर झाले. तोपर्यंत या विशिष्ट समाजाच्या जमाव हा अतिशय उग्र झालेला होता. त्यांच्याकडून दगडफेक करण्याची घटना सुरूच होती. यामध्ये पोलिसांच्या तीन गाड्यांचे नुकसान झालेले असून, संतप्त झालेल्या जमावाने काही खासगी गाड्यांचे देखील नुकसान केले.

दरम्यानच्या काळात या घटनास्थळी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, किरण चव्हाण, मोनिका राऊत, चंद्रकांत खांडवी यांच्यासह शहरातील सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह सर्व कुमक या ठिकाणी दाखल झाली. राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी देखील या ठिकाणी रवाना करण्यात आली. पोलिसांनी वारंवार या जमावाला शांत राहण्याची विनंती केली, परंतु ती मान्य न केल्याने अखेर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून या जमावाला पांगविण्यामध्ये यश मिळवले.

### जप्त ७० दुचाकींवरून संशयितांचा शोध

घटनास्थळावरून ७० दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. त्यावरून अन्य संशयितांची ओळख पटविण्यात येणार आहे. नागजी चौक, उस्मानीचा चौक भागात रात्री १२ ते पहाटे दोन या वेळेत जमावाने गोंधळ घातला. नेते, धर्मगुरू आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांवर दगडफेक केली. जखमींमध्ये सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके आणि नितीन जाधव, वरिष्ठ निरीक्षक युवराज पत्की आणि अविनाश खैरनार, एस. बी. काकडे, व्ही. डी. वालके, उपनिरीक्षक एस. व्ही. नागवडे, ए. एल. जंगले, हवालदार के. वाय. कुवर, पी. एन. कोहक, व्ही. के. जवक, एस. डी. पांडे, आर. एस. जंगलाणे, एम. एम. मुलानी, व्ही. एल. स्पेकरे, एन. आर. जाधव. आर. बी. राठोड, एल. पी. आदवडे, आर. आर. राऊत, इनामदार आदींचा समावेश आहे. जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रात्री अनेक जण दुचाकीवर आले होते. लाठीमारानंतर जमावाने पळ काढला. त्यांच्या ७० दुचाकी पोलिसांनी घटनास्थळावरून ताब्यात घेतल्या. या दुचाकीवरून संशयितांची ओळख पटविली जाणार आहे.

## जखमी पोलीस कर्मचाऱ्यांची ना. भुसेंनी घेतली रुग्णालयात भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकच्या काठेगल्ली परिसरातील अनधिकृत दर्गा काढताना जमावाने पोलीस कर्मचारी, अधिकारी आणि पोलीस वाहनांच्या दिशेने दगडफेक सुरू केली. यात चार अधिकारी आणि सुमारे १७ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. या जखमी पोलिस कर्मचाऱ्यांवर नाशिकच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची जिल्हा रुग्णालयात जाऊन शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी भेट घेत विचारपूस केली. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. मुस्लिम धर्मगुरू आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संयुक्तपणे मध्यरात्रीच्या सुमारास कारवाईला सुरुवात झाली. प्रशासनाच्या कारवाईबाबतीत चर्चा सुरू झाल्यानंतर अचानक हल्ला झाला. जमावाला पांगविण्यासाठी अश्रुधुरांचा वापर करण्यात आला. काही जणांना ताब्यात देखील घेण्यात आले आहे. जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे ना. भुसे म्हणाले. अनधिकृत दर्गा काढण्याबाबत उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार पोलिसांचे काम सुरू होते. असे असताना बेछूट दगडफेक करून वातावरण खराब करण्याचा प्रयत्न केला. ही गंभीर बाब आहे. असे वर्तन करणे चुकीचे आहे. या घटनेचा खोलात जाऊन तपास केला जाईल. या घटनेच्या पाठीमागे कोण आहे? याचा शोध घेतला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



## मॉडेल स्कूल विकसित करण्याची आवश्यकता

### आशिमा मित्तल : पुरस्कार वितरण उत्साहात



**नाशिक : प्रतिनिधी**

मॉडेल स्कूल विकसित करण्याची आवश्यकता असून, सर्व मॉडेल स्कूल निपुण करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक यांनी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

मिशन मॉडेल उपक्रम पुरस्कार वितरण सोहळा काल कालिदास कलामंदिर येथे पार पडला. त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातर्फे शाळांचा गुणवत्तापूर्ण विकास करण्यासाठी मिशन मॉडेल स्कूल उपक्रम राबविण्यात येत आहे. मिशन मॉडेल स्कूल उपक्रमाचा टप्पा-२ सन २०२४-२५ या वर्षात राबविण्यात आला. यात जिल्हा परिषदेच्या ५२२ शाळांचा समावेश करण्यात आला आहे. या टप्पा २ मधील ५२२ शाळांमधील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक व उपक्रमशील शिक्षक यांची कार्यशाळा व टप्पा-२ मधील उपक्रमशिल व उत्कृष्ट काम करणाऱ्या आदर्श शाळांना जिल्हा परिषदेतर्फे रोख रकमेच्या स्वरूपात बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमासाठी पॉवरग्रीड कॉर्पोरेशनचे संचालक चेतन कांकरिया, कोटक फाउंडेशनच्या सपना पुरंदरे, पॉवर ग्रीडचे उपमहाव्यवस्थापक प्रवीणकुमार, शिक्षणाधिकारी नितिन बच्छाव, शिक्षणाधिकारी भास्कर कनोज, प्राचार्य अनिल गौतम, जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, जि.प. शाळांचे मुख्याध्यापक, उपक्रमशिल शिक्षक उपस्थित होते. डॉ. नितीन बच्छाव यांनी मॉडेल स्कूलमधील उपक्रमांची माहिती दिली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शालेय वातावरण बालस्नेही करण्यात यावे त्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभाग शाळांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

या प्रसंगी मॉडेल स्कूल टप्पा २ मधील शाळांना पॉवरग्रिड कॉर्पोरेशनकडून प्राप्त सीएसआर निधीतून १३४४ शाळांना टॅब वितरित करण्यात आले. कार्यक्रमासाठी नीलेश पाटोळे, धनंजय कोळी, विजय बागुल, विजय पगार, सूर्यवंशी, दराडे, जाधव आदींनी प्रयत्न केले.

**जिल्हास्तरीय पुरस्कारप्राप्त शाळा, पुरस्काराचे स्वरूप**

- जि.प. शाळा दह्याणे, ता. कळवण- जिल्ह्यात प्रथम रु. ७५,००० व प्रशस्तीपत्र
- जि.प. शाळा जांभूळपाडा, ता. त्र्यंबक जिल्ह्यात द्वितीय रु. ५०,००० व प्रशस्तीपत्र
- जि.प. शाळा वाहेगावसाळ, ता. चांदवड जिल्ह्यात तृतीय रु. २५००० व प्रशस्तीपत्र
- जि.प. शाळा कुंभारी, ता. निफाड उत्तेजनार्थ रु १०,००० व प्रशस्तीपत्र

**तालुकास्तरीय पुरस्कारप्राप्त शाळा**

- जि.प. शाळा डांगसौंदाणे - प्रथम रु.११००० व प्रशस्तीपत्र
- जि.प. शाळा नामपूर मुले द्वितीय रु.५००० व प्रशस्तीपत्र
- चांदवड जि.प. शाळा दिघवद प्रथम रु.११००० व प्रशस्तीपत्र
- जि.प. शाळा दुगाव द्वितीय.रु.५०००.व प्रशस्तीपत्र
- देवळा जि.प. शाळा वाखारी प्रथम रु.११००० व प्रशस्तीपत्र
- जि. प. शाळा चिंचवे द्वितीय रु.५०००व प्रशस्तीपत्र, दिंडोरी
- जि. प. शाळा उमराळे (बु).प्रथम रु.११००० व प्रशस्तीपत्र
- जि.प. शाळा मोहाडी द्वितीय रु.५००० व प्रशस्तीपत्र.
- इगतपुरी जि. प. शाळा कोरपगाव प्रथम रु.११००० व प्रशस्तीपत्र

## चूक कबूल करून कारवाईचे स्वागत करा

### राऊतांच्या आरोपांना आ. फरांदेंचे प्रत्युत्तर

**नाशिक : प्रतिनिधी**

ठाकरे गटाच्या शिबिरावरचे लक्ष दुसरीकडे जावे म्हणून दर्गा हटविण्यासाठी आजचा दिवस निवडला. भाजपाच्या लोकांचा याबाबतीत कुणीच हात धरणार नाही. पंधरा दिवसांपूर्वीच हा मुहूर्त निवडला होता, असा आरोप खा. संजय राऊत यांनी शिबिरात बोलताना केला होता. या आरोपावर आमदार देवयानी फरांदे यांनी पलटवार करताना उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर हसावे की रडावे? हेच समजत नाही. आज बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी या कारवाईचे स्वागत केले असते, असे फरांदे म्हणाल्या.

संजय राऊत यांना दर्ग्यावरील कारवाईपेक्षा निर्धार मेळावा महत्त्वाचा वाटत आहे. त्यांची खरंच बाळासाहेबांची शिवसेना असती तर कारवाईचे त्यांनी स्वागत केले असते. पोलिस प्रशासनाचे त्यांनी अभिनंदन करायला पाहिजे होते. आज आम्ही शहरात आलो आणि एक अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले, असे म्हणायला हवे होते. पण ठाकरेंची शिवसेना हिंदुत्वापासून किती दूर गेली आहे हे यावरून समजत आहे, असा हल्लाबोल त्यांनी ठाकरे आणि राऊत यांच्यावर केला. भारतीय जनता पार्टीने कोणताच मुहूर्त काढलेला नाही. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे प्रशासनाने त्यांची भूमिका निभावली आहे, असा पलटवार देवयानी फरांदे यांनी केला.

## जिल्ह्यात सात तालुक्यांमध्ये ३४ टँकर

### पाण्यासाठी महिलांची वणवण

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यात एप्रिलच्या मध्यातच पाणी टंचाईची समस्या तीव्र झाली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पाण्याचा तुटवडा निर्माण होत असल्याने अखेर प्रशासनाकडून इगतपुरी, मालेगाव, चांदवड, पेठ, सुरगाणा, सिन्नर, येवला अशा एकूण सात तालुक्यांतील २२ गावे व ३५ वाड्यांवर २२ टँकरद्वारे ३४ फेऱ्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

यात सहा शासकीय तर १६ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करत ग्रामीण भागाची तहान भागविण्यात येत आहे. यात सर्वाधिक येवला तालुक्यातील १२ गावे व ११ वाड्यांवर ९ टँकरद्वारे १२ फेऱ्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्याखालोखाल मालेगाव तालुक्यातील १५ गावांत ५ टँकरद्वारे १२ टँकर फेऱ्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाल्याने टँकरच्या मागणीत वाढ होत आहे.

| तालुका | गावे | एकूण टँकर | फेऱ्या |
|---|---|---|---|
| इगतपुरी | ७ | १ | २ |
| मालेगाव | १५ | ५ | १२ |
| चांदवड | २ | २ | २ |
| पेठ | १ | १ | १ |
| सुरगाणा | १ | १ | २ |
| सिन्नर | ८ | ३ | ३ |
| येवला | २३ | ९ | १२ |
| **एकूण** | **५७** | **२२** | **३४** |

प्रशासनाकडून मागणीनुसार टँकर सुरू करण्यात आले आहेत. एप्रिलच्या पंधरा दिवसांत सात तालुक्यांमध्ये टँकर सुरू करण्यात आले आहेत. मागील वर्षी उन्हाळ्यात सर्वाधिक ३९९ टँकर फेऱ्यांच्या माध्यामातून पाणीपुरवठा करण्यात येत होता. त्यामुळे यंदाही मे महिन्यात टँकर फेऱ्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जिल्ह्यात मागील वर्षी पर्जन्यमान चांगले होते. यंदा पाऊस नियोजित वेळी पडला नाही तर भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### पाणीबचतीचे आवाहन

सध्या जिल्ह्यातील ७ मोठ्या, १७ मध्यम धरणांमध्ये ३६.२८ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. तर गंगापूर धरण समूहात ५२.५९ टक्के पाणीसाठा आहे.

### सात विहिरींचे अधिग्रहण

जिल्ह्यातील सात विहिरींचे टँकरसाठी अधिग्रहण करण्यात आले. यात मालेगाव तालुक्यातील पाच विहिरींचा तर पेठ तालुक्यातील एक व सुरगाणा तालुक्यातील एका विहिरीचा समावेश आहे.

## मेरा नंबर कब आयेगा?

### शहरात सीएनजीचा तुटवडा; वाहनचालक हैराण

**नाशिक : प्रतिनिधी**

**पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य नागरिक सीएनजी वाहनांकडे वळले आहेत. सीएनजी स्वस्त असल्याने अनेकजण आपल्या जुन्या वाहनांमध्ये सीएनजी किट बसवून घेत आहेत. नागरिकांचा सीएनजीकडे कल वाढू लागला असताना, जिल्ह्यात सीएनजी पंपांची संख्या मात्र अत्यल्प आहे. वाहनांच्या तुलनेत ही संख्या अपुरी असल्याने शहरी व ग्रामीण भागातील वाहनधारकांना वाहनांमध्ये सीएनजी भरताना दमछाक होत आहे. पेट्रोलपंपांवर सीएनजीसाठी कधी नंबर लागणार? या प्रतीक्षेत तासन्तास टाइमपास करण्याची वेळ वाहनधारकांवर आली आहे.**

गेल्या तीन महिन्यांपासून शहर व जिल्ह्यात सीएनजीचा तुटवडा जाणवत आहे. मात्र, गेल्या आठ दिवसांपासून सीएनजीचा प्रचंड तुटवडा जाणवत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. परिणामी पेट्रोलपंपावर सीएनजी भरण्यासाठी वाहनधारकांना दोन ते तीन तास रांगेत उभे राहावे लागत असल्याने नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. सीएनजी पंप असोसिएशनने वितरकांकडून होणाऱ्या पुरवठ्यातील विसंगतीवर नाराजी व्यक्त केली आहे.

> महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड यांच्यातर्फे नाशकात सीएनजीचा पुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र नॅचरल गॅस यांच्या वतीने झोडगे येथील प्रकल्प सुरू झाल्यानंतर सीएनजीचा तुटवडा जाणवणार नाही असे सांगण्यात आले होते. मात्र, अद्याप पुरवठा सुरळीत झाला नाही. यासंदर्भात महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडला निवेदन देणार आहे.
>
> **-विजय ठाकरे,** अध्यक्ष, नाशिक जिल्हा पेट्रोल डीलर्स असोसिएशन



> चार ते पाच तास रांगेत उभे राहूनही सीएनजी मिळत नाही. काही दिवसांपासून अतिरिक्त पैसे मोजून पेट्रोल टाकावे लागत आहे. सीएनजीचा शहरात कायमच तुटवडा जाणवतो. यावर काही उपाययोजना करायला हव्यात.
>
> **-संतोष पाटील,** वाहनधारक

### सीएनजीचे ५० पंप

जिल्ह्यात सध्या सुमारे ५० सीएनजी पंप असून, त्यापैकी १० ते १२ पंप नाशिक शहरात आहेत. दररोज सरासरी ७०० ते ८०० किलो सीएनजीचा पुरवठा होतो. मात्र, सध्या प्रत्येक पंपाला केवळ ४०० किलो सीएनजी पुरवठा केला जात आहे. सामान्यत: शहरात २०० टँकरद्वारे सीएनजीचा पुरवठा केला जातो, पण मागील दोन दिवसांपासून केवळ २० टँकरच उपलब्ध होत आहेत. त्यामुळे वाहनचालकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, त्यांची मोठी गैरसोय होत आहे.

### उपासमारीची वेळ

प्रदूषण होऊ नये, वाहनाला अधिक मायलेज मिळावे, यासाठी मोठ्या प्रमाणात शहरात सीएनजी वाहनांची संख्या वाढली आहे. पेट्रोल, डिझेलपेक्षा सीएनजीचा दर कमी असल्याने वाहनधारक सीएनजीचा वाहनाचा वापर करतात. मात्र, सीएनजी रिक्षाचालकांना गॅस मिळत नसल्याने शेकडो रिक्षाचालकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

नाशिक आज
# गांवकरी




राष्ट्रीय जलमार्गामुळे सरकारी तिजोरीत भर पान ३



घाऊक महागाईत दोन टक्क्यांची घसरण पान ३

नाशिक, गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५

# ‘तोडा, फोडा अन् राज्य करा’ हीच भाजपाची नीती

## आदित्य ठाकरे : शिवसेना निर्धार शिबिराचे उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

पाशवी बहुमत असलेल्या राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी जनतेला अनेक आश्वासने दिली होती. मात्र, आता सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहे. लाडक्या बहिणींना पाचशेच रुपये दिले जाणार आहेत. भाजपाचेच लोक लाडक्या बहिणींना दिल्या जाणाऱ्या पैशांविरोधात याचिका दाखल करतील. आणि योजना बंद करतील. कारण हे सरकार निर्लज्ज आहे. निवडणूक झाल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत एकही चांगली योजना आणली नाही. पुरोगामी महाराष्ट्रात जाती-जातीत कधीही वाद नव्हते. आता भाजप समाजात विष पेरत आहे. मुळात सत्तेसाठी भाजप तोडा, फोडा अन् राज्य करा, या नीतीचा अवलंब करत असल्याची घणाघाती टीका युवासेनाप्रमुख तथा माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी केली.

नाशिकमधील मनोहर गार्डन येथे बुधवारी (दि. १६) ठाकरे गटाच्या निर्धार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्र चाललाय कुठे? या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी खा. संजय राऊत, खा. अरविंद सावंत, खा. राजाभाऊ वाजे, उपनेते सुधाकर बडगुजर, सुनील बागूल, माजी खासदार राजन विचारे, विनायक राऊत, दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, माजी आमदार वसंत गिते, महानगरप्रमुख विलास शिंदे, भारती ताजनपुरे, युवासेना जिल्हाप्रमुख राहुल ताजनपुरे उपस्थित होते.

आदित्य ठाकरे म्हणाले, निवडणूक आयोगाच्या आशीर्वादामुळे राज्य सरकार बसले आहे. यांनी शेतकऱ्यांसाठी एक तरी चांगली योजना आणली का? युवक-युवतींसाठी काय केले? निवडणुकीच्या वेळी गावागावांत जाऊन लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये महिन्याला देणार असल्याचे सांगितले. मात्र, निवडणूक होताच यांना लाडक्या बहिणींचा विसर पडला आहे. ज्या महिलांच्या खात्यांत पैसे गेले ते परत काढून घेत आहेत. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, वीजबिल माफ करू यांसह अनेक आश्वासने दिली होती. हे सरकार आल्यापासून राज्याची विकासात पीछेहाट होत आहे. उलट प्रत्येक जिल्ह्यात गुन्हेगारी फोफावली आहे. महिलांवरील अत्याचार वाढला आहे. एसटीमध्ये बलात्काराच्या घटना घडत आहेत. गृहमंत्री या घटनेवर निर्लज्जासारखे बोलतात. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली.

नाशिक शहर स्मार्ट सिटी म्हणून ओळखले जाते. परंतु, शहरात धड रस्ते नाही. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन कसे केले जाईल, याचे नियोजन नसल्याची टीका आदित्य ठाकरे यांनी केली. भाजपला महाराजांचे शौर्य पुसून टाकायचे आहे. म्हणूनच आपल्या राज्यात येऊन छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचा अवमान होत आहे. भाजपाची लोकं हे काम करत असल्याचे त्यांनी म्हटले.



नाशिक : शिवसेनेच्या निर्धार शिबिराचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना शिवसेना नेते युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे. समवेत खा. संजय राऊत, खा. अरविंद सावंत, माजी खा. चंद्रकांत खैरे, खा. विनायक राऊत, माजी आमदार राजन विचारे, शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर, दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख विलास शिंदे आदी.( छाया : जगदीश सोनवणे)

### ठाकरे म्हणाले

- लाडकी बहीण योजना बंद करणार
- महायुती सरकार निर्लज्ज
- महापुरुषांचा वारंवार अवमान
- शंभर दिवसांत एकही चांगली योजना नाही

### २०१४ पासून जनतेची फसवणूकच

देशात २०१४ मध्ये जनतेने अच्छे दिन, विकास, काळा पैसा परत आणू यावर विश्वास ठेवून भाजपाला निवडून दिले. प्रत्यक्षात काहीच झाले नाही. त्यानंतर जनतेची वेगवेगळ्या प्रकारे दिशाभूलच केल्याची टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

### दंगलीतून राज्याला मागे हटविण्याचा डाव

नागपूर आणि नाशिक ही शांत शहरे आहेत. मात्र, मागील काही दिवसांत दंगली घडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. लक्ष विचलित करण्याचा हा प्रयत्न आहे. राज्याला मागे हटविण्याचा डाव असल्याचा आरोप ठाकरे यांनी यावेळी केला.

### सरपंच हत्येचे फोटो आल्यावर मंत्र्याचा राजीनामा

बीड येथील सरपंच हत्येप्रकरणी आम्ही संबंधितावर कारवाई करावी, यासाठी सुरुवातीपासून मागणी लावून धरली. राज्य शासनाने मात्र याकडे दुर्लक्ष केले. जेव्हा सरपंच हत्येतील फोटो बाहेर आले, त्यावेळी एका मंत्र्याचा राजीनामा घेतला गेला, असे आदित्य ठाकरे यांनी धनंजय मुंडे यांचे नाव न घेता त्यांच्यावर आणि सरकारवर टीका केली. येथे भाजपाच्या कार्यकर्त्याला न्याय मिळत नाही तर आपल्याला काय न्याय मिळेल? असा सवालही त्यांनी केला.

# भाजपा उन्मत्त हत्ती; शिवसैनिकांनी खचू नये

## अंबादास दानवे यांचा सल्ला



**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील सत्ता गेली, काही आमदार सोडून गेले, मात्र खचून न जाता पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करावे, असे आवाहन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले. भाजपा हा उन्मत्त हत्तीसारखा वागतोय, पण खचून जाऊ नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

निर्धार मेळाव्यात दानवे शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना बोलत होते. महाराष्ट्रात शिवसैनिकांवर खोटे गुन्हे दाखल केले जात असून, तडीपार करण्याचे काम सुरू असल्याचा आरोप दानवे यांनी केला.

विधानसभेला जिल्ह्यात शिवसेनेला लाखोंनी मते मिळाली. त्यामुळे यापुढे आपले कसे होणार? पक्षाचे काय होणार? याचा विचार कोणीही करू नये. पुढच्या काळात आणखी ताकदीने उभे राहायचे आहे. सध्या भाजपा उन्मत्त हत्तीसारखा वागत आहे. मात्र, आपण खचून न जाता पक्ष संघटनासाठी जोमाने काम करायचे आहे. पक्ष संघटन मजबुतीसाठी जनतेत गेले पाहिजे. मोठी आंदोलने करायला हवी. आंदोलन करताना ती फक्त व्हॉट्सॲपवर चमकोगिरी करणारी नसावी. तसेच वॉर्डप्रमुख, शाखाप्रमुख, विभागप्रमुख, तालुकाप्रमुख, गटप्रमुख सर्वांनी त्यांची जबाबदारी ओळखायला हवी. शिवसेनेने वक्फबाबत घेतलेल्या भूमिकेवर संशय व्यक्त केले जातात. मुळात शिवसेनेची भूमिका काय आहे हे पटवून देण्यास आपण कमी पडतोय. मुंबई अदानीच्या घशात घालण्याचे काम सुरू आहे, असा आरोप दानवे यांनी व्यक्त केला.

### आम्हाला हिंदुत्व कोणीही शिकवू शकत नाही

शिवसेनेला कोणीही हिंदुत्व शिकवू शकत नाही. निष्ठा महत्त्वाची आहे. हिमतीने काम करण्याची आवश्यकता आहे. अपयशाने खचून जाण्याची गरज नाही. आत्मविश्वासाने काम करत रहा. उद्धव ठाकरे एकटे लढत असताना त्यांच्यावर गल्लीतील चिल्लर ते दिल्लीच्या नेत्यांकडून टीका केली जाते. राणेंचे पिल्लू ठाकरे, राऊत यांच्याबद्दल बोलत असते. कारण त्यांना आमची भूमिका टोचत असल्यानेच ही टीका होत असल्याचे दानवे म्हणाले.



नाशिक : आम्ही इथेच चर्चासत्रात शिवसेना खा. सावंत, खा. राजाभाऊ वाजे, माजी खा. राजन विचारे यांची मुलाखत घेताना खा. संजय राऊत.( छाया : जगदीश सोनवणे)

# राजकारण संपले तरी चालेल, आम्ही सेनेसोबतच!

## परिसंवादात आजी-माजी खासदारांच्या भावना

**नाशिक : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद सोबत आहे. पक्ष आज अडचणीत असला तरी आम्ही साधे लोक होतो. पक्षाने आम्हाला आमदार, खासदार केले. या संकट काळात आम्ही उद्धव ठाकरे यांच्या सोबतच आहोत. राजकारण संपले तरी चालेल, मात्र आम्ही शिवसेनेसोबतच राहणार असल्याचा विश्वास खा. अरविंद सावंत, खा. राजाभाऊ वाजे, माजी खासदार राजन विचारे, चंद्रकांत खैरे यांनी आम्ही इथेच का, या परिसंवादात बोलताना व्यक्त केला.

निर्धार शिबिरात खा. संजय राऊत यांनी या नेत्यांची मुलाखत घेत भूमिका जाणून घेतली. खा. राऊत यांनी खा. वाजे यांना विचारलं की, दिल्लीत ठाकरेंचे खासदार फुटणार, अशी चर्चा सतत होते, तेव्हा तुमचे नाव येत नाही याबाबत विचारले असता खा. वाजे म्हणाले, पक्ष तुटल्यावर बरेच निरोप आले. जवळचे सोडून गेले. भेटले की निरोप द्यायचे. इकडे या. परंतु उद्धव ठाकरे यांना शेवटपर्यंत साथ देणार, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. खा. अरविंद सावंत म्हणाले, शिवसेनेत जेव्हा जेव्हा बंडखोरी झाली तेव्हा लोक मला विचारतात, तुम्ही कुठे. मी म्हणतो मी इथेच. आमची निष्ठा ‘मातोश्री’सोबत असल्याचे त्यांनी सांगितले. सीमा आंदोलनांवेळी मला पोलिसांनी झोडले. परंतु बाळासाहेबांनी मला शाबासकी दिली. मुंबईत एका मोठ्या कंपनीत नोकरभरतीत इंजिनिअर पदासाठी ३६० उमेदवार परप्रांतीय होते. चौकशी केल्यावर ते दाक्षिणात्य असल्याचे समजले. मराठी मुलांना संधी दिली नाही म्हणून मी आंदोलन केले. त्यावेळी पोलिसांनी मला पकडले. तेव्हा माझ्यासाठी आंदोलन करत नाही. उद्या तुमचा मुलगा असू शकतो, असे त्या अधिकाऱ्याला सांगितले. त्यानंतर मला सोडून दिले आणि सोडताना ते म्हणाले, मराठीसाठी लढत रहा, अशी आठवण त्यांनी सांगितली.

माजी खासदार राजन विचारे म्हणाले, कार्यकर्ता येथेच आहे. प्रेम कायम आहे. शिवसैनिक ठाकरेंसोबतच आहे. ठाण्यासाठी गद्दारी नवी नाही. महापौर निवडणुकीत गद्दारी झाली होती. ३ वर्षांपूर्वी काहींनी शिवसेना फोडली. १३३ देशांनी ते बघितले हे सांगतात. पण ही गद्दारी भूषणावह नाही. आज सोडून गेले ते लाभार्थी आहेत. त्यांचे दोन नंबर धंदे असल्याची टीका विचारे यांनी केली.

### १९९० मध्ये पहिला हिंदू आमदार : खैरे

माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. मराठी माणसाच्या न्याय्य हक्क व हिंदू रक्षणासाठी शिवसेना लढली. दंगली झाल्या. आम्हाला अटक झाली. १९९०ला पहिला हिंदू आमदार झालो, असे ते म्हणाले. ज्या पक्षाने आम्हाला भरभरून दिले त्यांच्या संकटकाळात आम्ही ठामपणे सोबत असल्याचे त्यांनी सांगितले.

# विधानसभेला ४३ लाख मतदारांची नावे यादीत कशी?

## खा. विनायक राऊतांचा आरोप, ५७ उमेदवारांचा कमी मताने पराभव

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत ठाकरे पक्षाला घवघवीत यश मिळाले. बूथप्रमुख व पदाधिकाऱ्यांनी मतदारयाद्यांवर बारीक नजर ठेवली. त्यामुळे हे शक्य झाले. मात्र, विधानसभा निवडणुकीत आपण गाफील राहिलो. म्हणूनच तब्बल ४३ लाख मतदार नियमबाह्य पद्धतीने वाढल्याचा आरोप माजी खा. विनायक राऊत यांनी केला. वाढवलेल्या मतदारांमुळेच आमचे ५७ आमदार पराभूत झाल्याचा दावा राऊत यांनी करत आगामी निवडणुकीत बूथवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले.





निर्धार मेळाव्यातील पहिल्या सत्रातील ‘बूथ व्यवस्था व मतदारयाद्या’ या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मतदारयाद्यांमध्ये ४३ लाख मतदार वाढल्याने ठाकरे सेनेचे ५७ उमेदवार पाच ते दहा हजार मतांनी पराभूत झाले. राज्यातील प्रत्येक मतदारसंघात मोठ्या प्रमाणात चुकीच्या पद्धतीने मतदार वाढवण्यात आले, असा गंभीर आरोप विनायक राऊत यांनी केला. मतदारयादीतील मतदारांची वाढलेली संख्या संशयास्पद असल्याचे त्यांनी म्हटले.

सरकार जाणूनबुजून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेत नाही. मात्र, त्या कधीही होऊ शकतात. त्यामुळे बूथप्रमुखांनी आळस झटकून काम करावे. बूथप्रमुखांनी आळस झटकून घरोघरी जात संपर्क साधावा. बूथप्रमुखाला मतदारसंघाचा, वॉर्डाचा कानाकोपरा माहीत असतो. तिथल्या माणसांना तो ओळखतो. त्यामुळे मतदानाच्या दिवशी बाहेरचा माणूस लगेच ओळखता येईल. महाराष्ट्राच्या निवडणुकीत खास गुजरातहून आलेली टीम भाजपसाठी काम करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला. पश्चिम बंगाल व इतर राज्यांच्या निवडणुका असून, तेथेही विजयासाठी मतदार वाढवण्याचा पॅटर्न वापरला जाऊ शकतो. त्यामुळे आता यापुढे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये गाफील राहून चालणार नसल्याचे विनायक राऊत यांनी म्हटले.



नाशिक : शिवसेनेच्या निर्धार शिबिरास उपस्थित शिवसेना उबाठा पदाधिकारी व शिवसैनिक.

# बडगुजर म्हणाले, हमे तो अपनों ने लुटा...

## खा. संजय राऊत म्हणाले, मुद्यावर बोला!

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत तत्कालीन जिल्हाप्रमुखांना तिकीट नको म्हणून पक्षप्रमुखांना दिलेल्या पत्रावर माजी आमदार वसंत गिते, उपनेते सुनील बागूल, दत्ता गायकवाड, विलास शिंदे यांच्यासह माझी स्वाक्षरी होती. परंतु या सर्वांना सोडून आपल्या एकट्यालाच टार्गेट करण्यात आले. हमे तो अपनों ने लुटा गैरों में कहाँ दम था! असे म्हणत ठाकरे गटाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांनी मनातील खदखद व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. तथापि, खा. संजय राऊत यांनी बडगुजरांना मध्येच थांबवत निवेदकाने विचारलेल्या प्रश्नावरच बोलण्यास सांगितले.

विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे शल्य बाजूला झटकून शिवसेना ठाकरे गटातर्फे शहरात निर्धार शिबिराचे मनोहर गार्डन येथे आयोजन करण्यात आले. शिवसैनिकांसह पदाधिकाऱ्यांमधील मरगळ दूर करून त्यांनी नव्या जोशाने तयारीला लागावे. या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. मी शिवसेनेतच का? यावर चर्चासत्रात निवेदकाने बडगुजर यांना तुम्हाला मध्यंतरी खूप त्रास झाला. संघर्ष करावा लागला याविषयी विचारले. बडगुजर यांनी पक्षातीलच काही जणांकडून त्रास दिल्याचे अप्रत्यक्षपणे बोलून दाखवले. त्यानंतर दिलवाले चित्रपटातील ‘हमे तो अपनों ने लुटा, गैरों में कहाँ दम था’ असे म्हणत आपल्यालाच टार्गेट करण्यात आले, असे बोलण्यास सुरुवात करताच खाली बसलेले खा. संजय राऊत यांनी ‘अहो, बडगुजर तुम्ही विचारलेल्या प्रश्नावर बोला. विषयाला फाटा देऊ नका, असे म्हटले. बडगुजर यांनी केलेल्या या शेरोशायरीचा अर्थ नेमका काय घ्यायचा? यावरून हॉलमधील उपस्थितांमध्ये एकच चर्चा रंगली होती.

# प्रवाहाविरोधात पोहतो तोच खरा शिवसैनिक!

## मी शिवसेनेसोबत का? पदाधिकाऱ्यांनी मांडले विचार

**नाशिक : प्रतिनिधी**

पक्ष फुटल्यानंतर काही जण दुसरीकडे गेले. मात्र, ज्यांनी मोठे केले त्यांच्याशी विश्वासघात करणे आपल्या रक्तात नाही. संकटात संधी शोधत प्रवाहाविरोधात पोहतो तो खरा शिवसैनिक असतो. परिस्थिती आज प्रतिकूल असली तरी उद्या ती बदलणारच असल्याचा विश्वास शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

मी अजूनही शिवसेनेसोबत का? या परिसंवादातून उपनेते सुधाकर बडगुजर, माजी आमदार वसंत गिते, एकलव्य संघटनेचे शिवाजी ढवळे यांनी भावना व्यक्त केल्या.



उपनेते सुधाकर बडगुजर म्हणाले, मी संकटात संधी शोधतो. शिवसैनिकांच्या मनगटात संघर्षाची ताकद आहे. २००७ ला पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आलो. अनेकांनी मला बोलावले. परंतु मी संजय राऊत यांच्या संपर्कात आलो. मला सत्तेत जाणे शक्य होते. पण मला प्रवाहाच्या विरोधात पोहायला आवडते.येणारा काळ ठाकरे सेनेचा असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी आमदार वसंत गिते म्हणाले, ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे बाळासाहेबांनी शिकवले. सत्ता असो वा नसो, पण काम उभे केले पाहिजे. आम्ही संभाजीनगरला शाखा उघडण्यास जायचो. पन्नास रुपये गोळा करून जायचो. शिवसैनिकांनी या शहर व जिल्ह्यातील दादागिरी संपवली. दत्ता गायकवाड, सुनील बागूल, विनायक पांडे यांनी आजसुद्धा एकत्र आलो तर गद्दारांना गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा दिला.

उपनेते अद्वय हिरे म्हणाले, संकटात ठाकरेंसोबत राहिलो नसतो तर भाऊसाहेब हिरे यांच्या आत्म्याने मला माफ केले नसते. मालेगावला बाजार समितीत आम्ही यश मिळवले. नंतर मला तुरुंगात टाकले. पोलिसांकडून निरोप यायचा आमच्यासोबत या. परंतु मी तुरुंगात राहणे पसंत केले पण वाकलो नाही. पराभवानंतर लोक सोडून गेले. मला त्याची चिंता नाही. बदल होणार. आग लावणाऱ्या नाही तर विझवणाऱ्यांच्या यादीत माझं नाव असेल. जन्माला आल्यापासून सत्ता पाहतो. मला सत्तेचा मोह नाही. आमच्या परिवाराला त्रास देण्यात आला. पण मी झुकलो नाही. ९५ वर्षांच्या आजीला पोलिसांत हजेरी लावायला लावली. मानसिक त्रास दिला.

मात्र, सत्तेत आल्यावर खासदार राऊत या सर्वांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी दिला. शिवाजी ढवळे म्हणाले, नदी खोऱ्यातील आदिवासींना एकत्र केले. आम्ही राष्ट्रवादीसोबत गेलो होतो. परंतु अनुभव वाईट आला. त्यानंतर आम्ही शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेने गोरगरिबांना संसदेत, विधानसभेत पाठवले. लोकशाही दरबारी राजकारणातून मुक्त केले. गद्दारांनी निरोप पाठवला. परंतु ओठात एक, पोटात एक असं नेतृत्व नको. आम्ही उभ्या जन्मात ते करू शकत नाही. शेवटच्या श्वासापर्यंत ठाकरेंसोबत कटिबद्ध असल्याचे ढवळे यांनी म्हटले.

### मराठी, हिंदुत्वाच्या मुद्यावर एकत्र

प्रस्थापितांचे राजकारण मोडून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी रिक्षाचालक, टपरीचालक, सायकल पंक्चर काढणाऱ्याला आमदार, खासदार केले. जात-पात न मानता मराठी, हिंदुत्वाच्या मुद्यावर एकत्र केले. म्हणून आम्ही शिवसेनेसोबत आहोत. पराभवाने आम्ही खचणार नसल्याचा विश्वास यावेळी या नेत्यांनी व्यक्त केला.

अग्रलेख

# काँग्रेसचे नॅशनल हेराल्ड

नॅशनल हेराल्ड प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यात आल्याने काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अडचणी वाढल्या आहेत. सूडाचे राजकारण म्हणून भाजपाने ईडीचा गैरवापर केल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. यावरून देशात पुन्हा एकदा ईडीविषयी सुरू असलेल्या चर्चेत आणखी भर पडणार आहे. पंडित नेहरू यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू केलेले नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र २००८ साली बंद पडले. या वृत्तपत्राची मालमत्ता एका कंपनीच्या माध्यमातून हडप केल्याच्या आरोपावरून सोनिया गांधी आणि राहुल गांधी तसेच सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांच्या विरोधात दिल्लीतील एका विशेष न्यायालयात ईडीने (सक्त वसुली संचालनालय) आरोपपत्र दाखल केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भाजपाचे नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी नोव्हेंबर २०१२ मध्ये गांधी कुटुंबावर या वृत्तपत्राची जमीन हडपल्याचा आरोप करत फौजदारी तक्रार दाखल केली होती. ऑगस्ट २०१४ मध्ये ईडीने या प्रकरणात मनी लाँड्रिंग झाले आहे काय? याची चौकशी सुरू केली. सप्टेंबर २०१५ मध्ये ईडीने या प्रकरणाची पुन्हा चौकशी सुरू केली. आता या प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात विविध न्यायालयांत बऱ्याच घडामोडी घडल्या. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) नावाच्या कंपनीने नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी सुरू करण्यात आले होते. काँग्रेसचे मुखपत्र म्हणून ते चालविले जात होते. कंपनीत पंडित नेहरू यांच्यासह सुमारे पाच हजार स्वातंत्र्यसैनिकांनी गुंतवणूक केली होती. हिंदीत नवजीवन, उर्दूत कौमी आवाज आणि इंग्रजीत नॅशनल हेराल्ड या नावाने हे वृत्तपत्र चालविले जात होते. ब्रिटिश सरकारने या वृत्तपत्रांवर एकदा बंदी घातली होती. नंतर १९४५ मध्ये ते पुन्हा सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर एजेएल कंपनी तोट्यात गेली. देशात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार असताना सन २००८ साली हे वृत्तपत्र बंद पडले. ते पुन्हा सुरू करण्यासाठी काँग्रेसने एजेएलला ९० कोटी रुपयांचे व्याजमुक्त कर्ज दिले होते. तथापि, वृत्तपत्राचे पुनरुज्जीवन होऊ शकले नाही आणि काँग्रेसचे कर्ज फेडण्यात एजेएल अपयशी ठरली. या वृत्तपत्राची दिल्ली, मुंबई, पंचकुला, लखनौ आणि पाटणा येथील मालमत्ता भाडेतत्त्वावर देण्याचे पर्याय काँग्रेस पक्षाने शोधले. सोनिया गांधी, ऑस्कर फर्नांडिस आणि त्यांच्या काही निकटच्या मित्रांनी नोव्हेंबर २०१० मध्ये यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी पाच लाख रुपयांच्या गुंतवणुकीतून स्थापन केली. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्याकडे या कंपनीचे सर्वाधिक शेअर्स आहेत. या कंपनीने २०११ मध्ये बंद असलेल्या एजेएल कंपनीचे शेअर्स केवळ ५० लाख रुपयांत घेतले, असा आरोप भाजपाचे नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी केला होता. या व्यवहारात मनी लाँड्रिंग आणि फसवणूक झाल्याचे आरोप झाल्याने हे प्रकरण नॅशनल हेराल्ड नावाने ओळखले जाऊ लागले. गांधी परिवाराने केवळ पाच लाख रुपयांनी सुरू केलेल्या यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची मालमत्ता ८०० कोटी रुपयांच्या वर आहे. या कंपनीत गांधी परिवारातील सदस्यांचे सर्वाधिक शेअर्स असल्याने ही मालमत्ता त्यांनीच हडपली असल्याचा आरोपही स्वामी यांनी केला होता. त्यांनी कनिष्ठ न्यायालयात तक्रारही दाखल केली होती. सन २०१४ साली देशात भाजपाचे सरकार आल्यानंतर ऑगस्ट २०१४ मध्ये ईडीने या प्रकरणात मनी लाँड्रिंग झाले आहे काय? याची चौकशी सुरू केली. सप्टेंबर २०१५ मध्ये ईडीने या प्रकरणाची पुन्हा चौकशी केली. यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड आणि एजीएल यांच्यात झालेल्या व्यवहाराचा थेट फायदा सोनिया गांधी, राहुल आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांना तसेच मित्र परिवाराला अर्थात काँग्रेसच्या नेत्यांना झाला, असा सर्वसाधारण आरोप आहे. याच अनुषंगाने त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी भाजपाकडून ईडीचा वापर केला जात असल्याचा आरोप काही नवा नाही. ईडीने याप्रकरणी ६६१ कोटी रुपयांची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. दिल्ली, मुंबई आणि लखनऊमधील मालमत्ता जप्त करण्यासाठी संबंधित निबंधकांना नोटिसा जारी केल्या आहेत. दिल्लीच्या बहादूरशाह जफर मार्गावरील 'हेरॉल्ड हाऊस'वर कारवाई केली जात आहे. मुंबईच्या वांद्रे येथील 'हेरॉल्ड हाऊस'च्या सात ते नऊ मजल्यावरील कार्यालय 'जिंदाल साऊथ वेस्ट प्रोजेक्ट्स लिमिटेड'ला भाड्याने दिले आहे. त्यांना नोटीस देऊन हे भाडे 'ईडी'कडे भरण्यास सांगण्यात आले आहे. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या आरोपपत्रावर पुढील सुनावणी २५ एप्रिल रोजी ठेवली असून, जेव्हा ईडी आणि तपास अधिकाऱ्यांचे विशेष वकील न्यायालयाच्या निरीक्षणासाठी 'केस डायरी' सादर करण्याची खात्री करतील तेव्हा आरोपपत्रावर २५ एप्रिल रोजी विचार केला जाईल, असे न्या. गोगणे यांनी म्हटले आहे. या आरोपापत्रानंतर काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. पक्ष, सोनिया गांधी, राहुल गांधी यांना अडचणीत आणण्यासाठीच आरोपपत्र दाखल करण्यात आले असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. नॅशनल हेराल्ड हे काँग्रेसचे वृत्तपत्र होते. ते चालविण्यासाठी नेहरूंनीच पुढाकार घेऊन एजेएल कंपनी स्थापन केली. ही कंपनी तोट्यात गेल्यानंतर तिच्यावर ताबा मिळविण्यासाठी सोनिया गांधी यांनी पुढाकार घेऊन यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन केली आणि या कंपनीने एजेएलची मालमत्ता विकत घेतली. यामध्ये यंग इंडियन कंपनीत अनेक काँग्रेस नेत्यांचे शेअर्स आहेत. एकूणच नॅशनल हेराल्ड प्रकरण गांधी परिवार आणि काँग्रेसभोवती फिरणारे आहे. सुब्रमण्यम स्वामी यांनी गांधी परिवाराला अडचणीत आणण्यासाठी २०१२ मध्ये पहिली तक्रार दाखल केली होती. त्यानंतर दोन वर्षांनी ईडीने यामध्ये लक्ष घातले आणि आता आरोपपत्र दाखल केले आहे. न्यायालयात आरोपी म्हणून सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांसह काँग्रेस पक्षाला आपली बाजू मांडण्याची एक संधी आहे. पुढे या प्रकरणाचे काय होणार? हा प्रश्न असला, तरी भाजपा आणि काँग्रेस यांच्यात ईडीवरुन आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडतील. रस्त्यावर येऊन काँग्रेस आंदोलनही करुन सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्नही करेल. पण, कायदेशीर आधारावरच काँग्रेसला लढा द्यावा लागणार आहे.

# भारतावर ओढावलेले जलसंकट : एक गंभीर आव्हान

पृथ्वीवरील जीवनाचा मूलभूत आधार म्हणजे पाणी. परंतु आज हेच पाणी संपत्तीच्या रूपात दुर्मिळ होत चालले आहे. भारतासह संपूर्ण जगाला जलसंकटाचा सामना करावा लागत आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या, अनियंत्रित औद्योगिकीकरण, हवामानबदल, जंगलतोड, भूजलाचा अतिरेकाने वापर आणि अपुरे जलव्यवस्थापन यामुळे ही समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत आहे.

भारतातील जलसंकटाचे स्वरूप समजण्यासाठी काही महत्त्वाची आकडेवारी पाहणे आवश्यक आहे. नीती आयोगाच्या २०१९ च्या अहवालानुसार, भारतात ६० कोटी लोकसंख्या गंभीर जलतुटवड्याला सामोरे जात आहे, तर दरवर्षी सुमारे दोन लाख लोक असुरक्षित पाणी प्यायल्यामुळे मृत्युमुखी पडतात. वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, भारत हा पाणीटंचाईच्या बाबतीत जगातील १३व्या क्रमांकाचा देश आहे. भारतात ८० टक्के पाणी शेतीसाठी वापरण्यात येते, मात्र पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होत आहे. भूजलाचा प्रचंड उपसा केल्यामुळे १९५० पासून आतापर्यंत भूजल पातळी सुमारे ६०टक्के घटली आहे.

**जलसंकटाची कारणे**

भारतातील जलसंकट वाढण्याची अनेक कारणे आहेत, त्यातील काही महत्त्वाची खालीलप्रमाणे आहेत :

१. लोकसंख्येची वेगाने होणारी वाढ आणि पाण्याची वाढती मागणी : भारताची लोकसंख्या सध्या १४० कोटींच्या पुढे पोहोचली आहे आणि भविष्यात ती आणखी वाढेल. लोकसंख्यावाढीमुळे पिण्यासाठी तसेच शेती व उद्योगांसाठी पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

२. भूजलाचा अतिवापर आणि घटता जलस्तर : भारतातील बहुतांश भागात पाण्याचा प्रमुख स्रोत म्हणजे भूजल. मात्र, शेती, घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी भूजलाचा मोठ्या प्रमाणात उपसा केला जात आहे, परिणामी भूजल पातळी सातत्याने घटत आहे.

३. अपर्याप्त जलव्यवस्थापन आणि पाण्याचा अपव्यय : भारतासारख्या देशात पाण्याचा वापर अत्यंत अनियंत्रित पद्धतीने होतो. घरगुती वापर, शेती आणि औद्योगिक क्षेत्रात पाण्याचा मोठा अपव्यय होतो.

४. नदी आणि भूजल प्रदूषण : भारताच्या बहुतांश नद्या आणि तलाव औद्योगिक कचरा, प्लास्टिक आणि रासायनिक पदार्थांमुळे दूषित झाल्या आहेत. परिणामी, पिण्यायोग्य पाण्याची कमतरता निर्माण होत आहे.

५. हवामान बदल आणि अनियमित



पर्जन्यमान : गेल्या काही वर्षांमध्ये हवामान बदलामुळे भारतात अतिवृष्टी, अनियमित पाऊस, सतत दुष्काळ आणि वाढते तापमान यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा थेट परिणाम जलस्रोतांवर होत आहे.

मच्छिंद्र ऐनापुरे
७०३८१२१०१२

**पारंपरिक जलसंधारण पद्धती आणि त्यांचे महत्त्व**

भारतामध्ये प्राचीन काळापासून पाणी साठवण्यासाठी विविध पद्धती अवलंबल्या जात होत्या. आजही त्या अत्यंत प्रभावी ठरू शकतात: तलाव आणि सरोवरे गावोगावी मोठमोठे तलाव आणि सरोवरे तयार करून पाण्याचा साठा केला जात असे. बावड्या आणि कुंड राजस्थान, गुजरात आणि मध्य भारतातील अनेक भागांमध्ये ही जलसंरचनात्मक प्रणाली प्रचलित होती. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी मोकळ्या जागांमध्ये साठवून भूजल पुनर्भरण केले जात असे. नदीजोड प्रकल्प मोठ्या नद्यांचे पाणी कमी पाण्याच्या भागांत वळवण्याचे प्रयत्न प्राचीन काळातही केले गेले होते.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून जलसंवर्धन**

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलसंकटावर मात करता येऊ शकते : वर्षाजल संकलन गच्चीवरील पाणी संकलित करून भूजल पुनर्भरण करणे. ठिबक आणि फव्वारा सिंचन शेतीमध्ये पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आधुनिक सिंचन तंत्रांचा अवलंब करणे. सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर शहरी भागांमध्ये सांडपाणी प्रक्रिया करून ते शेती किंवा अन्य औद्योगिक उपयोगांसाठी वापरणे. नदी पुनरुज्जीवन प्रकल्प नद्यांच्या जलसंवर्धनासाठी विस्तृत योजना राबवणे.

**सरकारी योजना आणि उपक्रम**

जलसंकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहे :

१) जल जीवन मिशन प्रत्येक घराला नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवणे. २) नमामि गंगे योजना गंगा नदीचे पुनरुज्जीवन आणि प्रदूषण नियंत्रण. ३) अटल भूजल योजना भूजल पातळी सुधारण्यासाठी सात राज्यांमध्ये ही योजना राबवली जात आहे. ४) अमृत सरोवर योजना गावोगावी जलस्रोत पुनरुज्जीवित करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**सामान्य नागरिकांची जबाबदारी**

सरकार आपल्या परीने प्रयत्न करत आहे, पण जलसंकटावर मात करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांचाही सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. प्रत्येकाने खालील उपाय अमलात आणले पाहिजेत : घरगुती वापरात पाण्याची बचत करणे. वर्षाजल संकलन यंत्रणा बसवणे. गरज नसताना नळ सुरू ठेवण्याची सवय टाळणे. शेतीमध्ये ठिबक आणि फव्वारा सिंचनाचा अवलंब करणे. प्रदूषण टाळण्यासाठी जलस्रोत स्वच्छ ठेवणे.

भारत आणि संपूर्ण जग सध्या मोठ्या जलसंकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून ती आपल्या भविष्यासाठी अनमोल ठेवा आहे. योग्य व्यवस्थापन, वैज्ञानिक उपाययोजना, सरकारी धोरणे आणि लोकसहभागाच्या मदतीनेच जलसंकटावर मात करता येईल. ''पाणी वाचवा, भविष्य वाचवा!'' हा विचार प्रत्येकाच्या मनात रुजला पाहिजे, कारण पाणी हे जीवन आहे आणि जीवनाला पर्याय नाही.

# राजकीय क्षेत्रात लबाडांचा सुळसुळाट...

सध्या राजकीय क्षेत्रात लबाड लोकांचा सुळसुळाट खूप वाढला आहे. निवडणूक जवळ आली की, या राजकीय लोकांचा लबाड बोलण्याचा फंडा सुरू होतो. हे राजकारणी लोक जनतेला नुसते विकासाचे गाजर दाखवतात. पण प्रत्यक्षात काहीच विकासकामे करत नाहीत. लोकांना लबाड आश्वासने देऊन त्यांची मते वळवण्याचा प्रयत्न करतात. आणि निवडून आल्यावर मात्र पाच वर्षे लोकांना साधा चेहरा सुद्धा दाखवत नाहीत. विकासाच्या नावाखाली फक्त आपलेच घर भरायचे बघतात. आणि गर्भश्रीमंत होतात. जनतेला मात्र वाऱ्यावर सोडून देतात. जनता मात्र त्यांच्यावर खूप मोठ्या अपेक्षा ठेवून असते. मात्र, हे राजकारणी लोक जनतेचा अपेक्षा भंग करतात. आणि आपल्याच रुबाबात राहतात. त्यांना सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, शेतमजुरांच्या व कष्टकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तोडगा काढायला वेळच राहत नाही. ते सारखे राजकारण करण्यात व्यस्त असतात. त्यांना समाजकारण करायला सुध्दा वेळ राहत नाही.

शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न व समस्या अजूनही कागदावरच आहेत. त्या समस्या व प्रश्न कधी सुटणार आहेत? कधी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळणार आहे? कधी सुशिक्षित बेरोजगारांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहेत. या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत. उगीच जनतेची दिशाभूल करून व त्यांना खोटेनाटे आश्वासन देऊन त्यांच्या मतांवर निवडून यायचे, आणि पाच वर्षे सत्ता उपभोगायची. हे आता कुठवर चालणार?

सरकारच्या अशा निष्क्रिय कारभारामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. शासन निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना कर्जमाफी करू, असे ठणकावून सांगतात. आणि मग निवडून आल्यावर मात्र शेतकऱ्यांचे प्रश्न दुर्लक्षित करतात. हे लबाड सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर बसले आहे. गावचा सरपंच असो, जिल्हा परिषद सदस्य असो, तालुक्याचा आमदार असो, किंवा जिल्ह्याचा खासदार असो, हे सगळे एकाच माळेचे मनी असतात. हे राजकारणी जनतेला लबाड बोलण्यात फार पटाईत असतात. म्हणून राजकीय क्षेत्रात आता

बुद्धभूषण कांबळे
७४९८७१५६६१

लबाड लोकांचा सुळसुळाट फार वाढला आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळत नाही. अजूनही शेतकऱ्यांचे कित्येक प्रश्न प्रलंबित आहेत. फक्त निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना थोडासा आर्थिक दिलासा देतात. हे आम्ही मान्य करतो. पण ही तुटपुंजी मदतदेखील त्यांच्या स्वार्थासाठीच असते. या थोड्याशा मदतीने शेतकरी दादांचे काहीच समाधान होणार नाही. जोपर्यंत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार नाही, त्यांना शेतपिकांची नुकसानभरपाई मिळणार नाही तोपर्यंत शेतकरी सुखी होणार नाहीत.हे कोणालाही मान्य करावेच लागेल. नाहीतर शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढतच जाणार आहे. दररोज कुठे ना कुठे तरी शेतकरी आत्महत्या होतच आहेत. याला कारणीभूत हे लबाड व ढोंगी सरकार आहे. सध्या राजकीय क्षेत्रात गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत हे फसवाफसवीचे राजकारण सुरूच आहे. कोणतेही सरकार येऊ द्या ते शेतकऱ्यांना फसवणारच हे आता नित्याचेच झाले आहे. म्हणजे हे राजकीय क्षेत्र आता लबाड लांडग्यांचा कळप झाले आहे. म्हणूनच सध्या भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहे. सगळ्यात जास्त भ्रष्टाचार हा राजकीय क्षेत्रात होतो. ही वस्तुस्थिती आहे. आणि ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या भारत देशात अनेक आदर्श राजकीय नेते व महापुरुष होऊन गेले. त्यांनी शेतकऱ्यांना, गरिबांना व दीनदुबळ्यांना प्रामाणिकपणे न्याय देण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी व लोकनेते विलासराव देशमुख या महापुरुषांनी सदैव बहुजनांच्या हितासाठी व भल्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. म्हणूनच त्यांना आजही जनतेने कायमचे हृदयात स्थान दिले आहे. छत्रपती शिवरायांनी आपल्या शिवशाहीत समस्त बहुजन जनतेला सुखी ठेवले. त्यांच्या काळात शेतकऱ्यांच्या मिरचीच्या देठालाही हात लावायचीसुद्धा कोणाची हिंमत नव्हती. एवढा प्रजाहितदक्ष राजा होता.या महापुरुषांच्या कार्याला मनःपूर्वक सलाम!

आणि जाता जाता मायबापा सरकारला विनंती आहे की, आपणही या महापुरुषांचा आदर्श घेऊन शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न करावा...

म्हणजे शेतकरी सुखी होतील... आणि त्यांच्या आत्महत्या टळतील...

# लघुउद्योग ते डी.लिट. : प्रवास एका उद्योजकाचा!

साधारण ३५ वर्षांपूर्वी घरच्या घरी लिक्विड सोप आणि क्लिनिंग पावडर बनवून ती हॉटेल्स आणि घरोघरी स्वतः जाऊन विकणे ते आज १३०० हून अधिक कर्मचाऱ्यांची कंपनी उभी करून अमेरिका, कॅनडा, ब्राझील, रशिया आणि ऑस्ट्रेलियासह २६ हून अधिक देशांत कंपनीची उत्पादने पोहचवणे, नऊ डिव्हिजन्समध्ये ८२ हून अधिक दर्जेदार उत्पादने बाजारात आणणे असा थक्क करणारा प्रवास साध्य केला आहे तो एका मराठी उद्योजकाने.

'बायको गेली माहेरी, काम करी पितांबरी' ही टॅगलाइन घेऊन तांब्या पितळेची भांडी लखलखीत करणारी पितांबरी शायनिंग पावडर घेऊन बाजारात उतरणारी पितांबरी आज घरोघरी पोहोचली आहे. या पितांबरीचा डोलारा उभा करणारे आणि तितक्याच ताकदीने तो पेलणारे पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांची उद्योगक्षेत्रातील भरीव कामगिरी आणि ते करत असलेल्या सामाजिक कार्याची दाखल घेत गेल्याच महिन्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात त्यांना सन्माननीय डी.लिट. (विद्यानिधी) पदवी प्रदान करण्यात आली. श्री. प्रभुदेसाई यांची जन्मभूमी आणि प्रथम कर्मभूमी असलेल्या ठाणे शहरात १७ एप्रिलला डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

समाजसेवेचा आणि देशभक्तीचा वारसा प्रभुदेसाई यांच्याकडे त्यांच्या वडिलांकडूनच आला आहे. लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत त्यांचे जाणे असल्याने समाजसेवेचे आणि देशसेवेचे बालकडू त्यांना लहानपणीच मिळाले आहे. आपल्या प्रत्येकावर देव, पितर, ऋषी आणि समाज अशी चार ऋणे असतात. त्यापैकी समाज ऋण फेडण्याच्या दृष्टीने ते विविध सामाजिक संस्था, राष्ट्र आणि धर्म यांच्या पुनरुत्थानासाठी झटणाऱ्या संघटना, उदयोन्मुख कलाकार, गरजू व्यक्ती, गतिमंद मुले यांना नियमितपणे दान देत असतात. मग ते दान पैशाच्या स्वरूपात असो वा पितांबरीच्या गृहोपयोगी उत्पादनांच्या स्वरूपात. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि लोकोपयोगी कार्यांना प्रायोजकत्व देऊनही ते सामाजिक बांधिलकी जपत असतात. त्यांच्या प्रत्येक



वाढदिवसाला ते ठराविक रकमेचा धनादेश विविध सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक संस्थांना, गोशाळांना आणि आश्रमांना अर्पणस्वरूपात देतात. कोरोनाकाळात स्वच्छता दूत, पोलीस कर्मचारी, रुग्णालये

जगन घाणेकर
९६६४५५९७८०

यांना पितांबरीचे सॅनिटायजर, मास्क, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी पितांबरीच्या हेल्थ केअर डिव्हिजनची आयुर्वेदिक औषधे कंपनीच्या वतीने विनामूल्य वितरित करण्यात आली. आषाढी आणि कार्तिकी वारीनिमित्त लाखो वारकरी पंढरीची वारी पायी करत असतात. त्यांच्या सेवेसाठी पितांबरीचा चमू वारीमार्गात दरवर्षी कार्यरत असतो. या चमूतील पितांबरीचे कर्मचारी पितांबरीचे क्युअर ऑन हे वेदनाशामक आयुर्वेदिक तेल वारीतील वारकऱ्यांच्या पायांना लावून त्यांच्या पायांची मालिश करून देतात. ज्यामुळे वारकऱ्यांना वारीसाठी पुनश्च नव्याने मार्गरत होण्यासाठी स्फूर्ती मिळते. पितांबरीत काम करणारा मग तो शिपाई असो वा स्वच्छता कर्मचारी त्याला कर्मचारी म्हणणे प्रभुदेसाई यांना आवडत नाही. पितांबरीचा प्रत्येक कर्मचारी पितांबरी उद्योगसमूहाला पुढे घेऊन जाण्यासाठी आपापलया परीने हातभार लावत असतो, या विचाराने ते कंपनीतील कर्मचाऱ्यांना सहकारी म्हणून संबोधतात आणि इतरांनाही तसेच संबोधण्यास सांगतात. पितांबरीतील सहकाऱ्यांच्या अडी-अडचणीत ते त्यांना आर्थिक साहाय्यही करतात, प्रत्येकाची आपुलकीने चौकशी करतात त्यामुळे पितांबरीचा प्रत्येक सहकारी त्यांच्याकडे मालकाच्या भावनेने नव्हे, तर अन्नदाता पित्याच्या भावनेने पाहतो. आज कंपनीने १३०० हून अधिक गरजवंतांना कंपनीत रोजगार दिला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक वर्षे एकाच ठिकाणी नोकरी करणारे कर्मचारी केवळ शासकीय सेवेतच दिसून येतात; मात्र अशाही काळात २० हुन अधिक वर्षे कार्यरत असलेली मोठी फळी केवळ पितांबरी या खासगी कंपनीतच पाहायला मिळते. कोरोनासारख्या महामारीत जेव्हा सर्वच उद्योगधंदे बंद होते. अशाही काळात त्यांनी कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवू दिले नाही. पितांबरी म्हणजे गुणवत्ता हे समीकरण ठरलेले आहे. प्रभुदेसाई यांनी कंपनीच्या प्रत्येक उत्पादनात गुणवत्ता जपताना त्यापासून ग्राहकांना कोणताच त्रास होणार नाही याची विशेष काळजी घेतलेली आहे. ही काळजी घेण्यासाठी आणि उत्पादनाची गुणवत्ता पडताळण्यासाठी प्रभुदेसाई यांनी कंपनीचे स्वतंत्र आर अँड डी युनिट उभारले असून, त्या ठिकाणी उत्पादनांची गुणवत्ता पडताळण्यासाठी तज्ज्ञांची नेमणूक केली आहे. प्रभुदेसाई यांची आधीपासूनच आयुर्वेदात अधिक रुची असल्याने त्यांनी आपल्या बहुतांश उत्पादनांच्या निर्मितीमध्ये आयुर्वेदाचा आधार घेतला आहे. मराठी माणसांनी नोकरीमध्ये अडकून न पडता लहान-मोठा व्यवसाय करावा आणि स्वतः च्या पायावर उभे राहावे यासाठी प्रभुदेसाई वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात. हजारो कर्मचाऱ्यांचे संसार आज त्यांच्यामुळे उभे आहेत.

# ड्रग्ज तस्करीचे वाढते संकट

देशात दहशतवादी सुरक्षा यंत्रणा आणि तटरक्षक दलांना मादक, अमली पदार्थ म्हणजेच कोकेन, मेथाफाटेमाइन यांसारख्या नशिली पदार्थांचे साठे सापडत आहेत. गुजरातमध्ये अलीकडेच १८०० कोटी रुपयांचे ड्रग्ज ताब्यात घेण्यात आले. त्याचप्रमाणे गोव्यात ४३.२ कोटी रुपयांचे कोकेन पकडण्यात आले. त्यापूर्वी पोरबंदर येथून ८०० किलो मेथाफाटेमाइनच्या साठ्याला सुरक्षा यंत्रणेने ताब्यात घेतले होते. देशाच्या पश्चिमेला लाभलेल्या विस्तीर्ण किनारपट्टीवर गुजरात आणि गोवा या राज्यांत विदेशी तस्करांकडून अमली पदार्थांची तस्करी केली जाते आणि त्याचे रस्ते, सागरी मार्गांनी देशभर वितरण केले जाते. देशातील वरील दोन राज्यांचे किनारे ड्रग्ज माफियांना, तस्करांना सुरक्षित वाटत असल्याने तेथील अवैध ड्रग्ज व्यवहारांत वाढ होत असल्याचे दिसून आले आहे. ड्रग्ज व्यवहारांत व्यस्त असणाऱ्या टोळ्यांना स्थानिक व्यापारी व किनारपट्टीतील स्थानिक लोकांचा हातभार लागल्याशिवाय असे


जनमनाचे प्रतिध्वनी

अवैध व्यवहार पूर्ण होऊ शकत नाहीत. किनारपट्टीजवळील गरीब लोकं आणि या व्यवहारांत माहिर झालेले छोटे छोटे वाहतूकदार रोजी रोटीच्या उत्पन्नासाठी या व्यवसायांत नाइलाजास्तव सहभागी होतात. या राज्यांच्या किनारपट्ट्यांवर अफगाणिस्तान, पाकिस्तान, मध्य आशियातील छोटे देश, बांगलादेशांतील नशिल्या पदार्थांचा व्यापार करणाऱ्यांचा समावेश आहे. या व्यवहारांत सहाय्य करणाऱ्या लोकांना पैशांची आमिषे दाखवून ड्रग्ज विक्रीच्या व्यवहारांत वाढ करण्याचे प्रयत्न केले जातात. आज देशातील बॉलिवूड इंडस्ट्री, प्रतिष्ठित समाजसेवी संस्था यांना देखील या ड्रग्जने टार्गेट करून त्यांच्यावर परिणामकारक ठसा उमटविला आहे. मादक पदार्थांची विक्री करणाऱ्यांच्या कृती आगामी काळात देशाला धोकादायक ठरू शकते. त्याच मादक पदार्थांच्या विक्रीतून एक प्रकारची दहशत निर्माण करण्याचे प्रकार केले जातात, जेणेकरून ड्रग्जचा व्यापार फैलावतो आणि तरुण पिढीला व्यसनाधीन करण्याच्या प्रयत्नात ती पिढीच उध्वस्त करण्याचे प्रकार सुरू झाले आहेत.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी**

## संत 'तू भगवंताचा आहेस' ही जाणीव देतात

आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यांसमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत 'तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस' असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे 'मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे' असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुन:पुन: मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे.



विचारधन

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### 'झापुक झुपूक'चं रोमँटिक गाणं 'पोराचा बाजार उठला रं' प्रेक्षकांच्या भेटीला

**मुंबई :** जिओ स्टुडिओज प्रस्तूत आणि केदार शिंदे दिग्दर्शित



'झापुक झुपूक' सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतच या सिनेमाचं शीर्षक गीत रिलीझ करण्यात आलं होतं ज्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आता पुन्हा एकदा सिनेप्रेमींना भुरळ घालायला 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं रोमॅन्टिक गाणं 'पोराचा बाजार उठला रं' प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. सूरज चव्हाण, जुई भागवत आणि इंद्रनील कामतवर चित्रीत या गाण्यात या तिघांचा रोमॅन्टिक अंदाज पहायला मिळतोय. गाण्यात प्रेमाचा त्रिकोण आपण पाहू शकतो. अभिनेत्री जुई वर सूरज आणि इंद्रनीलचा जीव जडलाय. जुईची दोघांसोबत अफलातून केमिस्ट्री पहायला मिळते जी खूप सुंदर दिसत आहे. पण विशेष म्हणजे जुई चा शिफॉन सारी मधला कातिल लूक आकर्षणाचा विषय ठरतोय. या गाण्याचे बोल आणि त्याची चाल प्रेक्षकांना खिळवून ठेवतेय. गाण्याचा हुकस्टेप सुद्धा सर्वांना थिरकवणारा आहे. कलाकार आणि संगीत सोबतच या गाण्याचं चित्रीकरण सुद्धा तितकच सुंदर आहे. ह्या गाण्याला करण सावंत ह्यांनी गायलं आहे. तर संगीत आणि बोल कुणाल करण ह्यांचं आहे. 'पोराचा बाजार उठला रं' हे गाणं रसिकांच्या मनाला भिडणारं आहे. गाणं पाहून सिनेरसिकांची 'झापुक झुपूक' सिनेमाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटात एक से बढकर एक इतर उत्कृष्ट कलाकार आहेत जसे हेमंत फरांदे, पायल जाधव, दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी जे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. झापुक झुपूक सिनेमा २५ एप्रिल पासून प्रदर्शित होणार आहे.

### 'पी.एस.आय. अर्जुन'चा टिझर लाँच

**मुंबई :** सध्या एका पोस्टरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा




सुरू असून, ही चर्चा दुसरी तिसरी कोणाची नसून महाराष्ट्राचा सुपरस्टार अंकुश चौधरीची आहे. 'पी. एस. अर्जुन'च्या भूमिकेत अंकुश राडा घालायला येतोय. काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक पोस्टर शेअर करत अर्जुन माझ्या नावात... वर्दी माझी जोमात... गुन्हेगार कोमात...! अशी जबरदस्त कॅप्शन दिली आहे. अंकुशचा पोलिसांच्या वर्दीतील हा डॅशिंग लूक कमाल दिसत असून 'महाराष्ट्र शाहीर' चित्रपटानंतर दोन वर्षांनी अंकुश प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज झाला आहे. नुकताच या चित्रपटाचा टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून ९ मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'पी. एस.आय.अर्जुन' या चित्रपटात अंकुश पहिल्यांदाच रुबाबरदार पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. अंकुशला अशा नव्या रूपात बघून त्याचे चाहतेही भलतेच सुखावले आहेत. इतकेच नाही बॉलिवूडमधील आपला मराठमोळा अभिनेता रितेश देशमुख यालाही अंकुशच्या या नव्या लूकने भुरळ घातली आहे. अंकुशची आकर्षक पर्सनॅलिटी आणि फॅशन सेन्समुळे तो तरुणाईमध्ये विशेष लोकप्रिय आहेच. स्टाईल आयकॉन असलेल्या अंकुशला 'ट्रेंड सेटर' म्हणायलाही काहीच हरकत नाही. बऱ्याच चित्रपटातील त्याचे डायलॉग्स प्रचंड गाजले आहेत. आताही 'पी.एस.आय. अर्जुन'मधील असाच एक डायलॉग सध्या ट्रेंडिंगमध्ये आहे, तो म्हणजे थांब म्हटलं की थांबायचं... या दमदार डायलॉगने सध्या अनेकांना वेड लावलं आहे. तरुणाई यावर रील्स बनवत आहेत. त्यामुळे अंकुश एका अनोख्या अंदाजात यात झळकणार असल्याचे दिसतेय! व्हिस्ट्रोमॅक्स सिनेमा, ड्रिमविव्हर एंटरटेनमेंट निर्मित 'पी.एस.आय.अर्जुन'चे भूषण पटेल दिग्दर्शक आहेत तर विक्रम शंकर आणि ध्रुव दास निर्माते आहेत. येत्या ९ मे रोजी 'पी. एस. आय. अर्जुन' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

### ११० कॅरेट हिरेजडित सर्वांत महागडे घड्याळ

**नवी दिल्ली :** ग्राफ डायमंड्स वॉचमध्ये गुलाबी, निळा, हिरवा,



केशरी आणि पिवळा असे जगातील दुर्मिळ आणि सर्वोत्तम दर्जाचे ११० कॅरेटचे हिरे आहेत. या घड्याळाची किंमत तुम्हाला नक्कीच आश्चर्यचकित करेल. याची किंमत ५५ मिलियन डॉलर म्हणजेच ४६६ कोटी रुपये असून हे आतापर्यंतचे सर्वात महागडे घड्याळ आहे. द हॅल्युसिनेशन ही एक उत्कृष्ट कलाकृती आहे जी कला, दागिने आणि वेशभूषा यांचे परिपूर्ण मिश्रण आहे जे वैभवाची पुनर्व्याख्या करते. हे दुर्मिळ, फॅन्सी रंगाचे हिरे त्यांच्या विलक्षण दुर्मिळतेमुळे आणि मूल्यामुळे मौल्यवान आहेत. तसे, बहुतेक हिऱ्यांच्या घड्याळांमध्ये गोल किंवा बॅग्युएट कापलेले हिरे असतात.

## ॲमेझॉन इंडियाने टॅब्लेटपर्यंत स्मार्टचॉइसचा केला विस्तार

**नाशिक :** ॲमेझॉन इंडियाने आज तिच्या स्मार्टचॉइस प्रोग्रामचा टॅब्लेटमध्ये विस्तार करण्याची घोषणा केली, ज्यामुळे लॅपटॉप श्रेणीमध्ये मोठे यश प्राप्त झाले आहे. विशिष्ट ग्राहकांच्या गरजा आणि वापराच्या पसंतींवर आधारित तज्ञांनी तयार केलेल्या शिफारशींद्वारे हा प्रोग्राम डिव्हाइसची निवड सुलभ करतो. ऍमेझॉन इंडियासाठी टॅबलेट ही जास्त वाढ होणारी श्रेणी आहे, ज्यात २०२४ मध्ये मागील वर्षीच्या तुलनेत २६% वाढ झाली आहे. ऍमेझॉन इंडियाच्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्सच्या संचालिका झेबा खान म्हणाल्या, ग्राहकांच्या गरजांच्या पलीकडे जाऊन तयार केलेल्या स्मार्टचॉईस प्रोग्राममुळे खरेदीच्या अनुभवात लक्षणीय वाढ झाली आहे, त्याने त्याच्या पारदर्शकता आणि अचूकता यांसाठी अपवादात्मक अभिप्राय प्राप्त केला आहे. स्मार्टचॉईस प्रोग्राम ग्राहकांच्या वेगवेगळ्या गरजांवर आधारित डिव्हाईसचे वर्गीकरण करतो - दैनंदिन वापर आणि शिक्षणापासून ते मनोरंजन, व्यावसायिक वापर आणि गेमिंगपर्यंत. प्रत्येक श्रेणीसाठी, एक स्वतंत्र तांत्रिक एजन्सीने कार्यक्षमतेचा नवा टप्पा तयार केला आहे जो उत्पादनांसोबत जुळतो. खास तयार केलेल्या निवडीमध्ये सॅमसंग, लेनोवो, असुस, ऑनर, एसर आणि क्ष यांसारख्या आघाडीच्या ब्रँडमधील सर्वोत्तम कार्यक्षमता असलेले टॅबलेट आहेत. लॅपटॉपसाठी सुरुवात झाल्यापासून, स्मार्टचॉइस प्रोग्रामची विक्री तिप्पट झाली आहे आणि २०२४ मध्ये प्रीमियम लॅपटॉप खरेदीमध्ये ३०% वाढ झाली आहे. ग्राहक कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स होम पेजद्वारे किंवा थेट खालील लिंक्सद्वारे सहजपणे उपलब्ध असलेले नवीन स्मार्टचॉइस टॅब्लेट आणि लॅपटॉप स्टोअर पाहू शकतात.

# राष्ट्रीय जलमार्गांमुळे सरकारी तिजोरीत भर

## १४५.५ दशलक्ष टन मालवाहतुकीचा टप्पा ओलांडला

**नवी दिल्ली : राष्ट्रीय जलमार्ग मालवाहतुकीने केंद्र सरकारला मालामाल केले. केंद्र सरकारच्या तिजोरीत मोठी रक्कम आली. बंदरगाह, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाने जलमार्ग मालवाहतुकीतून कमाईचा नवीन टप्पा ओलांडला. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये IWAI ने रिकॉर्डब्रेक १४५.५ दशलक्ष टन मालवाहतूकीचा टप्पा ओलांडला. अंतर्देशीय जलवाहतूक क्षेत्रात ही आतापर्यंतची सर्वात महत्त्वाची कामगिरी ठरली आहे.**

- जलमार्गांची क्षमता वाढविणार
- वाहतूक क्षमता वाढेल
- सामान्य मालवाहतूक आणि विशेष मालवाहतुकीसाठी सुविधा निर्माण होतील
- जेट्टी, टर्मिनल्स, आणि मल्टीमोडल लॉजिस्टिक हब्स तयार होतील
- कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक जलवाहतुकीला चालना मिळेल



बंदरगाह, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०१४ ते २०२५ या कालावधीत राष्ट्रीय जलमार्गांवरील मालवाहतूक १८.१० दशलक्ष टनांवरून वाढून १४५.५ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचली. या दरम्यान २०.८६% ची चक्रवाढ वार्षिक वाढ दर नोंदवली गेली आहे. तर या काळात जलमार्गांची एकूण संख्या २४ वरून वाढून २९ वर पोहचली. तर चालू आर्थिक वर्षातही मालवाहतुकीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

वित्तीय वर्ष २०२५ मध्ये मालवाहतुकीत २०२४ च्या वार्षिक आधाराच्या तुलनेत ९.३४% वाढ झाली. यामध्ये कोळसा, लोहखनिज, लोहखनिज चुर्ण, वाळूचा, फ्लाय ॲश वाटा अधिक आहे. या पाच वस्तूंचा एकत्रितपणे राष्ट्रीय जलमार्गांवरील एकूण मालवाहतुकीत ६८% पेक्षा अधिक वाटा होता. तर राष्ट्रीय जलमार्गांवरील मालवाहतुकीत झालेली वाढ सध्याच्या घडीला अत्यंत लक्षणीय मानली जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये नीतिगत उपाय आणि पायाभूत सुविधांवर विशेष भर दिल्याने ही वाढ शक्य झाली आहे.

जलवाहक कार्गो प्रोत्साहन योजना या प्रवासाचा कायापालट करणारी ठरली. ही योजना गेल्या डिसेंबरमध्ये सुरू करण्यात आली होती. योजनेत जलमार्ग वाहतुकीत एकूण ऑपरेशनल खर्चाच्या ३५% पर्यंत प्रोत्साहन देण्यात येते. त्यामुळे कार्गो मालक व वाहतूकदारांना अंतर्देशीय जलवाहतुकीकडे वळाले आणि रस्ते आणि रेल्वे मार्गावरील ताण कमी झाला. मोठा खर्च वाचला.

**भारत-बांगलादेशची रणनीती आली कामी**

जलमार्ग योजनेला चालना देण्यासाठी भारत-बांगलादेश प्रोटोकॉल अंतर्गत राष्ट्रीय जलमार्गांवर नियोजित कार्गो सेवा सुरू करण्यात आली. त्यातंर्गत राष्ट्रीय जलमार्ग १, राष्ट्रीय जलमार्ग २, आणि राष्ट्रीय जलमार्ग १६ वर नियोजित मालवाहतूक सेवा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे ८०० दशलक्ष टन-किलोमीटर कार्गो जलमार्गाकडे वळण्याची अपेक्षा आहे. हा कार्गो मार्ग सध्याच्या राष्ट्रीय जलमार्गांवर असलेल्या ४,७०० दशलक्ष टन-किलोमीटर मालवाहतुकीच्या सुमारे १७% इतका आहे.

राष्ट्रीय जलमार्ग (जेट्टी/टर्मिनल्सचे बांधकाम) विनिमय नियम, २०२५ अंतर्गत हे नवीन नियम देशातील अंतर्देशीय टर्मिनल्सच्या विकासात खासगी क्षेत्राच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देतात. यामुळे भारताच्या विस्तृत जलमार्ग नेटवर्कचा अधिक परिणामकारक वापर शक्य होतो. खासगी, सार्वजनिक आणि संयुक्त उद्यम संस्थांना आता IWAI कडून नाहरकत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी डिजिटल पोर्टल उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे, देशभरात जेट्टी किंवा टर्मिनल्स विकसित करणे अधिक सुलभ झाले आहे, ज्यामुळे स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवर लॉजिस्टिक्स अधिक गतिमान होण्याची शक्यता आहे.

### या राष्ट्रीय जलमार्गांची क्षमता वाढवणार

आता प्राधिकरण देशभरातील काही राष्ट्रीय जलमार्गांची क्षमता वाढवणार आहे. त्यातंर्गत राष्ट्रीय जलमार्ग-१, राष्ट्रीय जलमार्ग-२, राष्ट्रीय जलमार्ग-३ आणि राष्ट्रीय जलमार्ग-१६ यांच्यासह इतर जलमार्गांची क्षमता वाढवण्यासाठी काम करत आहे. तर भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण सध्या देशभरातील जलवाहतुकीच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यावर भर देत आहे. यामध्ये विशेषतः राष्ट्रीय जलमार्ग-१, राष्ट्रीय जलमार्ग-२, राष्ट्रीय जलमार्ग-३ आणि राष्ट्रीय जलमार्ग-१६ यांचं आधुनिकीकरण आणि क्षमता वाढ यावर काम सुरू आहे.

## घाऊक महागाईत दोन टक्क्यांची घसरण

**नवी दिल्ली :** सर्वसामान्यांना महागाईच्या मोर्चावर मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, देशातील घाऊक महागाईत मोठी घसरण झाली. नुकतीच सरकारी आकडेवारी समोर आली. त्यानुसार, भारतात घाऊक महागाई मार्च महिन्यात वार्षिक आधारावर महागाई २.०५ टक्क्यांनी घसरली. तर तज्ज्ञांनी महागाई २.५ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला होता.



सरकारी आकड्यांनुसार, अन्नपदार्थांचे उत्पादन, इतर उत्पादनं, खाद्य वस्तू, वीज आणि वस्त्र निर्मिती यांच्या किंमतीत झालेल्या एका मर्यादित वाढीमुळे घाऊक महागाई घसरल्याचे सांगण्यात येते. मार्च महिन्यात घाऊक अन्नधान्य महागाई फेब्रुवारीतील ५.९४ टक्क्यांहून घसरून ४.६६ टक्के इतके झाले. मार्च महिन्यात प्राथमिक वस्तूंची महागाई फेब्रुवारीतील २.८१ टक्क्यांहून कमी होऊन ०.७६ टक्के झाली.

सूर्य देव सध्या देशात आग ओकत आहे. उष्णतेची लाट होरपळून काढत आहे. भारतीय हवामान खात्याने सुद्धा वाढलेल्या तापमानाविषयी अलर्ट दिला आहे. त्यामुळे महागाईच्या मोर्चावर चिंता वाढली आहे. बोफा ग्लोबल रिसर्चमधील, भारत आणि आसियान आर्थिक संशोधन प्रमुख राहुल बाजोरिया यांनी याविषयीचा अलर्ट दिला आहे. त्यानुसार, जसा उन्हाळा वाढेल, पालेभाज्या आणि फळांच्या किंमतीत वाढ होईल. यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात भारतात किरकोळ महागाई ही सात महिन्याच्या निच्चांकावर ३.६१% आली होती. महागाईचा दर जानेवारी महिन्यात ४.३१ टक्के इतका होता. मंगळवारी सरकारने किरकोळ महागाईची आकडेवारी सुद्धा जाहीर केली.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने या महिन्याच्या सुरुवातीला अन्नधान्याच्या किंमती कमी झाल्याने महागाईचा आलेख उतरला. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये महागाईचा आलेख अजून खाली उतरण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीयांना मोठा दिलासा मिळेल. त्यांच्या खिशात पैसा खुळखुळेल. त्यांची मोठी बचत होईल.

## एचडीएफसी बँकेच्या २९८ सीमावर्ती गावांमध्ये शाखा

**नाशिक :** एचडीएफसी बँक या भारतातील सर्वांत मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आपल्या सीएसआर शाखा 'परिवर्तन' अंतर्गत ग्रामीण विकास उपक्रमांतर्गत देशभरातील २९८ सीमावर्ती गावांना सामावून घेतले आहे. हे गावांचे समूह आसाम, अरुणाचल प्रदेश, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, राजस्थान, सिक्कीम, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांच्या सीमावर्ती भागात वसलेली आहेत. येत्या काही वर्षांत अशा आणखी १५० सीमावर्ती गावांपर्यंत आपली पोहोच वाढविण्याची बँकेची योजना आहे. हे उपक्रम सीमा क्षेत्र विकास कार्यक्रम आणि व्हायब्रंट व्हिलेजिस प्रोग्राममध्ये नमूद केलेल्या राष्ट्रीय विकास ध्येयांशी सुसंगत आहेत.हिमालयाच्या उत्तर आणि ईशान्य दिशेकडील आणि देशाच्या पश्चिमेस वाळवंटी प्रांतांच्या सीमेवर वसलेल्या गावांना



बऱ्याचदा खडतर भूभाग, आवश्यक सेवांपर्यंत मर्यादित पोहोच आणि त्यांच्या दुर्गम जागांमुळे आर्थिक असुरक्षितता यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. एचडीएफसी बँकेचा परिवर्तन उपक्रम विविध सीमावर्ती प्रदेशात राहणाऱ्या ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याबाबत वचनबद्ध आहे, जसे की- अरुणाचल प्रदेशातील लोअर दिबांग व्हॅली आणि शी योमी; आसाममधील बक्सा आणि उदलगुडी; बिहारमधील किशनगंज, पश्चिम चंपारण आणि मधुबनी; गुजरातमधील बनासकांठा, कच्छ आणि पाटण; लडाख; मणिपूरमधील चंदेल; मेघालयातील ईस्ट जयंतिया हिल्स; पंजाबातील फाझिलका आणि पठाणकोट; राजस्थानातील बाडमेर; सिक्कीममधील ग्यालशिंग वेस्ट आणि पेक्योंग; उत्तर प्रदेशातील पिलिभीत; आणि उत्तराखंडमधील चमोली. एचडीएफसी बँकेचे डीएमडी कैझाद भरूचा म्हणाले, टेक्नॉलॉजी-सक्षम शिक्षण, सुधारित कृषी उत्पादकता, अक्षय ऊर्जा आणि आजीविकेच्या संधींपर्यंत पोहोच प्रदान करून आम्ही भारताच्या सीमावर्ती गावांमध्ये अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्याबाबत वचनबद्ध आहोत.

## सहारा समूहावर ईडीची मोठी कारवाई

### लोणावळ्यातील ॲम्बी व्हॅलीची ७०७ एकर जागा जप्त

**नवी दिल्ली :** सहारा इंडिया आणि त्यांच्या समूहाच्या संस्थांविरुद्ध कोलकाता येथील ईडीनं मोठी कारवाई केली आहे. या कारवाईअंतर्गत सहारा समूहाची लोणावळ्याली ॲम्बी व्हॅलीची ७०७ एकर जागा जप्त करण्यात आली. सदर जमिनीची अंदाजे बाजारभाव किंमत सुमारे १४६० कोटी रुपये आहे. मनी लाँड्रिंग प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

कारवाईनुसार ही जमीन बेनामी नावांनी खरेदी केल्याचं तपासात उघड झालं असून, सहारा ग्रुपच्या विविध कंपन्यांकडून घेतलेल्या पैशांनी ही हजारो कोटींची जमीन खरेदी करण्यात आली होती. याची खरी मालकी लपवण्यासाठी बनावट नावांनी नोंदणी करण्यात आली होती, अशी माहिती ईडीच्या एका अधिकाऱ्याने दिली.

सहारा समुहावर कारवाई करताना ईडीनं PMLA च्या कलम १७ अन्वये शोधमोहिम राबवत यादरम्यान २.९८ कोटी रुपयांची बेहिशोबी रोकडसुद्धा जप्त केली. ओडिशा, बिहार आणि राजस्थानमध्ये हुमारा इंडिया क्रेडिट को ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड आणि इतर कंपन्यांच्या फसवणुकीविरोधात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरनंतर हे प्रकरण उघडकीस आलं. आतापर्यंत सहारा कंपनीशी संलग्न इतर कंपन्या आणि व्यक्तिंविरोधात देशभरात ५०० हून जास्त एफआयआर दाखल करण्यात आले असून, यामध्ये ३०० हून अधिक प्रकरणं PMLA मध्ये नमूद गंभीर अपराधांअंतर्गत येतात. देशभरातून ईडीकडे हजारो तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत जिथं गुंतवणुकीच्या नावे चांगल्या परताव्याचं आमिष दाखवत अनेकांचीच फसवणूक करण्यात आल्याची बाब इथं उघड झाली. दरम्यान ईडीच्या तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार सहारा अनेक को-ऑपरेटिव सोसाइटीज म्हणजेच सहकारी समित्या आणि रिअल इस्टेट फर्मच्या माध्यमातून पोंजी-स्टाइल स्कीम घेऊन गुंतवणुकदारांपर्यंत पोहोचलं होतं. या समुहानं घसघशीत परताव्याचं आमिष दाखवत गुंतवणूकदार आणि एजंटचाही विश्वासघात केला आणि नॉन ट्रांसपेरेंट,अनरेगुलेटेड पद्धतीनं या रकमेचा दुरुपयोग केला. या समूहाच्या आर्थिक नोंदींमध्येसुद्धा मोठी अफरातफर आढळली असून, तिथं गुंतवणुकदारांचे पैसे परत दिले जात असल्याचं भासवण्यात आलं. मात्र इथं पैसे अडकवूनच ठेवत कंपनीनं देणंही वाढवलं.

## टोमॅटोच्या दरात घसरण, शेतकरी झाले आक्रमक

**बीड :** सध्या राज्यातील टोमॅटो उत्पादक शेतकरी चिंतत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कारण दिसवेंदिवस टोमॅटोच्या दरात घसरण होत होत आहे. दरात घसरण झाल्यामुळं शेतकरी आक्रमक होत आहे. बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर टोमॅटोचा लाल चिखल करुन सामाजिक कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांनी लक्षवेधी आंदोलन केले आहे. लाखो रुपये खर्च करून पिकवलेल्या टोमॅटोला सध्या पाच ते दहा रुपये प्रति किलो दर मिळत असल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली.

टोमॅटोच्या दरात मोठी घसरण झाली आहे. किलोला पाच ते सहा रुपयांचा दर मिळतच असल्यामुळं शेतकरी हवालदिल झाले आहेत. याच प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर २०० किलो टोमॅटोचा लाल चिखल करून लक्ष वेधण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

राज्यातील अनेक भागात भाजीपाल्याचे दर कोसळले आहेत. उन्हाळा आला असताना विविध भाज्यांचे दर दोन रुपयांपर्यंत घसरले आहेत. बटाटे, कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, मिरचीला मोठा भाव नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यांचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

## इंजिनिअरची नोकरी सोडून शेतीतून वर्षाला १८ लाखांची कमाई

**भोपाळ :** अलीकडच्या काळात तरुण आपल्या शेतीत विविध प्रयोग करताना दिसत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं भरघोस उत्पादन घेत आहेत. कमी खर्चात अधिक उत्पादन घेत आहेत. तर काही तरुण नोकरी सोडून यशस्वी शेती करताना दिसत आहेत. आज आपण अशाच एका युवकाची यशोगाथा पाहणार आहोत. ज्याने इंजिनिअरची मोठ्या पगाराची नोकरी सोडून भाजीपाला शेतीतून लाखो रुपयांचा नफा कमावला आहे.

मध्य प्रदेशातील विनीत पटेल हा इंजिनिअरची नोकरी सोडून शेतकरी बनला आहे. बालाघाट जिल्ह्यातील परसवाडा तालुक्यातील अरंडीया गावचा रहिवासी असलेला विनीत पटेल इंदूरमधील अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.टेक पूर्ण केल्यानंतर पाच वर्षांपूर्वी एका बहुराष्ट्रीय कंपनीत उच्च पॅकेजवर रुजू झाला होता. कोरोनाच्या काळात विनीतला त्याच्या गावी परतावे लागले. त्यानंतर नोकरी न करता शेती करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. त्यानंतर त्याने शेती करण्याचा निर्णय घेतला.

विनीत पटेलने दिलेल्या माहितीनुसार, नोकरीच्या काळात त्याने रायपूरमध्ये भाजीपाल्याची लागवड पाहिली होती. त्यांनंतर काही काही शेतकऱ्यांशी चर्चाही केली. इथून पुढे नोकरी सोडून भाजीपाल्याची शेती करु, असा निर्धार त्यांनी केला. त्याचे कुटुंबीय



आधीच शेती करत होते. विनीतने शेती सुरु केल्यानंतर कुटुंबियांनी देखील मोठ्या प्रमाणावर काम सुरू केले. विनीतने थोड्याफार प्रमाणात कुटुंबातील सदस्यांकडून शेतीची काही कौशल्ये आत्मसात केली. पाच वर्षांपूर्वी नोकरी करत असताना वर्षाला ८ लाख रुपये कमावत होते पण नोकरी सोडल्यानंतर भाजीपाला शेती करून वर्षाला १८ लाख रुपये कमावत आहेत. त्यांनी २५ जणांना रोजगारही दिला आहे.

### विविध प्रकारच्या भाज्यांचे उत्पादन

शेरपार गावात फार्महाऊस बांधल्याचे विनीतने सांगितले. येथे सर्वप्रथम दोन एकरात भाजीपाल्याची लागवड केली. या भाज्या बाजारात विकून त्यांनी चांगला नफा कमावला. यानंतर त्यांनी ६ एकरात भाजीपाला लागवड करण्यास सुरुवात केली. आता तो वांगी, कोबी, भोपळा, करवंद, मिरची, काकडी, कारले आदी भाज्यांचे उत्पादन घेत आहे. भाजीपाल्याच्या शेतीतून एकरी सुमारे तीन लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळत असल्याचे विनीत सांगतात. अशा प्रकारे त्यांना ६ एकरातून वर्षाला १८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते.

कृषी विभाग आणि कृषी शास्त्रज्ञांकडून शेतीसंदर्भातील मार्गदर्शन मिळते. उन्हाळा आणि हिवाळ्याच्या हंगामात विविध प्रकारच्या भाज्यांचे उत्तम दर्जाचे बियाणे निवडून तो फलन तंत्राचा वापर करून भाजीपाला पिकवतो. मातीवर प्लास्टिकचा रॅप वापरला जातो. ज्यामुळे तणांचा त्रास टाळता येतो. झाडे जास्त काळ ओलसर राहतात आणि कीटकांचा प्रादुर्भाव होत नाही. ठिबक पद्धतीने भाजीपाला पिकाला खते आणि सिंचन केले जाते. सुमारे २० लाख रुपये खर्चून त्यांनी ठिबक यंत्रणा बसवल्याची माहिती दिली.

गांवकरी आरोग्य
गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५

# जलौकावचरण

**पंचकर्म उपचारात रक्तमोक्षण हे एक मुख्य कर्म वर्णन केले आहे. रक्तमोक्षण चार प्रकारे केले जाते. अलाबुकर्म, शृंगकर्म, जलौकावचरण, सिराव्यध. त्याबरोबर रक्तमोक्षाचे अजून दोन प्रकार केले जातात. शस्त्राच्या सहाय्याने केले जाणारे व शस्त्राच्या मदतीशिवाय केले जाणारे रक्तमोक्षण.**



आयुर्वेद सर्वांसाठी..



डॉ. किरण कातकाडे
एमडी आयुर्वेद (मुंबई)
८६६८९९७४९२

शस्त्राविना केल्या जाणाऱ्या रक्तमोक्षणामध्ये जलौकावचरणाचा समावेश होतो.

अलाबु, शृंग, जलौका व सिराव्यध या चारही प्रकारच्या रक्तमोक्षणाचा उपयोग दोषांची अवस्था, रक्ताची अवस्था व रुग्णाची अवस्था यांचा विचार करूनच करतात.

जलौकावचरण हा सहजसाध्य होणारा, करण्यास सोपा, फारसे उपद्रव नसणारा, वेदना न होणारा उपक्रम आहे.

जलौकांना व्यावहारिक नाव आहे जळवा. जळवा सामान्यत: चिखलाच्या भागात सापडतात. या जलात उत्पन्न होतात, पाण्यातच राहतात. जल हेच त्यांचे उत्पत्ती, पोषण, निवास व प्राप्तिस्थान आहे, म्हणूनच त्यांना जलौका म्हणतात. जलायुका व जलौकसा असेही पर्यायवाची शब्द यास वापरले जातात.

जलौका याप्रमाणे पाण्यात राहणाऱ्या शीत, मधुर असल्यानेच पित्तदूषित रक्ताच्या निर्हरणासाठी यांचा उपयोग केला जातो. वेदनारहित तथा उपद्रवरहित उपक्रम असल्यानेच सुकुमारांसाठी ही याचाच प्रयोग केला जातो.

जलौका दोन प्रकारच्या असतात. सविष आणि निर्विष. निर्विष जलौकांचा प्रयोग रक्तमोक्षणासाठी केला जातो.

जलौकावचरण ज्या शरीराच्या ज्या भागी करायचे असते तो भाग आधी स्वच्छ करणे आवश्यक आहे. साध्या पाण्याने तो भाग स्वच्छ केला जातो.

पंचकर्मातील इतर उपक्रमांप्रमाणेच रक्तमोक्षणमध्ये स्नेहन, स्वेदन केले जाते, पण जलौकावचरणापूर्वी स्नेहन, स्वेदन केले तर त्या स्नेहनामुळे त्या ठिकाणी जलौका पकड घेत नाहीत व म्हणूनच हे पूर्वकर्म केले जात नाही.

जलौका प्रथमतः अशुद्ध रक्त घेत असतात. हंस जसा पाणी आणि दूध एकत्रित असतानाही केवळ क्षीरपान करू शकतो, त्याचप्रमाणे जलौका प्रथमतः केवळ दुष्ट रक्तच शोषून घेऊ शकतात. जलौका पूर्ण भरल्यानंतर आपोआप सुटतात.

जलौकावचरण केलेल्या जागी व्रण उत्पन्न होतो. जलौका रक्ताचे आचूषण करीत असताना हिरुडिन नावाचे एक द्रव्य त्यांच्या मुखातून स्राव होतो. त्यामुळे जखमेच्या ठिकाणचे रक्त लवकर गोठत नाही. रक्त गोठण्याची क्रिया व्हावी व पर्यायाने रक्तस्राव थांबावा यासाठी जलौका काढल्यानंतर लगेच व्रणप्रदेश वारंवार स्वच्छ कापसाने साफ केले जाते. असे केल्याने व्रणप्रदेशी असणाऱ्या हिरुडिनचे प्रमाण कमी होते व नंतर फारसा रक्तस्राव होत नाही.

जलौकांनी घेतलेले सर्व रक्त पुन्हा बाहेर काढून टाकावे लागते. जर हे रक्त काढून टाकले गेले नाही तर यामुळे जलौका मरतात.

विशिष्ट भागाचे रक्तमोक्षण करण्यासाठी जलौकावचरण अधिक फायदेशीर ठरते.



## आरोग्यासाठी फायदेशीर

सकाळी लवकर उठणे आरोग्यासाठी फायदेशीर झोपण्याची आणि उठण्याची नियमित वेळ : रोज रात्री लवकर झोपणे आणि सकाळी लवकर उठणे, तुमच्या शरीराची नैसर्गिक घड्याळ संतुलित ठेवण्यास मदत करते.

**हलका आहार :**

रात्रीच्या जेवणात जड आणि तेलकट पदार्थ टाळा. हलका आणि पचनास सोपा आहार घ्या.

**झोप :** रात्री शांत आणि पुरेशी (७-८ तास) झोप घेणे महत्त्वाचे आहे. यासाठी झोपण्यापूर्वी मोबाइल किंवा टीव्ही पाहणे टाळा.

**मन शांत ठेवा:** झोपण्यापूर्वी ध्यान किंवा श्वास घेण्याचे व्यायाम करा. यामुळे मन शांत राहते आणि झोप चांगली लागते.

**गरम पाणी प्या :** सकाळी उठल्यावर लगेच एक ग्लास कोमट पाणी प्या. यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते.



**हलका व्यायाम :** सकाळी उठल्यावर थोडा वेळ योगा किंवा हलका व्यायाम करा. यामुळे शरीर उत्साही राहते.


**सूर्यप्रकाश :**

सकाळी उठल्यावर थोडा वेळ सूर्यप्रकाशात बसा. यामुळे तुमच्या शरीराला व्हिटॅमिन डी मिळते आणि तुमची नैसर्गिक घड्याळ सुधारते.

# वारंवार तोंड येणे

## कारणे, लक्षणे आणि उपचार

**तोंड येतं तेव्हा जीभ, गालाचा आतील भाग, टाळू, हिरड्या, जिभेच्या कडा, ओठाची आतली बाजू पूर्णत: लाल होते. काही वेळेला पांढरट, पिवळसर गोल जखमा तयार होतात. इतकंच नाही तर कधी कधी घशाच्या आत किंवा जिभेवर पांढरट थर जमा होतो.**



**तोंड येण्याची कारणे**

- कुपोषण, आहारदोष किंवा चुकीची आहारपद्धती आणि जीवनशैली
- जीवनसत्त्व नायसीन, रायबोफ्लॅवीन. फोलेट ॲसिड, जीवनसत्त्व सायनोक्लोमाइनच्या कमतरता दात, जीभ, हिरड्या आणि तोंडाची पुरेशी स्वच्छता नसणे.
- दीर्घकाळ ॲंटिबायोटिक औषधाचे सेवन करणे, कॅन्सरच्या औषधाचा दुष्परिणाम होणे
- तंबाखू, दारू, गुटखा याचं सेवन करणे
- मानसिक ताणतणाव अपुरी झोप अति मसालेदार, तिखट अन्नपदार्थाचं सेवन करणे, कमी प्रतिकारशक्ती जीवनसत्त्वांची कमतरता वारंवार टुथपेस्ट बदलणे
- पचनसंस्थेवर ताण पडून शौचाच्या तक्रारीही निर्माण होतात. त्याचबरोबर भूक मंदावणे, प्रतिकारशक्ती कमी होणे, इतर आजारांवर सामोरे जावे लागतं. यासारख्या तक्रारी वारंवार तोंड येण्याचे दिसून येतं. वारंवार तोंड आल्यामुळे अपचन, जुलाब, मोठ्या आतड्याचे विकार, मानसिक ताणतणाव अशा प्रकारांना सामोरं जावं लागतं.

**तोंड येऊ नये म्हणून काय कराल?**

**तोंडाची आंतरबाह्य स्वच्छता**

पान, तंबाखू, गुटखा यांसारख्या घातक गोष्टींचं सेवन पूर्णपणे बंद करावं. आहारात जीवनसत्त्व आणि चोथायुक्त पदार्थांचा समावेश करावा. भरपूर पाणी प्यावं. दिवसभरातून किमान आठ ते दहा ग्लास पाणी पिणं आवश्यक आहे.

**पुरेशी झोपही आवश्यक**


- रात्रीच्या जागरणाने शरीरात उष्णता वाढते. त्यामुळेही तोंड येतं. किमान सहा ते सात तास झोपणं आवश्यक आहे.
- तणावरहित जगणं आवश्यक आहे. कोणत्याही गोष्टीचा मनावर ताण आल्याने त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो.
- तोंड आलेल्या ठिकाणी ग्लिसरीन लावावं. आणि लाळ थुंकून टाकावी. तोंडात कात धरल्यानेही आराम पडतो. मात्र, त्वरित आराम न पडल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**शरीराला आवश्यक जीवनसत्त्व कोणती?**

- बी १ अर्थात थायमिन रायबोफ्लेवीन नायसीन
- ही जीवनसत्त्व कोणत्या पदार्थातून मिळतील?
- थायमिन : सर्व प्रकारची तृणधान्य, हातसडीचा तांदूळ, कोंड्यासकट गहू, मोड आलेली कडधान्य, ज्वारी आणि बाजरी. रायबोफ्लेवीन दूध, तृणधान्य, डाळी यातून अधिक प्रमाणात मिळतं.
- गर्भावस्थेतील स्त्रिया, थायरॉइड ग्रंथीचे आजार, संतती नियमनाच्या गोळ्यांचे सेवन करणाऱ्यांना या जीवनसत्त्वाची अधिक गरज असते.

**आपल मन आणि मंडला यांचं नातं समजावून घेण्यासाठीचा हा लेख. सध्या मंडला हा शब्द खूप प्रचलित झालाय. बाजारात मंडला रंगविण्याची अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. आपल्याला मंडला रंगविण्याचे अनेक फायदेही माहीत आहेत, जसे मानसिक स्थैर्य व एकाग्रता वाढवणे, मनाला शांतता व आनंद मिळणे.**

# मन-मंडला



सोनाली जोशी
एज्युकेशनल आर्ट थेरपी एक्स्पर्ट, एक्सप्रेसिव्ह आर्ट थेरपीस्ट

मंडला रेखाटणे किंवा रंगवणे याचा आर्ट थेरपीमध्ये एक उपचारपद्धती म्हणूनही वापर केला जातो. आज आपण त्याबद्दलच अधिक माहिती घेणार आहोत.

आपले मन हा आपल्या शरिरातला न दिसणारा पण त्याचे अस्तित्व आपल्या वागण्यातून, बोलण्यातून, हावभावांमधून जाणवून देणारा अवयव, मन आणि शरीर यांचा खूप जवळचा संबंध आहे. भावना सकारात्मक असतील तर त्याचे मनावर व शरीरावरही परिणामही सकारात्मक असतात. आणि नकारात्मक भावनांचा मनावर व शरीरावर परिणामही नकारात्मकच असतो. आपली बदलती जीवनशैली, रोजचे ताणतणाव, सततची मानसिक कुचंबणा हे ब्लडप्रेशर, डायबिटीस, कॅन्सरची कारणे बनत आहेत हे आपल्याया माहीतच आहे. जसे उत्तम आरोग्यासाठी आहार व व्यायामाची गरज आहे, त्याप्रमाणेच शरीर व मन यांचा समतोल साधण्याचीही गरज आहे आणि हे काम मंडला थेरपीद्वारे करता येणे शक्य आहे.

मंडल हा संस्कृत शब्द आहे. ज्याचा अर्थ वर्तुळ किंवा गोल असा आहे. गोलात काढलेले प्रतीकात्मक चित्र म्हणजे मंडला हा अतिशय ढोबळमानाने काढलेला अर्थ आहे. मंडला शब्दातच त्याचा खरा अर्थ दडलेला आहे. मंडला शब्दाची फोड केल्यास ती मन आणि दला म्हणजेच मनाचे वेगवेवेगळे स्तर आणि मनाच्या या वेगवेगळ्या कंगोऱ्यांवर काम करणारी मंडला थेरपी.

मेडिटेशनचे सर्व फायदे मंडला थेरपीमधून मिळू शकतात, कारण त्याचे वर्तुळाकार रेखांकन करताना किंवा रंगवताना आपोआपच एकाग्रता होते व श्वासोच्छवासावर पण नियंत्रण येते. त्यामुळे मडिटेशनमधली नो थॉट म्हणजेच मनात एकही विचार न येता मन शांत होणे ही अवस्था पटकन साध्य करता येते. त्यामुळे ज्यांना मेडिटेशन जमत नाही त्यांना मेडिटेशनची पूर्वतयारी म्हणून मंडला रेखाटन किंवा मंडला रंगवणे फायदेशीर ठरू शकते.

वेदिक दृष्टिकोनातून मंडला म्हणजे गती, ऊर्जा. मंडलात वापरले जाणारे वर्तुळ - हे पूर्णतेचं, अनंततेचं आणि संतुलनाचं प्रतीक आहे. वेदांतात गती ही सृष्टीची मूलभूत क्रिया मानली जाते. गती म्हणजे चैतन्याचा प्रवाह - जिथे गती आहे तिथे जीवन आहे.

वर्तुळात ना सुरुवात ना शेवट, म्हणूनच ते ब्रह्मांडाच्या अखंड गतीचं प्रतीक आहे. ही गतीच आपल्या भावना, विचार आणि जीवनचक्रांमध्ये सतत प्रवाहित होत असते.

भावना म्हणजे अंतर्गत ऊर्जा, तीही गतीचाच एक प्रकार आहे. जेव्हा भावना अडकतात, तेव्हा ऊर्जा अडकते आणि तेव्हा असंतुलन निर्माण होतं. मंडलाच्या माध्यमातून ही अडकलेली ऊर्जा गतिमान होते - तिचं संतुलन साधलं जातं.

म्हणूनच मंडल रेखाटण किंवा रंगवणं हे केवळ कला नाही तर ते एक ङ्गगतीप्रेरित ध्यानफ आहे, जे आपल्या भावनांना प्रवाहात आणून आत्मीक शांतता देते.

**आसनपूर्व स्थितीमध्ये दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवून दोन्ही हात दोन्ही मांड्यांजवळ ठेवून आरामात उभे राहावे. शिथिल स्थितीमधून गरुडासन स्थितीमध्ये जाण्याकरिता दोन्ही पाय एकत्र ठेवावेत, हात शरीराच्या बाजूला सरळ असावेत, म्हणजेच ताडासन किंवा समस्थितीत उभे राहावे. दृष्टी समोर एखाद्या अचल बिंदूवर स्थिर असावी.**

# गरुडासन



योगाचार्य
डॉ. काजल पटणी

आता गरुडासन करण्यासाठी प्रथम डावा पाय स्थिर ठेवून थोडासा गुडघ्यात वाकवून उजवा पाय वर उचलावा व उजव्या पायाचा विळखा डाव्या पायाला घालावा. आता हा विळखा घालत असताना उजव्या पायाची मांडी डाव्या पायाच्या मांडीवर असेल आणि उजव्या पायाचा उर्वरीत भाग विळखा घालून डाव्या पायाच्या पोटरीच्या वरून जाऊन घट्ट राहील. पायाचा विळखा पूर्ण होताच दोन्ही हात कोपरात ९० अंश ठेवून छातीसमोर घ्यावेत. म्हणजेच पायाप्रमाणे हाताचाही विळखा घालता येईल. आता उजव्या हाताचे कोपर डाव्या हाताच्या कोपराकडे घेऊन उजव्या हाताने विळखा अशाप्रकारे घालावा की, दोन्ही हातांचे पंजे एकमेकांवर येतील. हे पंजे गरुडाच्या चोचीप्रमाणे भासतात. हा संपूर्ण आकृतिबंध गरुड या पक्ष्याप्रमाणे दिसतो, यालाच गरुडासन असे म्हणतात. दृष्टी स्थिर ठेवून श्वास नैसर्गिक ठेवावा आणि प्राणधारणेचा अभ्यास करत संपूर्ण शरीर एका पायावर तोलावे. तोलासन प्रकारातील आसन असल्यामुळे डोळे सुरुवातीस बंद ठेवू नयेत. प्राणधारणा म्हणजेच श्वासावर लक्ष केंद्रित करावे. आपल्या क्षमतेनुसार आसनाचा अभ्यास करावा आणि अशाच प्रकारे उजव्या पायाला विळखा घालून तसेच उजव्या हाताला डाव्या हाताचा विळखा घालून गरुडासन उजव्या पायावर पूर्ण करावे. गरुडासनामधून बाहेर येण्यासाठी सावकाश पायाचा विळखा सोडून दोन्ही पाय जमिनीवर स्थिर ठेवावे. हातांचा विळखा सोडावा आणि दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवून हात शरीराच्या बाजूला ठेवून शिथिल स्थितीत उभे राहावे.

**लाभ :**

गरुडासन करताना संपूर्ण शरीराचा भार एका पायावर पडल्यामुळे पाय सशक्त व मजबूत होतात. पायांच्या व हातांच्या नसांमध्ये सुखावह ताण आल्यामुळे रक्तप्रवाह वाढतो आणि हातापायांना चांगला व्यायाम मिळतो. संधिवाताचा त्रास (प्रामुख्याने हातापायांमधील) भविष्यात होऊ नये म्हणून गरुडासनाचा अभ्यास करावा. तोलासन प्रकारातील आसन असल्यामुळे मन एकाग्र होण्यास मदत होते.

**पूर्वाभ्यास :**

ताडासन, वृक्षासन, वीरभद्रासन, हस्तपादासन या आसनांचा नियमित सराव करावा.

**विधिनिषेध :**

संधिवात, खांदे तसेच कोपराचे स्नायू अशक्त असल्यास, गुडघेदुखी, घोट्याचा त्रास, मणक्यांचे तीव्र आजार असल्यास, मानसिक अस्थिरता असल्यास गरुडासनाचा अभ्यास टाळावा. शक्यतो आसनाचा अभ्यास योगशिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीच करावा.

**एप्रिल महिन्यातच वाढलेल्या उन्हामुळे अनेकांना उष्माघात किंवा हिट स्ट्रोकचा त्रास होत आहे. हा त्रास आपल्याला होऊ नये म्हणून आहारातून काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या दररोजच्या आहारात काही गोष्टीचा समावेश केल्यास नक्कीच उन्हाळा सुसह्य होईल.**

# आहारात याचा करा वापर उन्हाळा होईल सुखकर



क्षितिजा गायकवाड
आहारतज्ज्ञ, एम.एस्सी. (फूड सायन्स अँड न्यूट्रिशन)

उन्हाळ्यात उष्णतेमुळे शरीरातील तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी घाम जास्त येतो. त्यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी, अनेकांना डीहायड्रेशन, डोकेदुखी, ॲसिडिटी, डोळ्यांची जळजळ होणे, लघवीच्या जागी जळजळ होणे, हातापायांची आग होणे, अशक्तपणा येणे असे बरेच त्रास होतात. अनेकांना त्वचाविकार देखील होतात. म्हणूनच शरीराची उष्णता वाढू नये यासाठी आपण थंडावा देणाऱ्या लिक्विड किंवा द्रव पदार्थांचा समावेश आपल्या आहारात केला पाहिजे.

- उन्हाळ्यात आपण दिवसाची सुरुवात ही गुलकंद खाऊन करू शकतो. आपण दररोज सकाळी उपाशीपोटी एक चमचा गुलकंद खाल्ला तर आपल्या शरीराला थंडावा मिळेल आणि दिवसभर आपल्याला उष्णतेचा त्रास होणार नाही.
- धने, जिरे, बडीशेप, खडीसाखर याची एकत्रित पूड करून आपण घरी ठेवू शकतो. दिवसातून दोन-तीन चमचे ही पूड आपण पाण्याबरोबर घेतली तरी उष्णतेचा त्रास होणार नाही.
- धने डाळ, बडीशेप, आवळ्याचे चूर्ण आणि खडीसाखर एकत्रित करून मुखवास करून घरी ठेवावे. अधूनमधून हे मुखवास खाल्ल्याने आपल्या शरीराची उष्णता कमी व्हायला नक्कीच मदत होते.
- उन्हाळ्याच्या दिवसात कधीही उपाशीपोटी बाहेर पडू नये. एक ग्लास पाणी पिऊनच बाहेर पडावे, जेणेकरून उष्णतेचा त्रास होणार नाही.

कितीही उन्हाळा वाढला तरीही कोल्ड्रिंक्स, पॅक ज्युसेस घेऊ नये, कारण त्यामध्ये केमिकलचे प्रमाण असते आणि त्यामुळे आपल्या शरीराला त्रास वाढू शकतो. आपण त्याऐवजी शहाळ्याचे पाणी, लिंबू सरबत, आवळा सरबत, ताक, वाळा सरबत, सब्जा पाणी, कैरीचे पन्हे, सोलकढी असे काही पदार्थ घेऊ शकतो.

- रोज दुपारी जिरेपूड टाकून ताजे ताक आपण नक्कीच घेतले पाहिजे. याने आपल्या शरीराला थंडावा प्राप्त होईल तसेच कितीही प्यावे वाटलं तरी फ्रीजचे थंडगार पाणी पिऊ नये, कारण याने आपला त्रास अधिकच वाढेल. आपण त्याऐवजी माठातील पाणी पिऊ शकतो. याने आपली तहान तर भागेलच, मात्र त्याचबरोबर मातीचे मिनरल्स किंवा मातीच्या गुणधर्माचा फायदा देखील आपल्याला नक्की होईल.

उन्हाळ्यात आपला आहार सुद्धा हलका ठेवला पाहिजे. रोज जेवणातून देशी गायीचे चमचाभर साजूक तूप नक्की घ्यावे. तसेच आपण ज्वारीची किंवा नागलीची भाकरी देखील घेतली पाहिजे. उन्हाळ्यात आपण जास्तीत जास्त रसयुक्त फळे आणि भाज्यांचा वापर केला पाहिजे. भाज्या करताना लसूण आणि हिरवी मिरची तसेच अति मसालेदार पदार्थांचा वापर कमी करावा. तसेच उष्ण गुणधर्म असणाऱ्या भाज्या जसे फ्लॉवर, वांगे, मुळा यांचा वापर कमी करावा.

आपण हिरव्या पालेभाज्या, दुधी, गिलके, शेंगा, कारले, टोमॅटो काकडी, कलिंगड, खरबूज, गाजर, संत्री अशा गोष्टींचा समावेश आपल्या आहारात दररोज आणि जास्तीत जास्त केला पाहिजे.

मग या उन्हाळ्यात आपल्याला उष्णतेचा त्रास होऊ नये म्हणून या काही गोष्टींचा समावेश आपल्या आहारात नक्कीच करा आणि आपले आरोग्य उत्तम ठेवा.

|| आरोग्य पुरवणीतील घरगुती उपाय प्रत्येक व्यक्तीला सूट होतील असे नाही, त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत. - संपादक ||

# निर्यात खुली अन् बाजारभावावर फुली

**निफाड : आनंदा जाधव**

केंद्र सरकारने एप्रिलपासून कांदा निर्यातशुल्क शून्य टक्के केल्याने कांदा बाजारभाव वाढतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, आता केंद्र सरकारने कांदा निर्यातशुल्क हटविले असले तरी कांदा बाजारभाव न वाढता उलट भावात दररोज घसरण होत आहे. त्यामुळे निर्यात खुली अन् कांदा बाजारभावावर फुली, अशी काहीशी परिस्थिती दिसत आहे.

शासनाच्या या निर्णयाविरोधात शेतकरी नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. शेतकरी आता कांदा साठवणुकीला महत्त्व देऊ लागला असून, ज्यांच्याकडे कांदा साठवणुकीची व्यवस्था नाही त्यांना मात्र हा कांदा जास्त काळ शेतात पोळ मारून ठेवणे परवडणारे नाही. सध्याचे उष्ण हवामान कांदा टिकवण क्षमतेवर परिणाम करत असून, अचानक तयार होणाऱ्या ढगाळ हवामानामुळे पाऊस कधी आणि कोठे बरसेल याचा नेम नाही. त्यामुळे कमी भावात कांदा विक्री करून झालेला खर्च पदरात पाडून घ्यावा, या विचारात बळीराजा दिसत आहे.



यावर्षी लाल कांद्याला बऱ्यापैकी भाव मिळाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी उन्हाळ कांदा लागवडीवर लक्ष केंद्रित केल्याने उन्हाळ कांद्याची विक्रमी लागवड झाली. निसर्गानेही बऱ्यापैकी साथ दिली. त्यामुळे जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यांत उन्हाळ कांद्याचे पीक जोमदार आले. त्यातही गत पंधरा दिवसांपूर्वी कांदा सरासरी १५०० रुपये प्रतिक्विंटल भावाने विक्री होत असतानाच बुधवारी (दि. १५) सायखेडा बाजार आवारावर हाच भाव सरासरी अवघा ११५१ रुपयांपर्यंत आला आहे.

त्यातच या महिन्यात पहिल्याच तारखेला केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातशुल्क शून्य टक्के केल्याने कांदा बाजारभावात सुधारणा होईल, असा अंदाज शेतकऱ्यांना होता. मात्र, बाजारभावाची चक्रे उलटी फिरू लागली आहेत. कारण बाजारात कांद्याची विक्रमी आवक होत असून, त्या तुलनेत निर्यात होत नाही.

पाकिस्तान, श्रीलंका, मलेशिया, बांगलादेश आणि उत्तरेकडील काही राज्यांत कांदा निर्यात होतो. मात्र, आता गुजरातसह पुणे आणि नाशिक जिल्ह्यातदेखील कांद्याचे विक्रमी उत्पादन झाले आहे. चीनचा कांदा इतर देशांना स्वस्त मिळत असल्याने आपल्या कांद्याची मागणी घटली आहे. साहजिकच मागणीपेक्षा आवक अधिक होत असल्याने बाजारभावात सातत्याने घसरण होत आहे. मात्र, जेव्हा पुरवठा कमी आणि मागणी वाढते अशा वेळी सरकार आयातीला प्राधान्य देते. निर्यातशुल्कात वाढ करून भाव पाडण्याचे काम करते. आणि जेव्हा आवक वाढते त्यावेळी मात्र निर्यातीला प्रोत्साहन दिले जात नाही. आजच्या परिस्थितीत केंद्र सरकारने निर्यातशुल्क घटविले असले तरी त्यास उशीर केला आहे. परिणाम भारतीय कांद्याची मागणी देखील घटल्याने त्याचा थेट परिणाम कांदा बाजारभाव घसरणीवर झाला आहे. तसे पाहता प्रत्येक स्थरातील घटकांना त्यांच्या कामाचा आणि जीवन जगण्यासाठी योग्य मोबदला पाहिजे. व्यावसायिकांना मार्जिन पाहिजे, सेवा पुरविणाऱ्यांना सेवेचे मूल्य पाहिजे, उत्पादकांना उत्पादन मूल्य व त्यावर योग्य परतावा पाहिजे व ते मिळतेही. मग शेतकऱ्यांना त्यांनी पिकविलेल्या मालाला खर्च वजा करून पिकाचे मूल्य का मिळत नाही. त्यांना धान्य व इतर शेतीतून मिळणारे भाजीपाला सोडून अन्य गरजांसाठी पैसा नको का? फक्त जीवनावश्यक गरजा कमी भावात मिळाव्यात म्हणून शेतकऱ्यांच्या मालाचे भाव वाढू द्यायचे नाहीत का? मागणी पुरवठा हे सूत्र येथे लागू होत नाही. त्यामुळे यासाठी सरकार हेच जबाबदार आहे. त्यामुळे सरकारने शेतकरी हिताला प्राधान्य देत शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न केला पाहिजे. मात्र, सरकारकडून शेतमाल पिकविणाऱ्यांपेक्षा खाणाऱ्यांना जास्त महत्त्व दिले जात असल्याने दिवसागणिक कांद्याचे भाव खाली येत आहे. भाव असेच खाली येत राहिले तर कांदा पिकावर झालेला खर्च निघेल की नाही, अशी शंका घेतली जात आहे.

### नाफेडची कांदा खरेदी कुचकामी

जेव्हा जेव्हा कांद्याचे भाव कोसळतात, तेव्हा तेव्हा सरकार बाजारभाव हस्तक्षेपनुसार नाफेडमार्फत कांदा खरेदी करते. मात्र, जेव्हा कांद्याचे भाव वाढतात तेव्हा हेच सरकार नाफेडचा साठवलेला कांदा बाजारात आणून त्याची येथीलच बाजारपेठेत विक्री करून भाव पाडण्याचे काम करते. त्यामुळे नाफेडने कांदाच खरेदी करू नये. केवळ मधले दलाल पोसण्यासाठी आणि आपल्या पक्षाचे कार्यकर्ते खुश ठेवण्यासाठी कागदावर असलेल्या फार्मर कंपन्यांकडून कांदा खरेदी करून शेतकऱ्यांच्या पैशावर डल्ला मारण्याचे काम केले जात आहे. साहजिकच दरवेळी नाफेडची खरेदी कुचकामी ठरत आली आहे.

## महत्त्वाचे



### पी. के. आहेर पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. नूतन आहेर, व्हाईस चेअरमनपदी खरोटे

**देवळा :** येथील पी. के. आप्पा आहेर पतसंस्थेच्या चेअरमनपदी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या डॉ. नूतनताई सुनील आहेर तर व्हा. चेअरमनपदी किशोर मनोहर खरोटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली असून, मंगळवार दि. १५ रोजी नवनियुक्त चेअरमन व व्हा. चेअरमनपदाच्या निवडीसाठी सहकार तथा निवडणूक निर्णय अधिकारी वसंत गवळी यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी चेअरमनपदासाठी डॉ. नूतनताई आहेर यांनी व व्हा. चेअरमनपदासाठी किशोर खरोटे यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. निर्धारित वेळेत दोघांचेच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी वसंत गवळी यांनी दोघांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. त्यांची बिनविरोध निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला व नवनियुक्त चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नवनियुक्त संचालक प्रफुल्ल आहेर, दीपक देशमुख, केशव खैरनार, शेखर देवरे, निंबा निकम, हेमंत देवरे, तुषार आहेर, सुरेखा मेधणे, मनीष शिवदे आदींसह व्यवस्थापक रवि गोसावी, प्रशांत पगारे, मयूर शेळके, योगेश आहिरे उपस्थित अभिनंदन होत आहे.



### वलखेड उपसरपंचपदी मंगलाबाई राजगुरू

**वलखेड :** वलखेड (ता. दिंडोरी) उपसरपंचपदी मंगलाबाई राजगुरू यांची बिनविरोध निवड करण्यात आली. रोटेशननुसार उपसरपंच रामदास चारोस्कर यांनी राजीनामा दिल्यामुळे उपसरपंचपदाच्या निवडणुकीसाठी सभा आयोजित करण्यात आली होती. मंगलाबाई राजगुरू यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकारी तथा सरपंच विनायक शिंदे यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली. याप्रसंगी सदस्य हिरामण पाटील, रामदास चारोस्कर, सदस्या अश्विनीताई शिंदे, सुमनबाई पाटील, सुनीता राऊत, कमलबाई चारोस्कर, ग्रामसेवक दिगंबर चव्हाण, ग्रामस्थ दिलीप शिंदे, नारायण राजगुरू, रमेश क्षीरसागर, आनंदा राजगुरू, चिंटू पाटील, विजय राजगुरू, रामभाऊ पाटील, योगेश शिंदे, गणेश शिंदे, रमेश पाटील, वैभव राजगुरू, नारायण शिंदे, विकी राजगुरू, काशीनाथ गायकवाड, रोशन साडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एक ठार

**पेठ :** नाशिक-पेठ मार्गावरील कोटंबी घाटानजीकच्या हॉटेल जय मल्हार समोर पेठकडून उस्थळे गावाकडे मोटारसायकलहून जाणाऱ्या युवकास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने, जबर जखमी झालेला युवक उपचारापूर्वीच मृत्युमुखी पडला असून, अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या वाहनाचा पोलीस शोध घेत आहेत. सोमवारी (दि.१४ ) रात्री ८ वाजेदरम्यान तालुक्यातील उस्थळे येथील ज्ञानेश्वर सोमनाथ कडाळी (वय २३) हा युवक पेठकडून आपल्या गावाकडे मोटारसायकल (एम.एच. १५ डी.यू. ३१८७) या वाहनाने गावाकडे जात असताना, विरुद्ध दिशेकडून येणाऱ्या वाहनाने जोरदार धडक दिल्याने, जबर जखमी युवक बराच वेळ घटनास्थळी पडून होता. त्याला उपचारासाठी पेठ ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्याची प्राणज्योत मालवली होती. पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरोधात मृताची आई पुष्पाबाई सोमनाथ कडाळी यांच्या फिर्यादीवरून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, अधिक तपास हवा. ए. एम. जाधव करीत आहेत.



### छत्रपती पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रेय देवरे

**देवळा :** खर्डे येथील छत्रपती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी संस्थेचे ज्येष्ठ संचालक दत्तात्रेय मुरलीधर देवरे यांची तर व्हा. चेअरमनपदी बबन सदाशिव गांगुर्डे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली असून, मंगळवार दि. १५ रोजी नवनियुक्त चेअरमन, व्हा. चेअरमनपदाच्या निवडीसाठी सहकार तथा निवडणूक निर्णय अधिकारी वसंत गवळी यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी चेअरमनपदासाठी दत्तात्रेय देवरे व व्हा. चेअरमनपदासाठी बबन गांगुर्डे यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. निर्धारित वेळेत दोघांचेच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी वसंत गवळी यांनी देवरे व गांगुर्डे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. नवनियुक्त चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक संदीप पवार, दिलीप देवरे, सुनील शिंदे, चंद्रकांत पवार, दीपक कुवर, देवीदास अलई, सरला मोरे आदींसह माजी उपसरपंच सुनील जाधव, देवळा शेतकी संघाचे संचालक हंसराज जाधव, विका सोसायटीचे संचालक कारभारी जाधव, डॉ. बापू सोनवणे, माधव ठोबरे, शशिकांत ठाकरे, प्रवीण देवरे, आबा कुंवर, संस्थेचे व्यवस्थापक अजय देवरे, मनोज थोरात उपस्थित होते.



### उद्धव ठाकरेंचे इगतपुरीत स्वागत

**इगतपुरी :** नाशिक येथे उबाठा गट शिवसेनेच्या वतीने बुधवार दि. १६ रोजी विभागीय निर्धार शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे नाशिककडे जात असताना नाशिक जिल्ह्याचे प्रवेशव्दार समजल्या जाणाऱ्या इगतपुरीत उद्धव ठाकरे यांचे शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात व आतषबाजी करून जोरदार स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य कावजी ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख निवृत्ती जाधव, उपजिल्हाप्रमुख कुलदीप चौधरी, जि. प. सदस्य कावजी ठाकरे, तालुकाप्रमुख राजाभाऊ नाठे, माजी नगराध्यक्ष संजय इंदुलकर, केरु पा. देवकर, राधाकृष्ण जाधव, संदीप शर्मा, रमेश धांडे, अर्जुन भोर, सुदाम भोसले, गोविंद गतीर, भास्करराव गव्हाणे, हनुमंता गायकवाड आदी उपस्थित होते.

## ओझर नगर परिषदेवर वारकऱ्यांचा दिंडी मोर्चा

### दहा दिवसांत समस्या सोडवण्याची ग्वाही दिल्यानंतर आंदोलन मागे

**ओझर : वार्ताहर**

येथील मारुती वेस हनुमान मंदिर परिसरात असलेला कचरा उचलला जात नाही. अनेक वेळा तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. याप्रकरणी नगर परिषदेचे लक्ष वेधण्यासाठी येथील नागरिकांनी टाळमृदंगाच्या गजरात भजन व अभंग गात मारुती मंदिर ते नगर परिषदेपर्यंत दिंडी मोर्चा काढण्यात आला होता.

मारुती वेसजवळील पाहुणा मारुती हनुमान मंदिरात सप्ताह चालू असताना वारकरी संप्रदायातर्फे स्वच्छतेबाबत निवेदन देऊनही नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाने स्वच्छता न केल्याने तसेच इतर समस्यांबाबत प्रशासनाला जाग येण्यासाठी वारकऱ्यांनी दिंडी मोर्चा काढला. नगर परिषदेच्या वऱ्हांड्यात ठिय्या मांडून एकनाथी भारुडे व भजन करत तब्बल तीन-चार तास वारकऱ्यांनी हे ठिय्या आंदोलन केले.



यावेळी बोलताना महेश गाडगे म्हणाले की, ग्रामपंचायत होती त्यावेळी गावच्या विविध वॉर्डांच्या प्रतिनिधींमार्फत समस्या मांडायचे ते सोडवण्याचे प्रयत्न करायचे व किमान वर्षातून एकदा तरी जनता दरबार व विशेष ग्रामसभा घेऊन जनतेच्या समस्या येत होत्या. प्रशासक राज आल्यापासून एकही जनता दरबार किंवा सभा झाल्या नाही. प्रशासनाने दहा दिवसांत सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर वारकरी संप्रदायाने आंदोलन मागे घेतले.

वारकऱ्यांतर्फे आम्ही जसे गावासाठी नगर परिषदेपर्यंत आलो तसे सर्वच प्रशासनाने आमच्याबरोबर पायी मारुती मंदिरापर्यंत येण्याचा आग्रह धरल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी ज्ञानेश्वर आहेर यांनी समस्या मांडल्या. नाशिकला बैठक असल्याने मुख्याधिकारी नाशिकला होते. आंदोलनकर्त्यांनी मुख्याधिकारी उपस्थित झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा हट्ट धरला. वेळेचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्याधिकारी किरण देशमुख यांनी नगर परिषदेत हजेरी लावत वारकरी संप्रदायाशी चर्चा करून दहा दिवसांत सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

या वारकरी मोर्चात संजय आहेर, पांडुरंग आहेर, बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब क्षीरसागर, ज्ञानेश्वर आहेर, दीपक चौरे, पोपटराव बर्डे, कृष्णा आहेर, सुकदेव मंडलिक, ॲड. केशव आहेर, बापू देवरे, पुष्पा अक्कर, शोभा थोरात, शकुंतला गवळी, संगीता आहेर, सविता आहेर, कल्याणी आहेर, दत्ता तांदळे, मयुरी सोमासे, निर्मला शेटे, ललिता गोसावी, कृष्णा महाराज आहेर, नितीन चौंधरी, विमल सोनवणे, ओम गावंडे. राहूल जंजाळे, रावसाहेब जाधव, लालता भारती, सिताराम बिडवे, दौलत पोटे, श्रावण पोटे आदी उपस्थित होते.

## कांद्याच्या निर्यातीवर ५ टक्के प्रोत्साहन देण्याची मागणी

**लासलगाव : वार्ताहर**

घाऊक किमती स्थिर ठेवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय विक्री वाढवण्यासाठी कांद्याच्या निर्यातीसाठी ५ टक्के प्रोत्साहन देण्याची मागणी फलोत्पादन उत्पादक निर्यातदार संघटनेने केंद्र सरकारकडे केली आहे.

अलीकडेच २० टक्के निर्यातशुल्क काढून टाकण्यात आले असूनही लासलगाव आणि इतर जिल्ह्यांतील बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या सरासरी घाऊक किमतीत लक्षणीय घट (दोन महिन्यांत ६०%) झाल्यानंतर ही विनंती करण्यात आली. देशातील सर्वांत मोठी घाऊक कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव बाजार समितीत कांद्याचे दर प्रतिक्विंटल ३,१०० रुपयांवरून १,२५० रुपयांपर्यंत घसरले आहेत. १ एप्रिल रोजी निर्यातशुल्क रद्द केल्यानंतर वाढत्या पुरवठ्यामुळे उन्हाळी कांद्याचा सरासरी घाऊक भाव प्रतिक्विंटल १,२५० रुपयांपर्यंत घसरला आहे. उशिरा खरीप कांद्याला प्रति क्विंटल ९०० रुपयांनी कमी भाव मिळत आहे. सध्या बाजारात येणाऱ्या आवकपैकी उन्हाळी कांद्याचा वाटा सुमारे ९० टक्के आहे, तर उशिरा खरीप कांद्याचा वाटा उर्वरित १० टक्के आहे.

एचपीईएचे उपाध्यक्ष विकास सिंह म्हणाले की, केंद्र सरकारने कांदा निर्यात स्पर्धात्मक करण्यासाठी, निर्यात वाढविण्यासाठी, घाऊक कांद्याचे दर स्थिर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी ५ टक्के प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने निर्यात केलेल्या उत्पादनांवरील शुल्क आणि करांमध्ये सवलत दर सध्याच्या १.९ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत वाढवावा. सध्या पाकिस्तान प्रति टन १९० डॉलर्स या दराने कांद्याची निर्यात करत आहे, तर भारतातून कांद्याची निर्यात किंमत उत्पादनाच्या गुणवत्तेनुसार २३० ते ३०० डॉलर्स प्रति टन आहे. जागतिक खेळाडूंशी स्पर्धा करण्यासाठी आणि भारतातून कांद्याची निर्यात वाढवण्यासाठी आपल्याला अधिक प्रोत्साहनांची आवश्यकता आहे.



## संस्थेला मोठे करण्यात सेवकांचा मोठा हातभार : उपसभापती मोगल

**कसबे-सुकेणे : वार्ताहर**

मविप्र संस्थेला मोठे करण्यात एक महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षकेतर शिपाई. खऱ्या अर्थाने संस्थेला मोठे करण्यात त्यांची भूमिका मोलाची असून, शिक्षकेतर सेवक संस्थेची सेवा आईसारखी करतात, असे प्रतिपादन उपसभापती डी. बी. मोगल यांनी केले.

मौजे सुकेणे (ता. निफाड) येथील कर्मवीर रावसाहेब थोरात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सेवानिवृत्त होत असलेले भास्कर गांगुर्डे व चिंधू गांगुर्डे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक शिवाजी गडाख होते. यावेळी सेवानिवृत्त होत असलेले भास्कर गांगुर्डे व चिंधू गांगुर्डे यांचा शाल, श्रीफळ भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य रायभान दवंगे यांनी केले. यावेळी विद्यार्थिनी सिद्धी वडघुले, अभिनवचे मुख्याध्यापक राहुल मोगल, ज्ञानेश्वर वाघ, सोमनाथ मत्सागर, मुकुंद ताकाटे, आनंदा शिंदे, भास्कर गांगुर्डे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन योगिता चव्हाण व वैशाली करंजे यांनी तर आभार प्रीती मोरे यांनी मानले.

### सिद्धार्थ सानपची सैन्यदलात निवड

**कसबे-सुकेणे:** निफाड



तालुक्यातील शिवरे येथील सिद्धार्थ बाळासाहेब सानप या विद्यार्थ्याची भारतीय सैन्यदलात निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत प्रयत्नांचे सातत्य, जिद्द व मेहनतीच्या बळावर त्याने या यशाला गवसणी घातली आहे. भारतीय सैन्यदलातील जनरल ड्युटी (जीडी) मध्ये बेळगाव कर्नाटक येथील मराठा बटालियनमध्ये गुरुवार दिनांक २४ एप्रिल रोजी तो दाखल होणार आहे. येवला येथील सक्सेस करिअर अकॅडमी येथे २०२२ पासून त्याचे प्रशिक्षण व सराव सुरू होता. सक्सेस करिअर अकॅडमीचे समाधान जमदडे व पंकज वाडेकर सरांचे त्याला या कामी मार्गदर्शन लाभले.

## इगतपुरी तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण २१ एप्रिलला जाहीर होणार

**इगतपुरी : प्रतिनिधी**

तालुक्यातील ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ९६ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण काढण्याचा कार्यक्रम २१ एप्रिलला दुपारी १२ वाजता इगतपुरी तहसील कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार अभिजित बारावकर यांनी दिली.

महिलांसाठी सरपंचपदांचे आरक्षण काढण्याचा कार्यक्रम २३ एप्रिलला दुपारी १२ वाजता होईल. इगतपुरी तालुक्यातील बिगर अनुसूचित, अंशत: अनुसूचित, पूर्णत: अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, सर्वसाधारण प्रवर्गाच्या ९६ सरपंचपदांसाठी आरक्षण काढण्यात येईल. आरक्षण बदलाच्या हालचालींमुळे गाव पुढाऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. काढलेले आरक्षण सार्वत्रिक निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतीला लागू केले जाणार आहे.

यामध्ये अनुसूचित क्षेत्रात असणाऱ्या टाकेघोटी, फांगुळगव्हाण, पिंपळगाव मोर, आंबेवाडी, आवळखेड, कुशेगाव, कऱ्होळे, वाकी, त्रिंगलवाडी, टाकेद बुद्रुक, मोगरे, अडसरे खुर्द, पिंपळगाव भटाटा, वाळविहीर, धामणगाव, धारगाव, भावली बुद्रुक, मायदरा धानोशी, घोटी बुद्रुक, टाकेद खुर्द, नागोसली, भरवज, इंदोरे, पिंप्री सद्रोद्दीन, ओंडली, आवळी दुमाला, धामणी, भावली खुर्द, आडवण, वासाळी, अधरवड, तळोशी, उंबरकोन, रायांबे, आहुर्ली, चिंचलेखैरे, सोमज, शेवगेडांग, म्हसुर्ली, अडसरे बुद्रुक बोरटेंभे, धार्णोली, कोरपगाव, बेलगाव तऱ्हाळे, नांदगाव सदो, उभाडे, देवळे, काळुस्ते, तळोघ, कांचनगाव, सोनोशी, खेडभैरव, टिटोली, खैरगाव, मांजरगांव, बोर्ली, कुर्णोली, खडकेद, शेनवड बुद्रुक, मानवेढे, बलायदुरी, बारशिंगवे, खंबाळे, कुरुंगवाडी आदी ग्रामपंचायतींचा समावेश आहे.


अनुसूचित जमाती (पुरुष किंवा स्त्रिया) यामध्ये शिरसाठे, कुऱ्हेगाव, बेलगाव कुऱ्हे, सांजेगाव, मोडाळे, गोंदेदुमाला, भरविर खुर्द, साकुर, कृष्णनगर, घोटी खुर्द, माणिकखांब, दौंडत, जानोरी, मालुंजे, लक्ष्मीनगर, नांदगाव बुद्रुक, मुकणे, गरुडेश्वर, नांदूरवैद्य, मुरंबी, शेनवड खुर्द, निनावी, वाघेरे, भरविर बुद्रुक, पाडळी देशमुख, वाडीवऱ्हे, मुंढेगांव, पिंपळगांव घाडगा, शेणीत, कावनई, पिपळगाव डकरा, समनेरे ही गावे समाविष्ट करण्यात आली आहे.

# सौरऊर्जेचा प्रकाश अन् गावचा विकास

## कारसूळ ग्रामपंचायतीची आदर्शवत वाटचाल

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**

विजेच्या तुटवड्यातून शोधली दिशा, सौर प्रकाशात फुलली समृद्धी, निफाड तालुक्यातील कारसूळ ग्रामपंचायतीने पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. गावातील पाणीपुरवठा योजनेसाठी सौरऊर्जेचा प्रभावी वापर करून दरवर्षी सुमारे एक ते दीड लाख रुपयांची बचत साधली आहे. ही बचत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी वापरण्यास मदत होणार आहे.



ग्रामपंचायतीची लोकसंख्या सुमारे २२७८ आहे. ग्रामस्थांच्या पाणीपुरवठ्याची गरज भागविण्यासाठी याआधी विहिरीतून पाणी उचलण्यासाठी विद्युत मोटर्सचा वापर करण्यात येत होता. यामुळे ग्रामपंचायतीचे दरमहा वीजबिल १७ ते २२ हजार रुपयांदरम्यान येत असे. वार्षिक खर्चाच्या दृष्टीने पाहता, या योजनेमुळे ग्रामपंचायतीवर सुमारे २ लाख ते २ लाख ६४ हजार रुपयांपर्यंतचा आर्थिक भार पडत असे. या खर्चाची बचत करण्यासाठी ऑक्टोबर-२०२४ मध्ये १५ वित्त आयोगाच्या निधीतून १० एचपी क्षमतेचा सौरपंप बसवून कार्यान्वित करण्यात आला आणि त्याचा सकारात्मक परिणाम लगेच दिसू लागला. सध्या ग्रामपंचायत मासिक वीजबिल सहा महिन्यांचे २० हजारांप्रमाणे १२०००० आले असते परंतु ऑक्टोबर १७१०, नोव्हेंबर ३१६०, डिसेंबर ७१०, जानेवारी २६१०, फेब्रुवारी १५२० आणि मार्च ७० रुपयांदरम्यान वीजबिल येत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष खर्चात मोठी घट झाली असून, संपूर्ण वर्षात दोन लाखांपर्यंत बचत ग्रामपंचायतीची होऊ शकते. ही झालेली बचत पाणी पुरवठ्याच्या विविध विकासकामांमध्ये वळवता येईल. ग्रामपंचायत यांसारख्या बाबींमध्ये ही रक्कम गुंतवली जात असल्याने केवळ विजेची बचतच नव्हे तर ग्रामपंचायतीच्या ग्रामविकासाला आर्थिक बळकटी मिळत आहे.

हरित ऊर्जेचा वापर करत कारसूळ ग्रामपंचायतीने हरित ग्रामपंचायत या संकल्पनेची मूर्त अंमलबजावणी केली आहे. भविष्यातील ऊर्जा गरजेचा विचार करत हा उपक्रम शाश्वत विकासासाठी एक आदर्श मार्ग ठरत आहे. या उपक्रमासाठी सरपंच स्वाती काजळे, उपसरपंच श्यामराव शंखपाळ, आशा ताकाटे, मनीषा काजळे, उज्ज्वला गांगुर्डे, अमोल ताकाटे, पूनम पगार, भाऊसाहेब कंक यांचे सहकार्य लाभले.

> ‘गावाच्या समृद्धीचा मार्ग हा विजेच्या बचतीपासून सुरू होतो हे कारसूळ ग्रामपंचायतीने सिद्ध करून दाखवले आहे. आर्थिक बचत, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकास या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी यशस्वी कामगिरी ग्रामपंचायतीने केली आहे. तसेच या यशामागे ग्रामपंचायतीतील दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, ठोस निर्णयक्षमता, पारदर्शक अंमलबजावणी आणि ग्रामस्थांचा एकजूट सहभाग हे सर्व घटक निर्णायक ठरले आहेत. हेच ग्रामीण विकासाचे खरे सूत्र आहे.
>
> – **स्वाती काजळे,** सरपंच, कारसूळ

### कसबे-सुकेणे येथे हनुमान जन्मोत्सव

**कसबे-सुकेणे :** निफाड तालुक्यातील कसबे-सुकेणे येथील सावतानगरमध्ये महाबली हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हरिभक्त पारायण अण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. सप्ताह कालावधीत निवृत्ती महाराज शिंदे वलखेड, शेषागर महाराज बोबडे इंदापूर, गोविंद महाराज करंजकर अंबेजोगाई, उद्धव महाराज बिराजदार कर्नाटक, शांताराम महाराज बोडके पाथर्डी, भरत महाराज गतीर मुंढेगाव, भरत महाराज वाघ शिवडा यांची कीर्तने झाली. गुरुवर्य अण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. सप्ताह कालावधीत पहाटे काकड आरती हरिपाठ, कीर्तन आदी कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घेतला.

## महत्त्वाचे



## सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिरात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**सिन्नर :** येथील सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिरात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका संगीता राजगुरू होत्या. यावेळी इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी आंबेडकर यांचे पुस्तक प्रेम, वाचनाची आवड, भारतीय संविधानाचे शिल्पकार अशा अनेक गोष्टी मनोगतातून व्यक्त केल्या. 'शिका, संघटित व्हा' आंबेडकरांचा हा विचार मुलांना सांगून विद्यार्थीदशेत आंबेडकर वर्गाच्या बाहेर थांबून सुद्धा शिकले, असे प्रतिपादन श्रीमती दिपार्ती आहेर यांनी केले. बाळू माळी यांनी डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांमध्ये जागृती व शैक्षणिक प्रगतीसाठी बहिष्कृत भारत साप्ताहिक सुरू करून जातीयभेद, चवदार तळ्याचा सत्याग्रह याची माहिती दिली. आंबेडकरांनी जीवनात केलेला संघर्ष, वाचनाचे फायदे, 'पुस्तक वाचून मस्तक बनवा म्हणजे कुणापुढे नतमस्तक होण्याची गरज नाही. 'आंबेडकरांनी त्या काळात सुखसुविधा नसताना आधुनिक तंत्रज्ञान विकसित नसताना ही अभ्यास करून अनेक पदव्या संपादन केल्या आपण ही वाचन केले पाहिजे, असे आवाहन संगीता राजगुरू यांनी अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. अरविंद लोणारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

## ब्राह्मणवाडेतील कंपनीत घरफोडी

**सिन्नर :** तालुक्यातील ब्राह्मणवाडे येथील श्री सिद्धी पॉलिमर्स कंपनीत अज्ञात चोरट्यांनी चोरी करुन १ लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. दि. १३ रोजी रात्री ही चोरीची घटना घडली. याप्रकरणी कंपनी मालकाने दिलेल्या तक्रारीहून एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. चेहडी, नाशिकरोड येथील दिनेश पाटील यांची ब्राह्मणवाडे शिवारात श्री सिद्धी पॉलिमर्स नावाने कंपनी आहे. या कंपनीचे अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास लोखंडी शेटर्स तोडून आत प्रवेश केला. कंपनीतील २५ हजार रुपये किमतीचे फिक्चर बेस ४ प्लेट, साडेचार हजार रुपयांचे गुलू बार, १५ हजारांचे इन्व्हर्टर्स पॅड आणि कोर, १५ हजाराचे माऊंट सेट, ४० हजाराचे रबर मोल्ट, १० हजाराचे एस. एस. डाय आणि पार्ट, डिजीटल व्हरनिअर, वाशल व रबर बुश मोह, पंचिंग डाय सेट , पाइप मोल्ड, एस. पी. एम मशीन, हार्डवेअर, ऑईल, एम. एस. प्लेट असा सुमारे १ लाख ६५ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. पाटील यांच्या फिर्यादीहून अज्ञात चोरट्यांच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक पाटील अधिक तपास करीत आहेत.

## देवपूरला इनडोअर क्रिकेट ग्राउंडचे भुमिपूजन

**सिन्नर :** तालुक्यातील देवपूर येथे माजी जि. प. सदस्या, शिवसरस्वती फाउंडेशनच्या सर्वेसर्वा सीमंतिनी माणिकराव कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त गावातील तरुण व लहान मुलांसाठी इनडोअर क्रिकेट ग्राउंडचे (टर्फ) भूमिपूजन पंचायत समितीचे माजी गटनेते विजयआप्पा गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गावात वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी सिन्नर तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक माणिक गडाख, सरपंच नंदा गडाख, उपसरपंच शरद गडाख, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र गडाख, माजी उपसरपंच प्रशांत गडाख, ग्रा प सदस्य शरद नरोडे, सोसायटीचे चेअरमन चंदर मामा खोले, माजी चेअरमन सुका बाबा गडाख, दौलत गडाख, सदस्य उत्तम गडाख, तुषार गडाख, निवृत्ती गडाख, शंकर धरम, रमेश गडाख, रघुनाथ गोळेसर, अशोक गवळी, दिनेश गडाख, विकास गडाख, योगेश गडाख, पंकज जाधव, बापू गडाख, अरुण वाढवणे. नीलेश जाधव, रवी घरटे, गणेश इघे, सोपान दिवे आदींसह गावातील तरुण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पाथरे येथे फळे वाटप

**सिन्नर :** तालुक्यातील पाथरे येथे माजी जि. प. सदस्या इंजि. सीमंतिनी कोकाटे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी कृषिमंत्री नामदार माणिकराव कोकाटे साहेब फ्रेंड सर्कलच्या वतीने चिने वस्ती व नरोडे वस्ती प्राथमिक शाळा, तसेच अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना फळे व खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच स्वाती नरोडे, सामाजिक कार्यकर्ते तथा साईलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन मच्छिंद्र चिने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत चिने, पोलिस पाटील प्रदिप नरोडे, भाऊसाहेब नाना नरोडे, चंद्रकांत चिने, राजेंद्र बिडवे, विक्रम चिने, पवन नरोडे, अरुण नरोडे, अनिल गिते, ज्ञानेश्वर थोरात, भरत सुडके, गणेश चिने, गोरक्षनाथ चिने, दिगंबर शेळके, अण्णासाहेब नरोडे, नवनाथ संतोष चिने, सुडके, नरोडे सर, श्रीमती पगार, श्रीमती ढवण आदींसह स्थानिक नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच स्वाती नरोडे व सामाजिक कार्यकर्ते तथा साईलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन मच्छिंद्र चिने यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक निमसे सर यांनी आभार मानले.

## मुक्त विद्यापीठात बाबासाहेबांना अभिवादन

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे संचालक नागार्जुन वाडेकर, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस गणेश लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्याबद्दल माहिती देत आधुनिक भारतातातील लोकशाहीची पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सहा गावांना बंदिस्त चारीद्वारे कायमस्वरूपी आवर्तन द्या

### शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना साकडे

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्याच्या पूर्व भागातील ६ गावांचा निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रात समावेश असूनही ही गावे आवर्तनाच्या पाण्यापासून सातत्याने वंचित राहत आहेत. या गावांत बंदिस्त चारीद्वारे कायमस्वरूपी आर्वतनाचे पाणी मिळावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या मागणीचे निवेदन भाजपच्या शिष्टमंडळाने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसमवेत राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची शिर्डी येथील विश्रामगृहात भेट घेऊन दिले.

प्रवरा डाव्या कालव्यावरील निळवंडे लाभक्षेत्रातील तळेगाव ब्रिज टेल येथून येणाऱ्या डाव्या व उजव्या चारीने सिन्नरच्या पूर्व भागात पाथरे, वारेगाव, सायाळे, मलढोण, कहांडळवाडी, दुशिंगवाडी या गावांना याचा फायदा होणार आहे. गेल्या दोन महिन्यापूर्वी प्रत्यक्षात चाऱ्यांचे काम सुरू झाले. मात्र सद्यस्थितीत हे काम पुन्हा ठप्प असून, ते त्वरित सुरू करावे. उजव्या व डाव्या चारी मार्गात येणाऱ्या अडचणी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात जाणून घेऊन पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावे. अनेकवेळा शेतकऱ्यांनी रास्ता रोको उपोषण करून सुद्धा अधिकारी दाद देत नाही. थातूरमातूर उत्तरे देऊन वेळ मारून नेत असल्याची तक्रार निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी भाजप नाशिक जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, शेतकरी नेते डॉ. विजय शिंदे, सुधाकर शिंदे, अशोक शिंदे, दत्तात्रेय चासकर, ज्ञानदेव शिंदे या शेतकऱ्यांनी साकडे घातले.



जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी निळवंडे पाण्यासंदर्भात चर्चा करताना सिन्नर तालुक्यातील ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, विजय शिंदे, सुधाकर शिंदे आदींसह शेतकरी.

#### पाणीप्रश्न निकाली काढणार

सिन्नरच्या पूर्व भागात येणाऱ्या निळवंडे लाभक्षेत्रातील गावांचा कायमचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी येत्या १५ ते २० दिवसांत पाणी परिषद घेऊन त्यासाठी राज्याचे कृषिमंत्री, जलसंपदामंत्री, खासदार यांची वेळ घेऊन पाणीप्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न करणार आहे.

**– ज्ञानेश्वर कुऱ्हाडे,** जिल्हा सरचिटणीस, भाजपा

#### पावसाळ्यापूर्वी काम सुरू करण्याचे आश्वासन

जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी प्रत्यक्षात काम सुरु होईल. या लाभक्षेत्रात येणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. लवकरच सिन्नर तालुक्याचा दौरा करणार असून, प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आश्वासन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

## दोडीत शेळ्यांच्या गोठ्यावर बिबट्याचा हल्ला

### ३ शेळ्या, १ बोकड, कोकरू ठार

**सिन्नर : प्रतिनिधी**



तालुक्यातील दोडी बुद्रुक शिवारातील कमलबाई दराडे वस्तीवर सोमवारी (दि.१४) मध्यरात्री बिबट्याने शेळ्यांच्या गोठ्यावर हल्ला चढवत तीन शेळ्यांसह बोकड व कोकरू ठार केल्याची घटना घडली. रब्बी हंगामाच्या कापण्या उरकल्याने बिबटे मानवी वस्तीकडे धाव घेत असून, त्यामुळेच या घटना घडत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

शेळके वस्तीकडे जाणाऱ्या जुन्या दराडे वस्तीकडे सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने धुमाकूळ घातला. येथील कमलबाई दराडे यांनी दुग्धव्यवसायासाठी शेळ्या-मेंढ्या पाळल्या आहेत.

त्यासाठी घराशेजारीच शेळ्यांचा व गायींचा गोठा आहे. मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने गोठ्यावर हल्ला चढवत तीन मोठ्या शेळ्या, १ बोकड आणि कोकराचा बळी घेतला. मृतावस्थेत शेळ्या आढळून आल्याने त्यांनी आरडाओरड केल्याने दराडे परिवारासह परिसरातील शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, पशुवैद्यकीय वैद्यकीय अधिकारी डॉ. विकास चत्तर व वनकर्मचारी यांच्या उपस्थितीत घटनास्थळी पंचनामा करण्यात आला.

पाच शेळ्या मयत झाल्याने दराडे कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून, तत्काळ भरपाई देण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

#### बिबट्याच्या मुक्त संचाराने भय

गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार वाढल्यामुळे वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.



## दापूरला सीमंतिनी कोकाटेंच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दापूर येथे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या इंजि. सीमंतिनी माणिकराव कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त दापूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्यातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा परिसरातील महिलांसह गरजू रुग्णांनी लाभ घेतला.

या आरोग्य शिबिरात स्त्रियांच्या मासिक पाळी, छातीचे आजार, नेत्रतपासणी, स्तन, गर्भाशय आजार, किडनी आजार तपासणी व उपचार, रक्त तपासणी, उच्च रक्तदाब तपासणी, ईसीजी आदी आजारांवर उपचार तसेच कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया शिबिर स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुशील पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखर पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी गरोदर मातांसाठी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. पवार यांनी गरोदर मातांची तपासणी केली तसेच गरोदरपणात मातांनी घ्यावयाची काळजी व आहारासंदर्भात मार्गदर्शन केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखर पाटील, योगेश आव्हाड यांनी मनोगत व्यक्त केले. या आरोग्य शिबिरात ६५ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली. शिबिरात लहान मुले, वयोवृद्ध पुरुष, महिला, गरोदर मातांसह नागरिक सहभागी झाले. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष योगेश आव्हाड यांनी इंजि. सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रुग्णांना फळे वाटप केले.



## कन्येच्या वाढदिवसानिमित्त कृषिमंत्र्यांनी बँकेत ठेवली ५ लाखांची ठेव

### सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त राबवला उपक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आर्थिक अडचणीतून बाहेर काढून गत वैभव मिळून देण्यासाठी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे वारंवार शासनाकडे बैठका घेऊन प्रयत्न करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बँकेच्या ठेवी वाढविण्यासाठी त्यांनी कन्या तथा जि. प.च्या माजी सदस्या सीमंतिनी कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि.१६) ५ लाखांची ठेव जिल्हा बँकेच्या सोमठाणे येथील शाखेत ठेवली.

जिल्हाभरातील शेतकऱ्यांना जिल्हा बँकेतील बचत खात्यावरील व्यवहार सुरू करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, त्यांच्या या कृतीचा आदर्श घेऊन पाठोपाठ कार्यकर्तेही जिल्हा बँक वाचवण्यासाठी सरसावले आहेत. ठेकेदार सर्जेराव उगले यांनी १ लाख रुपये ठेव तसेच ४ वैयक्तिक शेअर्स बँकेत जमा करणार असल्याचे सांगितले. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष योगेश आव्हाड यांनी १ लाख रुपये ठेव दोडी शाखेत ठेवण्याची घोषणा केली. सेवानिवृत्त प्राध्यापक राजाराम मुंगसे यांनी जिल्हा बँकेत ठेवी वाढविण्यासंदर्भात सविस्तर धोरण समजावून सांगितले.

नवीन ठेव मागता क्षणी बँक परत देणार असल्याचे यावेळी बँकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी सिन्नरचे सहायक निबंधक संजीव गीते, विभागीय अधिकारी भरत आरोटे, शाखाव्यवस्थापक रमेश गोसावी, तालुका सचिव दत्ता पगार, किरण महात्मे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## कोपरगाव तालुक्यात 'जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा' कार्यक्रम सुरू

**वावी : वार्ताहर**

जलव्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी आणि लोकांना त्याची माहिती मिळावी, या उद्देशातून जलसंवर्धनासाठी सुरू करण्यात आलेल्या जलसंपदा विभागाचा 'जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा' कार्यक्रम मंगळवारपासून आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुक्यात सुरू करण्यात आला. जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर कोपरगाव तालुक्यात देखील 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' राबविण्यात येणार असून, या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार महेश सावंत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, उपविभागीय अभियंता संदीप पाटील, गोदावरी दूध संघाचे दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, माजी उपसभापती अर्जुनराव काळे, माजी सदस्य मधुकर टेके, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण, संचालक सुधाकर रोहम, दिलीपराव बोरणारे, अनिल कदम, प्रशांत घुले, विष्णु शिंदे, गौतम बँकेचे चेअरमन संजय आगवण, पद्मविभूषण शरदचंद्र पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, संचालक रावसाहेब चौधरी, वीरेंद्र शिंदे, दिलीपराव शिंदे, राजेंद्र निकोले, रामदास केकाण, संभाजीराव काळे आदी उपस्थित होते.





## सिन्नर सार्वजनिक वाचनालयात रंगली काव्य मैफल

**सिन्नर : प्रतिनिधी**

**अंबाड्याला तुझ्या, मोगऱ्याचा वास, प्रिये तुझ्यात होई, मला चंद्राचा भास**

कवी मोहन वाकचौरे यांच्या प्रेम कवितेने कवितेची संध्याकाळ गंधित झाली. एकापेक्षा एक बहारदार कवितांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सिन्नर शाखेने सिन्नर सार्वजनिक वाचनालयात आयोजित केलेली लोककवी वामनदादा कर्डक कवी कट्ट्यावरील काव्यमैफील रंगतदार होत गेली. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी मसापचे अध्यक्ष प्राध्यापक राजाराम मुंगसे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून एस. जी. पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक उदय कुदळे उपस्थित होते. लोककवी वामनदादा कर्डक यांचे प्रतिमापूजन आणि वटवृक्षाला पाणी घालून या मैफिलीची आगळीवेगळी सुरुवात करण्यात आली.

महात्मा फुले जयंतीचे औचित्य साधत कवी देव थोरात यांनी फुले दांपत्याने भिडे वाड्यात सुरू केलेल्या स्त्री शिक्षण चळवळीला आपल्या कवितेत गुंफले.

**''जिथे ओढला गेला होता, स्त्रीशिक्षणाचा पहिला गाडा, तोच मी साऊ ज्योतीबाचा, लाडका भिडे वाडा''**

शेतकरी आत्महत्या, काव्य निर्मिती मागील प्रेरणा, निसर्ग, पर्यावरण, वृक्ष संवर्धन, आधी विविध विषयांवरील कविता या कवी संमेलनात सादर करण्यात आल्या. वृक्षमित्र विष्णू वाघ यांनी आजकालच्या सावित्रींनी वडाला फेऱ्या मारण्याऐवजी वटवृक्षाचे जतन करणे त्याची लागवड करणे किती आवश्यक आहे, हे आपल्या कवितेतून मांडले.

या पुढील काळात दर महिन्याला लोककवी वामनदादा कर्डक कवी कट्ट्यावर कवी संमेलनाचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती प्रास्ताविकात मसापाचे कार्याध्यक्ष रवींद्र कांगणे यांनी दिली. कवी संमेलनात मनीषा उगले, रवींद्र कांगणे, प्राध्यापक राजाराम मुंगसे, कवयित्री सुनिता वाळुंज, रोहिणी मिठे, किरण भावसार आदींनी आपल्या कविता सादर केल्या. सूत्रसंचालन देव थोरात यांनी केले.

## राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वतीने आमदार सुहास कांदे यांचा सन्मान

**नांदगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या भटक्या - विमुक्त विकास समितीच्या अध्यक्षपदी नांदगावचे आमदार सुहास (अण्णा ) कांदे यांची नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वतीने त्यांचा सन्मान नाशिक जिल्ह्यातील नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुहास कांदे यांची महाराष्ट्र शासनाच्या भटक्या - विमुक्त विकास समितीच्या अध्यक्षपदी नुकतीच सन्मानपूर्वक नियुक्ती करण्यात आली एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट अंतर्गत स्थापित राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वतीने आमदार कांदे यांचा नांदगाव येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन सत्कार करण्यात आला. एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे प्रणेते राहुलजी कराड यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

राष्ट्रीय सरपंच संसदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील व सहसमन्वयक प्रकाशराव महाले यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व एमआयटी विश्वशांती घुमटाची प्रतिमा देऊन हा सत्कार संपन्न करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सरपंच संसदेचे नांदगाव तालुका अध्यक्ष व नांदगाव कृउबाचे संचालक समाधान पाटील, नांदगाव तालुका समन्वयक व नागापूरचे सरपंच राजेंद्र पवार, नांदगाव तालुका संघटक व पत्रकार राजेंद्र तळेकर, नांदगावचे माजी नगराध्यक्ष चेतन पाटील,नांदगाव तालुका भाजपा अध्यक्ष गणेश शिंदे, भालूरचे समाधान थेटे,भालूरचे उपसरपंच. गणपत निकम, ग्रामपंचायत सदस्य रमेश निकम, देवीदास निकम, राजेंद्र मेंगाळ, गंगाधरीचे सरपंच सचिन जेजुरकर, रामनाथ चोळके, ग्रामपंचायत बोराळेच्या लोकनियुक्त सरपंच अश्विनीताई राजेंद्र पवार, उमेश काळे, पत्रकार संजीव धामणे, बाबासाहेब कदम, सचिन बैरागी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.



#### नांदगाव तालुक्यात सरपंच संसदेचे आयोजन करा : आमदार कांदे

राष्ट्रीय सरपंच संसदेच्या विविध उपक्रमांविषयी याप्रसंगी चर्चा झाली. राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वतीने नांदगाव तालुक्यात दोन दिवसीय नाशिक जिल्हा – सरपंच संसद आयोजित करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करून सुहास कांदे यांनी त्या आयोजनासाठी पूर्ण सहकार्य करण्याचा मनोदय व्यक्त केला. नांदगाव तालुक्यातील सर्व विद्यमान सरपंचांसह आमदार सुहास अण्णा कांदे यांनी पुणे येथे एमआयटी सदिच्छा भेट देण्याचे नियोजन यावेळी करण्यात आले. योगेश पाटील, प्रकाशराव महाले यांचे सुहास कांदे यांनी प्रारंभी सत्कार करून स्वागत केले.

## सिन्नरला ११४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची २१ ला आरक्षण सोडत

### अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात काढणार सोडत;२४ ला बैठक

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ११४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दि. २१ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता तर महिला आरक्षणासाठी दि. २४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी दिली.

जिल्हाधिकारी नाशिक यांच्या दि.११ एप्रिल २०२५ च्या आदेशान्वये दि. ०५/०३/२०२५ ते दि. ०४/०३/२०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ११४ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली दि. २१/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सिन्नर शहरातील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात येथे बैठक होणार आहे. तालुकानिहाय ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी निफाड यांच्या अध्यक्षतेखाली महिलांसाठीचे सरपंच आरक्षण सोडत (दि. २४) रोजी दुपारी १२.०० वाजता अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात काढण्यात येणार आहे.

तालुक्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य, पदाधिकारी तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी दोन्ही बैठकांना उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा यांनी केले आहे.